अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

मेहता मराठी ग्रंथजगत

फेब्रुवारी २०१२ | किंमत १५ रुपये







T BOOK CLUB

टी बुक क्लब २१

सभासद फी ५० रु.

सभासद व्हा व ५०% सवलत मिळवा!
या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!



द स्पिरिच्युअॅलिस्ट

मेगन चॅन्स
एम.व्ही. कुर्लेकर
किंमत ३२०/-
प्रकाशित

बिट्रेयल

जॉन लेस्क्रॉर्ट
अनु. एम.व्ही. कुर्लेकर
किंमत २२०/-
प्रकाशित

द चेंबर

जॉन ग्रिशॅम
अनु. विश्वनाथ केळकर



क्रिटिकल

रॉबिन कुक
अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर

झॉप्ड

कॅरॉल हिगीन्स क्लार्क
अनु. जयंत गुणे

मुखपृष्ठ
प्रक्रिया सुरू

शॅडो मॅन

कोडी मॅकफेद्र्येन
अनु. उदय भिडे

मेहता मराठी ग्रंथजगत

◆ फेब्रुवारी २०१२ ◆ वर्ष बारावे ◆ अंक दुसरा

— *अनुक्रमणिका* —

संपादकीय	**४**
साहित्यवार्ता	**१२**
पुरस्कार	**४४**
पुस्तक परिचय	**५२**
इंग्रजी पुस्तक विभाग	**६७**
अभिप्राय	**७२**
ओळख लेखकांची	**८२**
श्रद्धांजली	**९८**
वाचकांचा प्रतिसाद	**१०२**
बालनगरी	**१०४**

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
अश्विनी कुलकर्णी

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension **(ग्रंथजगत विभाग) - २२७/२४३**
E-mail : info@mehtapublishinghouse.com

वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.
३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय

ॲपलचा नवा प्रकल्प - पाठ्यपुस्तक क्षेत्रात क्रांती घडविण्याची जिद्द

ॲपलचा संस्थापक स्टीव्ह जॉब्ज याच्या मृत्युनंतरही ॲपलची घोडदौड सुरूच आहे. स्टीव्हच्या कारकीर्दीतील अनेक संकल्पित प्रकल्प क्रमाक्रमाने आकार घेत बाजारात येतील. आय फोन ४ एसचे लाँचिंग नोव्हेंबर मध्ये झाले. ॲपल कंप्युटर, मॅक, आयपॅड, आयपॉड, आयफोन, आयक्लाउड, आयट्युन्स, आयबुक्स, आयबुकस्टोअर्स या उपक्रमांद्वारे ॲपलने डिजिटल क्षेत्रात नवनव्या कल्पना यशस्वीपणे राबवून अग्रगण्य स्थान मिळवले आहे. ॲपलची सर्व उत्पादने हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर या दोहोंचा सुंदर मेळ घालून ग्राहकांना सहजपणे वापरता येतील आणि त्यांचा वेळ आनंदात घालवतील अशी आहेत.

ॲपलने आता शैक्षणिक क्षेत्रात आपली करामत करुन दाखवण्याची जिद्द बाळगली आहे.

त्याचा आरंभ म्हणून २० जानेवारी २०१२ रोजी डिजीटल पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीचा प्रकल्प हाती घेतला आहे. आयपॅडवर ही नवीन पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना वाचायला मिळतील. त्यांचे लेखन अनुभवी व तज्ज्ञ शिक्षक करतील. ॲपलचा डिझाइन विभाग त्यातील तपशील व मजकूर मल्टिमीडियाद्वारे सहजपणे समजावा अशी रचना करेल. प्रत्येक वर्ग आणि विषय यासाठी स्वतंत्र पुस्तके असतील. नामवंत प्रकाशन संस्थांचाही या प्रकल्पात सहभाग असेल.

मॅकग्रा हिल, पियरसन, हॉटन, मफिन, हारकोर्ट या प्रकाशन संस्थांशी त्याबाबत करारही झाले आहेत. डीके पब्लिशिंगच्या लर्निंग टूल्सचा वापर ॲपल या पाठ्यपुस्तकात करणार आहे. सर्व पुस्तके मनोरंजक, आकर्षक आणि मजेशीर

असतील. आणि इंटरॲक्टिव्ह पद्धतीने विद्यार्थ्यांचे शंकानिरसनही करतील. ही पाठ्यपुस्तके अत्यंत प्रगत, शक्तिशाली आणि निर्दोष असावीत असा कटाक्ष बाळगला जाईल. या पुस्तकांची वितरणव्यवस्थाही स्वस्त आणि सुटसुटीत असेल. प्रत्येक पाठ्यपुस्तक १५ डॉलर्सना असेल. डिजीटल टेक्स्टबुक आयबुक स्टोअर द्वारे सर्वदूर जाऊ शकतील.

याच प्रकल्पाबरोबर ॲपलने लेखकांठी सेल्फ पब्लिशिंगचे ॲपही विकसित केले आहेत. स्वत: लेखक या ॲप्लीकेशन द्वारे पुस्तकाची निर्मिती करू शकेल.

अमेरिकेत आज शैक्षणिक पुस्तकांची विक्री ८ अब्ज डॉलर्सची होते. ॲपल पारंपारीक पाठ्यपुस्तक प्रकाशन व्यवसायाला कितपत खिंडार पाडू शकेल हे कळायला काही वेळ लागेल. परंतु ॲपलचा आजवरचा अनुभव लक्षात घेता ॲपलचा प्रभाव निश्चितच या क्षेत्रात क्रांतिकारक ठरेल असे वाटते.

भारता सारख्या बहुभाषिक देशातही या प्रयोगामुळे शैक्षणिक क्षेत्र ढवळून निघू शकेल. आपल्या एकूणच जीवनशैलीत माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील क्रांतिमुळे झपाट्याने बदल होत आहेत. संगणक, इंटरनेट, मल्टिमीडिया, डिजिटलायझेशन, ॲनिमेशन, मोबाइल, स्मार्ट फोन, आयपॅड, आयफोन, आयपॉड, इ-बुक्स, ऑनलाइन व्यवहार, आऊटसोर्सिंग, यामुळे १९९० नंतरच्या काळात आपले उत्पादन, आपल्या नोकरीधंद्याचे स्वरूप, आपल्या संज्ञापनक्षेत्रांचे स्वरूप, करमणूकीची साधने, टीव्ही, व्हिडीओ, संगीतश्रवण, परस्पर संवादाची माध्यमे, आर्थिक व्यवहारांची व्याप्ती आणि पद्धती, बँकींग, शेअर मार्केट,संदेशवहन, क्रेडिटकार्ड, मल्टिमीडिया, आपली खेळणी, प्रकाशन-मुद्रण व्यवसायांचे स्वरूप या सर्वात आश्चर्यकारक बदल झाले आहेत आणि होत आहेत. सोशल नेटवर्किंग द्वारे स्थळकाळाच्या मर्यादा नसलेल्या मानवी संबंधाचे आणि विचार मत-प्रदर्शनाचे नवे सामर्थ्यशाली पर्व सुरू झाले आहे. फेसबुक सारख्या सोशल नेटवर्किंगचे पन्नास साठ कोटी सदस्य म्हणजे प्रचंड लोकसंख्येचा नवा व्हर्च्युअल अभ्यासात्मक देशच तयार झाला आहे. ॲपल, गुगल, ॲमेझॉन, याहू, फेसबुक, इंटेल, मायक्रोसॉफ्ट, सॅमसंग, नोकिया, एलजी वगैरे कंपन्यांनी जागतिक पातळीवर मान्यता मिळवली आहे. परदेशात वृत्तपत्रे बंद पडत आहेत आणि डिजीटल साधनांचे महत्त्व वाढत आहे. टीव्हीची जागा मोबाइल स्मार्ट फोन घेत आहेत. औद्योगिक क्षेत्रातही मोठे परिवर्तन घडून येत आहे. सॉफ्टवेअरमुळे उत्पादन प्रक्रियांचे स्वरूप बदलत आहे. कामगारांची जागा रोबोट्स घेत आहेत. भारत, चीन सारख्या देशातील स्वस्त आणि विपुल श्रमिकांचा फायदा घेऊन जागतिक काखानदार उत्पादनाचा खर्च आटोक्यात ठेवून व्यापक वितरणाची व्यूहरचना करीत आहेत. हे सगळे बदल इतक्या वेगाने होत आहेत की त्यांचा मागोवा

ठेवणेही अवघड होत आहे.

या नव्या बदलत्या जागतिकीकरणाच्या झपाट्यात शिक्षणक्षेत्र हे स्थितीशील आणि अपरिवर्तनीय राहूच शकत नाही. ज्ञानसंपादनाची प्रभावी माध्यमे आणि व्यापक-जलद संज्ञापन साधने तसेच इंटरनेट डिजिटल वगैरे सोयी यामुळे शिक्षणाचे, शिक्षणपद्धतीचे, शिक्षणाच्या कालावधीचे, शिक्षक-विद्यार्थी संबंधांचे, शाळा कॉलेजांचे, संघटन आणि संचालन कालसुसंगत व्हायला हवे ही जाणीव आता प्रबळ होत आहे. शिक्षण हे आता इंटरनेटद्वारे प्रत्येक विद्यार्थ्याला, प्रत्येक व्यक्तीला घरच्या घरी मिळू शकेल, त्यासाठी शाळा कॉलेजांमध्ये जाण्याचीही गरज उरणार नाही. इंटर-अॅक्टीव्ह पद्धतीमुळे प्रत्येक विद्यार्थी आपल्या बौद्धिक कुवतीनुसार कमी जास्त वेगाने प्रत्येक गोष्ट आत्मसात करू शकेल. कुठल्याही विषयाचे हवे ते ज्ञान इंटरनेटवरून मिळवण्याची सोय असल्याने आंतरविद्याशाखीय सर्वांगीण प्रज्ञा विकसित होऊ शकेल आणि सध्याच्या शिक्षण पद्धतीतील कृत्रिम भेद आणि शाखा निहाय संस्थापक यंत्रणा तसेच मूल्यमापनाच्या पद्धती यातही बदल करावा लागेल.

ज्ञानाचे आकलन, व्यवस्थापन, मूल्यमापन, परिक्षण संघटन- यांचीही पुनर्मांडणी करावी लागेल.

या दृष्टीने 'अॅपल'ने डिजिटल पाठ्यपुस्तकांची निर्मिती करण्याचा जो प्रकल्प हाती घेतला आहे तो जागतिक पातळीवरही महत्त्वपूर्ण ठरू शकेल. नव्या प्रयोगशिलतेला त्यामुळे चालना मिळू शकेल.

महाराष्ट्रात सध्या बालभारतीची पाठ्यपुस्तक क्षेत्रात मक्तेदारी आहे. सर्वांना सामावून घेण्याचे धोरण असल्याने बालभारतीबद्दल तक्रार असण्याचे कारण नाही. शासनाचा एक प्रकल्प म्हणून त्याकडे पाहावे लागते. विद्यार्थ्यांनी अद्ययावत ज्ञानरंजक व सुबोध पद्धतीने व्हावे यासाठी अॅपलच्या धर्तीवर काही प्रयत्न करणे इष्ट ठरेल का हे बघायला हवे. मात्र त्यात खाजगी प्रकाशन संस्थांचा पुढाकार असणे अधिक फायदेशीर आणि प्रयोगशील ठरेल. बालभारती सारख्या शासकीय वर्चस्वाखाली काम करणाऱ्या संस्थेला अॅपलचा स्वातंत्र्यप्रिय दृष्टीकोन परवडणार नाही. महाराष्ट्रीतील शैक्षणिक गुणवत्तेला जागतिक पातळीवर नेण्यासाठी शिक्षक-संस्थाचालक यांना प्रयोग करण्याची आणि नवीन तंत्रज्ञानाची संधी देणेच श्रेयस्कर ठरेल.

'अॅपल'च्या या उपक्रमामुळे शैक्षणिक क्षेत्रातील बदलाची जाणीव व गरज तीव्रतर होऊ शकली तर ती स्वागतार्ह बाब ठरेल.

आगामी

TATA

एका कॉर्पोरेट ब्रँडची उत्क्रांती

मूळ लेखक **मॉर्गन विट्झेल**
प्रस्तावना **राम चरण**
अनुवाद **विदुला टोकेकर**

२२०रु. पोस्टेज ३०रु.

टाटा ब्रँड म्हणजे आहे तरी काय?
काय आहेत त्याची मूल्य?
जगातील आणि भारतातील लोकांना
त्यातून काय समजत?
या रंजक आणि माहितीपूर्ण पुस्तकात
मार्गन विट्झेल टाटांच्या हृदयाचा
ठाव घेतात, त्याचे मूळ समजावून सांगतात,
टाटांचं नाव आणि प्रतिमा कशी
निर्माण होत गेली आणि
या प्रतिमेचं रुपांतर एका बलवान
आणि मौल्यवान ब्रँडमध्ये
करण्यासाठी या उद्योगसमूहाने
काय केलं याचं वर्णन करतात.



५००रु. पोस्टेज ३०रु.

आगामी

जाईची सुगंधी फुले

किसन दगडू शिंदे

एका अस्पृश्य मानल्या गेलेल्या आणि सर्वार्थाने बहिष्कृत केल्या गेलेल्या समाजात जन्मलेल्या व्यक्तीने प्रतिकूल सामाजिक परिस्थितीवर स्वत:च्या प्रयत्नाने मात करून जगण्याच्या संघर्षात यश कसे प्राप्त केले, आपल्या जगण्याला अर्थ देण्याचा आणि ते सुंदर करण्याचा सर्वशक्तीनिशी कसा प्रयत्न केला, त्या सर्व प्रयत्नांचा ओघवत्या भाषेत अभिव्यक्त केलेला तपशील म्हणजे श्री. शिंदे यांचे आत्मकथन आहे. या तपशिलात कुठेही कृत्रिम भडकपणा नाही किंवा अनाठायी अभिनिवेशही नाही. म्हणून हे आत्मकथन वैशिष्टपूर्ण

बनले आहे.

पाटबंधारे विभागात कनिष्ठ अभियंता म्हणून शासकीय नोकरीस सुरुवात करून कार्यकारी संचालकासारख्या सचिव श्रेणीतील पदावरून निवृत्त झालेल्या आणि आयुष्यभर दगड-मातीशी संबंध आलेल्या शिंदे यांनी आपली वाङ्मयीन अभिरुची जतन करीत मानवी संबंधाचे बारकावे एखाद्या कुशल लेखकाप्रमाणे कधी प्रवाही तर कधी काव्यात्म भाषेत उलगडवून दाखविले आहेत. हे त्यांच्या लेखनाचे मोठे यश आहे.

आगामी

एक पायरी वर

स्वाती चांदोरकर

१६०रु. पोस्टेज २५रु.

मी नं, आज एका दारातून आत शिरले.
एकच पाऊल टाकलं आणि तशीच उभी राहिले.
ते उघडं दार इतकं सुंदर दिसत होतं की...
दाराच्या आतलं पाऊल पुन्हा बाहेर घेतलं.
उघड्या दाराची चौकट इतकी छान होती,
की मंत्रमुग्ध झाले. असं दार दिसायला हवं.

पण माणसं अधाशी असतात.
जरा फट दिसली, तरी धक्के मारमारून आत घुसतात.
आतलं सर्व काही ओरबाडून घेतात,
तरीही समाधान मिळत नाही. समाधान होत नाही.
मग दुसरी फट...!
असा अधाशीपणा मीही केलाच केव्हातरी.
आता मात्र सताड उघडं दार,
सहजी आत जाता येतंय, पण...
आपल्यासाठी एक दार उघडं आहे, हे बघूनच समाधान होतंय.

आगामी

नारायण मूर्ती

मूल्यं जपणारं एक अद्वितीय आयुष्य

१२०रु. पोस्टेज २५रु.

मूळ लेखक
एन. चोक्कन

मराठी अनुवाद
अंजनी नरवणे

आय.आय.टी.मध्ये प्रवेश मिळाला होता; परंतु ते तिथे शिकायला जाऊ शकले नव्हते, कारण त्यांच्या वडिलांकडे त्यांना ते शिक्षण देण्याइतके पैसे नव्हते.

त्यांच्या सात मित्रांबरोबर नवी कंपनी सुरू करण्यासाठी त्यांनी त्यांच्या पत्नीकडून १०,०००/- रुपये उसने घेतले होते!

क्षुल्लक कारणाने झालेल्या गैरसमजापायी एका साम्यवादी देशाच्या तुरुंगात त्यांना साठ तास कोंडून ठेवलं होतं!

कॉम्प्युटरच्या दुनियेत प्रवेश मिळवण्यासाठी त्यांनी अहमदाबादच्या आय.आय.एम.मध्ये अत्यल्प पगारावर नोकरी पत्करली.

आणि आज?... आज नारायण मूर्ती आणि त्यांच्या मित्रांची कंपनी 'इन्फोसिस'मध्ये १,३०,००० माणसे नोकरी करत आहेत आणि कंपनीचा वार्षिक नफा १,००० कोटी रुपयांपेक्षाही जास्त आहे!

नवे कोरे

१०-१०-१०

१०मिनिटे –१०महिने –१०वर्षे

जीवन बदलून टाकणारी कल्पना!

मूळ लेखिका

सुझी वेल्श

अनुवाद

विदुला टोकेकर



१६०रु. पोस्टेज २५रु.

तुमच्या कोणत्याही निवडीला -
कोणत्याही निर्णयाला -
१०-१०-१०मुळे फायदाच होईल.
आपल्या सर्वांनाच स्वत:चे आयुष्य स्वत: घडवण्याची इच्छा असते, पण आजच्या गतिमान जगात, त्यातील प्राधान्यांच्या घडामोडीत, माहितीच्या महापुरात आणि जखडणाऱ्या पर्यायांमध्ये आपण सहजच ऊर्मी, तणाव आणि उपयुक्ततेबरोबर वाहवत जातो, असं आपल्या लक्षात येतं. आपले निर्णय बरोबर असतात का? की आपण पुन्हा-पुन्हा, आपल्या कितीही जोरदार इच्छेविरुद्ध त्या क्षणाच्या मागणीला शरण जातो?
१०-१०-१० म्हणजे -
- प्रभावी निर्णय प्रक्रियेचा एक परिवर्तनीय नवा मार्ग -
- आयुष्यातील अनेक अडथळ्यांवर योग्य मार्ग दाखवणारे एक साधन.
- निवडलेल्या क्षेत्रात क्षणा क्षणाला सकारात्मक परिणामांकडे वाटचाल.
- जीवनातील उद्दिष्टे आणि मूल्यांची एक नवी ओळख.
- आनंद, स्पष्टता व शक्तीसामर्थ्याबद्दल सर्व काही सांगणारे मार्गदर्शन.
१०-१०-१०च्या वापराची विस्तृत शक्यता फार वैशिष्ट्यपूर्ण आहे. ते एखाद्या कॉलेजकुमाराने किंवा एखाद्या व्यस्त मातेने किंवा ज्येष्ठ व्यावसायिकाने; कलाकाराने, सहकारी अधिकाऱ्याने किंवा उद्योजकाने वापरले असले तरी १०-१०-१०ने आपली परिणामकारकता लहानमोठ्या, नेहमीच्या आणि अपवादात्मक अतिमहत्त्वाच्या निर्णयांमध्ये दाखवली आहे. आणि त्यामुळे जीवन अधिक चांगले केले आहे.

*** सातारा ग्रथंमहोत्सव**

कविवर्य कुसुमाग्रज नगरीत हजारो ग्रंथांच्या रुपाने ९ जानेवारी ते १२ जानेवारी २०१२ दरम्यान साक्षात सरस्वती अवतरली होती. दरवर्षीप्रमाणे यंदाही सातारा येथील जिल्हापरिषदेच्या मैदानावर जिल्हा परिषद आणि ग्रंथमहोत्सव समितीच्या वतीने ग्रंथमहोत्सव आयोजित करण्यात आला होता. राज्याच्या विविध भागांतून हजारो पुस्तकांचे शेकडो स्टॉल उभारण्यात आले होते. त्यासाठी नामवंत प्रकाशन संस्था साताऱ्यात दाखल झाल्या होत्या. हा महोत्सव म्हणजे सातारकरांसाठी मोठी पर्वणीच असते.

महोत्सवाच्या निमित्ताने अनेक प्रकाशन संस्थांनी पुस्तकांच्या किंमतीवर भरघोस सवलत ठेवली होती.

संयोजकांच्या वतीने साहित्यिकांची व्याख्याने, विविध विषयांवरील परिसंवाद, नृत्यांचे कार्यक्रम, सांस्कृतीक कार्यक्रम, लेखकांचा मेळावा, निमंत्रित कवींचे संमेलन अशी कार्यक्रमांची रेलचेल या महोत्सवात होती.

महोत्सवाची सुरवात गांधी मैदानावरुन सुरू झालेल्या ग्रंथदिंडीने झाली. त्यामध्ये विविध शाळा चित्ररथांसह सहभागी झाल्या होत्या. दिंडीचे उद्‌घाटन डॉ. रामास्वामी एन., पोलिस अधीक्षक के. एम.एम. प्रसन्ना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्याम देशपांडे यांच्या उपस्थितीत पार पडले.

*** राजर्षी शाहू ग्रंथ महोत्सव**

सातारा पाठोपाठ कोल्हापूर येथे राजर्षी शाहू ग्रंथ महोत्सव १३ ते १६ जानेवारी

दरम्यान प्रायव्हेट हायस्कूल मैदानावरील कुसुमाग्रज नगरीत दिमाखदारपणे पार पडला.

सकाळी नऊ वाजता ग्रंथदिंडीला प्रारंभ झाला. 'एक तरी पुस्तक प्रत्येक घरी' या संकल्पनेवर आधारीत विविध फलक आणि चित्ररथांचा दिंडीत समावेश केला होता. हजारो शालेय विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने 'वाचाल तर वाचाल' असा संदेश या ग्रंथदिंडीतून दिला गेला.

८५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नवनिर्वाचित अध्यक्ष वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख अध्यक्षस्थानी होते.

महाराष्ट्रातील सत्तरहून अधिक नामांकित प्रकाशन संस्थांचे स्टॉल महोत्सवात सहभागी झाले होते. मराठी, हिंदी, इंग्रजी माध्यमातील सर्व प्रकारची पुस्तके येथे उपलब्ध होती. काही प्रकाशन संस्थांनी सवलतीच्या आकर्षक ऑफर्सही जाहीर केल्या होत्या. तसेच विविध विषयांवर परिसंवाद, नामांकित साहित्यिकांशी थेट संवाद अशा भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन या ग्रंथमहोत्सवात केले होते.

*** गुगलचा नवा 'स्कीमर'**

एखाद्या कार्यक्रमाची सविस्तर माहिती, त्याचे आयोजक, निमंत्रण वगैरेंसाठी वर्तमानपत्रं, मासिकं तसेच काही 'प्लॅनर' मासिकेही असतात. तशा प्रकारच्या वेबसाइट्सही जगभरात कार्यरत आहेत. यात आता गुगलने आणखी एक नवे वेब ॲप्लिकेशन बाजारात आणले आहे. स्थानिक पातळीवरील कार्यक्रमांसाठी 'स्कीमर डॉट कॉम' सोशल नेटवर्किंग साइट गुगलतर्फे सुरू करण्यात आली आहे. फेसबुकच्या



द दा विंची कोड

५वी आवृत्ती

डॅन ब्राऊन अनु. अजित ठाकूर

जगभरात उलथापालथ घडवणारी कादंबरी

३२०रु. पोस्टेज २५रु.

'इव्हेण्ट्स'प्रमाणेच स्कीमरमध्येही ॲक्टिव्हिटीज आणि इव्हेण्ट्सचा पर्याय असणार आहे. गुगलचे हे नवे स्कीमर ॲप्लिकेशन बाजारात उपलब्ध झाले आहे.

आपण राहतो त्या ठिकाणी चालू दिवशी, आठवड्यात, महिन्यात किंवा नजीकच्या काळात कोणकोणत्या घडामोडी होणार आहेत याविषयीची माहिती देण्यासाठी गुगलने हे पाऊल उचलले आहे. गुगलने या नव्या उपक्रमाची अधिकृत घोषणा गुगल प्लसवर केली आहे. पण त्यापेक्षा आश्चर्याची गोष्ट म्हणजे या नव्या प्रकारासाठी ट्विटरवर रीतसर प्रमोशन केले जात आहे. स्कीमर सध्या प्राथमिक रूपात आहे. त्याशिवाय सुरुवातीला ऑर्कुट ज्याप्रमाणे 'इनव्हाइट ओन्ली' पद्धतीने काम करत होते तसेच ते या नव्या वेबसाइटसाठी असणार आहे.

लोकेशन बेस्ड टेक्नॉलॉजीवर आधारीत हे ॲप्लिकेशन आपल्याला पाहिजे त्या शहरातील टीप्स आणि आपण तेथे जाऊन काय, काय करू शकतो याबाबत मार्गदर्शन करते. या ॲप्लिकेशनच्या मदतीने लोकांना कोणत्याही अनोळखी शहराची ओळख करून घेण्यास मदत होणार आहे. प्रत्यक्षात याची घोषणा गुगलने गुगल प्लस लॉन्च करण्यापूर्वीच केली होती. यासंदर्भात स्कीमर टीमने ट्विटरवरून भरपूर प्रसिद्धीही केली होती. या ॲप्लिकेशनला विविध सोशल नेटवर्किंग साइट्स लिंक करण्यात आल्या आहेत. यामुळे आपण एखाद्या शहराचे नाव टाकले की आपल्याला त्या शहरातील आपल्या मित्रांची माहितीही समजते. याचबरोबर आपण तेथे जाऊन काय करणार आहोत याची टू डू लिस्टही आपण तयार करू शकतो. ही लिस्ट आपण आपल्या मित्रांशी शेअरही करू शकतो. यावर आपण फोटो, व्हिडीओजही शेअर करू शकतो. आपला विकेंड व्यवस्थित व्हावा यासाठीची ही नामी सुविधा असणार आहे. सध्या याचे बिटा व्हर्जन काम करत असून याचे पूर्ण व्हर्जन लवकरच बाजारात येणार आहे. सर्वप्रथम ही सुविधा अमेरिकेत सुरू होईल. यानंतर टप्प्याटप्प्याने विविध देशांमध्ये सुरू होणार आहे.

* 'व्हर्च्युअल एम्बसी'ला लाल कंदील

दूतावासावर किंवा त्यांच्या परिसरात हल्ले होण्याचे प्रमाण गेल्या काही वर्षात वाढले आहे. त्यामुळेच अमेरिकेसारख्या काही देशांनी 'व्हर्च्युअल एम्बसी' हा प्रकारही सुरू केला. पण दोन्ही देशातील संबंध सुधारावेत म्हणून अमेरिकेने सुरू केलेल्या 'व्हर्च्युअल एम्बसी'ला इराणने लाल कंदील दाखवला आहे. विशेष म्हणजे सुरू झाल्यादिवशीच इराणने ही वेबसाइट ब्लॉक केली आहे. अमेरिकेची धोरणं इराणी लोकांपर्यंत पोचावीत यासाठी इराण सरकारच्या मदतीने वेबसाइट सुरू करण्यात आली होती. मात्र, सध्या या साइटवर क्राइम ब्रॅँचच्या कारवाईमुळे साइट बंद करण्यात आल्याचा संदेश दिसू लागला आहे.

या साइटचा गैरवापर करून गुप्त माहितीची देवाणघेवाण करत इराणी लोकांना धोका दिल्याच्या आरोपाखाली एका वरिष्ठ खासदाराला दोषी धरण्यात आले आहे. तसंच, केवळ अमेरिकेच्या व्हिसाबद्दल या साइटवरून माहिती देण्यात येत होती. या कारणांमुळेही ही कारवाई करण्यात आली असल्याचं इराणच्या सरकारने स्पष्ट केले आहे.

तब्बल तीन दशकं चाललेल्या असंतोषाचा अंत व्हावा, तसंच दोन्ही देशांतील संबंध सुधारावेत यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांनी ही व्हर्च्युअल एम्बसीच या वेबसाइटद्वारे तयार केली होती. वेबसाइटमध्ये इंग्रजी आणि फारसी भाषेतून माहिती प्रसारित करण्यात यायची. अमेरिकच्या कोणत्याही पॉलिसीचा डायरेक्ट प्रचार इराणमध्ये होणार नव्हता. मात्र, दोन्ही देशांतील काही माहितीची देवाणघेवाण करू देणाऱ्या ब्रिजचं काम ही वेबसाइट करत होती.

केवळ ही वेबसाइटच नव्हे तर, फेसबुक आणि नॉन-इंग्लिश गुगल साइट्सनाही इराणमध्ये बंदी घालण्यात आलीय. या पार्श्वभूमीवर, 'संवाद साधायच्या निमित्ताने अमेरिका इराणी लोकांची दिशाभूल करत असल्याने ही कारवाई करण्यात आल्याची इराणच्या फॉरेन पॉलिसी कमिशनचे अलाइद्दिन बौरूजिदी यांनी दिली. आपल्या गोड बोलण्यात फसवणाऱ्या अमेरिकेच्या भूलथापांना आता इराणी सरकार आणि लोकं बळी पडणार नाहीत, असंही त्यांनी सांगितलं.

दोन देशांतील संबंध सुधारावेत यासाठी अमेरिकेने ही संकल्पना राबवण्यास सुरुवात केली होती. इराणशी पुन्हा नाते प्रस्थापित व्हावे यासाठी फारशी भाषेतूनही वेबसाइट सुरू करण्यात आली होती. एम्बसीच्या पार्श्वभूमीवर ही अकाऊंट्सही बंद होण्याच्या मार्गावर आहेत.



५वी आवृत्ती

क्रांतिसूर्य

विश्वास पाटील

१९४२ मध्ये ब्रिटीशांची झोप उडवणाऱ्या क्रांतिसिंह नाना पाटील यांची समरगाथा

१३०रु.   पोस्टेज २५रु.

*** 'क्यूआर' म्हणजे काय?**

सध्या बहुतांश ठिकाणी 'क्यूआर'चा वावर वाढला आहे. जाहिरातींपासून ते बातम्यांपर्यंत 'क्यूआर' अर्थात 'क्विक रीस्पॉन्स'चा लोगो दिसतो. हा लोगो आपण आपल्या फोनमधील ॲप्लिकेशनमधून स्कॅन केला की, आपण थेट त्या जाहिरातीचे आणि बातमीचा अधिक तपशील मिळवू शकतो. 'क्यूआर'चा शोध जपानमध्ये १९९० मध्ये लागला. तेव्हापासून पाश्चिमात्य देशांमध्ये या कोडचा वापर होतो. आजही जपानमध्ये 'क्यूआर' सर्वाधिक वापरला जातो. 'क्यूआर'मध्ये आपण यूआरएल, टेक्स्ट किंवा इतर कोणत्याही प्रकारचा डेटा वाचू शकतो. हा कोड कॅमेरा, बारकोड रिडर किंवा स्कॅनर यामधून रिड केला जातो. 'क्यूआर' रिडर्स तुम्हाला डाउनलोड करून वापरात येऊ शकणार आहेत. भारतामध्ये 'क्यूआर'चा वापर नुकताच सुरू झाला असून बहुतांश प्रसार माध्यमांनी याचा स्वीकार केला आहे. याचबरोबर बड्या कंपन्यांना आपल्या जाहिरातींसाठी क्यूआरचा वापर केला आहे. यामुळे जाहिरात छापण्याची स्पेस कमी होते याचबरोबर वाचकांना 'क्यूआर' कोड स्कॅन केल्यावर जाहिरातीपेक्षा सविस्तर माहिती मिळू शकणार आहे. देशातील ई-जगताशी संबंधित नियतकालिकांनी सर्वप्रथम याचा वापर सुरू केला तो मार्च २०११ मध्ये. याद्वारे त्यांनी विविध व्हिडीओ, वेब पेजेस, डेटा कॅप्चर, जाहिराती, विविध कार्यक्रम आदीची माहिती यशस्वीपणे लोकांपर्यंत पोहचवली.

क्यूआरचा वापर

* या माध्यमातून आपण कोणत्याही भाषेतील माहिती शेअर करू शकतो. याला फॉंट किंवा इतर कोणत्याही अडचणी येत नाहीत. यामुळे याचा वापर प्रादेशिक भाषांसाठी प्रभावीपणे होऊ शकतो.

* वृत्तपत्रांमधील बातम्यांची किंवा जाहिरातींची जागा वाचविण्यासाठी याचा प्रभावी वापर होतो. एका कोपऱ्यात एखादी छोटीशी बातमी आणि 'क्यूआर' कोड दिला की, काम झाले. लोकांना सविस्तर वृत्त किंवा जाहिरातींची माहिती 'क्यूआर' कोड स्कॅन केल्यावर मिळू शकते.

* व्हिजिटिंग कार्डसाठीही सध्या 'क्यूआर' कोडचा वापर करण्यात येतो.

* याचा वापर ग्रामीण भागासाठीही होऊ शकतो. सरकारी अधिकाऱ्यांना ग्रामीण भागात काही संदेश पोहचवायचे असतील तर 'क्यूआर' कोडचा वापर केला जाऊ शकतो. म्हणजे ग्रामस्थांनी 'क्यूआर' कोड स्कॅन केला, की त्यांना रेकॉर्डेड संदेश ऐकावयास मिळू शकतो.

'क्यूआर' स्कॅन कसा करणार

'क्यूआर' स्कॅन करण्यासाठी तुमच्या फोनमध्ये कॅमेरा असणे आवश्यक आहे. यासाठी विविध ॲप्लिकेशन्स आहेत. ते आपण आपल्या फोनमध्ये डाउनलोड केले, की आपले काम फत्ते. यात आय-निग्मा, कायदा, स्कॅन लाइफ, क्वार्फटर, बारकोड स्कॅनर ही ॲप्लिकेशन्स आहेत. ब्लॅकबेरीसाठी 'क्यूआर कोड स्कॅनर प्रो' हे ॲप्लिकेशन आहे.

तुमचा 'क्यूआर' तयार करा

कायवा या ॲप्लिकेशनमध्ये आपण आपला 'क्यूआर' कोड तयार करू शकतो. याचा वापर आपण युआरएल, टेक्स, फोन नंबर्स किंवा एसएमएस शेअर करण्यासाठी करू शकतो.

*** 'बीपीओ'चा मोर्चा ग्रामीण भारताकडे**

भारतात गेल्या दशकात परदेशी कंपन्यांनी मोठ्या प्रमाणात आपली बीपीओ सेंटर्स थाटली. मोठ्या संख्येत तरूणांना त्यातून रोजगार मिळाला. मात्र या बीपीओंचे केंद्र प्रामुख्याने शहरी भागातच राहिले. अलिकडच्या काळात मनुष्यबळाची उपलब्धता, खर्च आदी बाबी लक्षात येत या बीपीओंनी ग्रामीण भारताकडे आपला मोर्चा वळवला आहे. विप्रो, इन्फोसिस यांसारख्या भारतीय सॉफ्टवेअर जायंट्सनीही ग्रामीण भागाकडे मोर्चा वळवला आहे.

'विप्रो टेक्नॉलॉजीज'च्या 'विप्रो बीपीओ'ने ऑगस्टमध्ये तामीळनाडूमधील मंजाक्कुडी येथे आपले पहिले बीपीओ सेंटर सुरू केले. त्यानंतर ऑक्टोबरमध्ये 'इन्फोसिस बीपीओ'ने आंध्र प्रदेशातील २२ जिल्ह्यांमध्ये बीपीओ थाटण्यासाठी आंध्र सरकारसोबत करार केला आहे. त्याशिवाय, रूरल शेअर्स, देसीक्रू, ग्रामआयटी, नेक्स्टवेल्थ, फॉस्टेरा आणि टाटा बिझनेस सपोर्ट सर्व्हिसेस आदी स्वतंत्र ग्रामीण बीपीओंनीही



३री आवृत्ती

स्वत:चा शोध

ओशो अनु. प्रज्ञा ओक

जीवन उन्नतीसाठी अत्यंत आवश्यक असलेल्या 'स्वत:च्या' शोधाबद्दल ओशोंचं मौलिक चिंतन

१७०रु. पोस्टेज २५रु.

अलीकडच्या काळात आपला कारभार सुरू केला आहे.

शहरी भागांतील बीपीओंमध्ये काम करणारी बरीच तरुण मुले ही नोकरीसाठी ग्रामीण भागांतूनच शहरांमध्ये आलेली असतात. त्यामुळे त्यांच्या गावापर्यंतच नोकऱ्या का नेऊ नयेत, या विचारांतून ग्रामीण बीपीओंचे कार्य चालते, असे विप्रोच्या बीपीओ ऑपरेशन्सचे प्रमुख मनीष दुगर यांनी सांगितले. येत्या तीन वर्षांत देशातील ग्रामीण भागांतील बीपीओंची कर्मचारी संख्या सध्याच्या पाच हजारावरून दहा पटींपेक्षाही अधिक वाढवण्याचा आयटी-बीपीओ कंपन्यांचा इरादा आहे. ग्रामीण भागांत शिक्षित, बेरोजगार तरुण खूप आहे. त्यांच्या कौशल्यांचा विकास आणि निश्चित वेतन या गोष्टी बीपीओद्वारे होऊ शकतात, असे 'रूरल शोअर्स'चे सीईओ मुरली वुल्लगंटी यांनी सांगितले. शहरांच्या तुलनेत ग्रामीण भागांत बीपीओंना ३० ते ४० टक्के कमी खर्च येतो. त्याशिवाय येथे तरुणांचे नोकऱ्या बदलण्याचे प्रमाणही शहरांच्या तुलनेत खूपच कमी, जेमतेम तीन-पाच टक्के असते. शहरांत हा आकडा ५० टक्के आहे. त्यामुळे आपला बेस ग्रामीण भागाकडे हलवणाऱ्या कंपन्यांची संख्या तज्ज्ञांच्या अंदाजापेक्षा खूपच मोठी असल्याचे त्यांनी सांगितले.

इंग्रजी बोलू शकणाऱ्या तरुणांची मोठी संख्या ही आजवर भारतासाठी जमेची बाजू ठरली होती. मात्र चीनसह मलेशिया, व्हिएतनाम, फिलिपाइन्स यांनी इंग्रजीचे धडे गिरवण्यास सुरुवात करत भारतापुढे स्पर्धा निर्माण केली आहे. त्यामुळे खर्चाबाबत संवेदनशील असलेल्या बीपीओ उद्योगाला भारताहून स्वस्त पर्याय मिळाल्यास या कंपन्या भारतातून तातडीने काढता पाय घेण्याचीही भीती आहे. त्यामुळे बीपीओ उद्योग भारताकडे राखायचा असेल तर रुरल बीपीओंना पर्याय नाही, असे मत एचडीएफसीचे अध्यक्ष दीपक पारीख यांनी नोंदवले.

अर्थात ग्रामीण भागातील बीपीओपुढेही काही मोठी आव्हाने आहेत. सातत्याने खंडीत होणारा वीज पुरवठा व टेलिफोन जोडणी या समस्यांवर तोडगा काढणे आवश्यक आहे. त्यामुळे रुरल बीपीओंना मार्ग सोपा नसला तरी त्यांना पर्याय नसल्याचे चित्र आहे.

*** 'लोकल लव्ह'; गुगलचा अहवाल**

भारतीय नेटिझन्सना नोकरी, राजकारण, क्रिकेट, सिनेमा आणि सोशल नेटवर्किंग साइटमध्ये अधिक रुची असल्याचे गुगलने प्रसिद्ध केलेल्या 'लोकल लव्ह' नावाच्या अहवालात समोर आले आहे. तर अण्णा हजारे यांच्या लोकपाल विधेयकाच्या आंदोलनाविषयी सर्वाधिक भारतीय तरुणांनी गुगल सर्च केल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

गुगलने भारताचा वार्षिक ‘लोकल लव्ह’ अहवाल शुक्रवारी प्रसिद्ध केला. या अहवालानुसार वर्षभरात बॉलिवूडमध्ये सर्वाधिक पसंती सलमान आणि शाहरूख यान यांच्या अनुक्रमे ‘बॉडीगार्ड’ आणि ‘रा.वन’ या चित्रपटांना मिळाली. विविध विषयांच्या माहिती मिळवण्यासाठी नेटिझन्स करत असलेल्या गुगल सर्चच्या वापरानुसार हा अहवाल तयार करण्यात येतो. राजकारण विभागात केलेल्या सर्वेक्षणामध्ये ‘लोकपाल विधेयक’ आणि ‘आधार कार्ड’ या दोन विषयांना सर्वाधिक हिट्स मिळाल्या आहेत. वृत्त विभागात ‘जापनचा भूकंप’ आणि ‘ओसामा बिन लादेन’चा मृत्यु हे दोन विषय आघाडीवर होते.

या सर्वेक्षणाच्या निमित्ताने भारतातील विविध ट्रेण्ड समोर येत असून या वर्षाची विशेष नोंद म्हणजे गुगलवर करण्यात आलेली ७० टक्के नोंद ही महानगराबाहेरची आहेत. यावेळी प्रथमच अव्वल क्रमवारीत शिक्षण, मनोरंजन, नोकरी याव्यतिरिक्त राजकारण आणि विशेषत: जनआंदोलनाची नोंद झाल्याचे, गुगलचे भारतीय उत्पादनांचे प्रमुख ललितेश कट्रागड्डा यांनी सांगितले.

शैक्षणिक संस्थांमध्ये ‘इन्स्टिटयूट ऑफ बैंकिंग, पर्सनल फायनान्स सिलेक्शन’ ही संस्था अव्वल स्थानी असून याद्वारे तरुणांचा सरकारी नोकरींकडचा कल दिसून येत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. लोकप्रिय सर्चच्या यादीत भारतीय रेल्वे कायम असून सेलिब्रेटिंच्या यादीत कतरीना कैफ ही सलग चौथ्या वर्षी अव्वल स्थानी आहे. या वर्षात सिनेमा विभागात ‘बॉडीगार्ड’ आणि ‘रा.वन’ या दोन चित्रपटांना सर्वाधिक पसंती मिळाल्याचे अहवालात स्पष्ट झाले आहे. व्यक्तींच्या नावाने केलेल्या सर्चेसमध्ये मुंबईकरांची सर्वाधिक पसंती फेसबुकला असून त्या खालोखाल युट्यूब, जी-मेल, याहूमेल, साँग्स डॉट पीके, रेडीफमेल, इंडियन रेल्वे, वे २ एसएमएस, ऑर्कुट आणि क्रिकइन्फो या साइट्सचा नंबर लागला आहे. तर

७वी आवृत्ती

लक्ष्यवेध

रणजित देसाई

शिवचरित्रातल्या सर्वात रोमांचक घटनेची, म्हणजेच अफझलवधाची स्फूर्तीदायक कहाणी

११०रु. पोस्टेज २५रु.

क्रिकेटमध्ये वर्ल्डकप, आयपीएल आणि सचिन तेंडुलकर यांनी वरचे नंबर पटकावले आहेत.

* २०११ ठरले हॅकर्सचे वर्ष

माहिती तंत्रज्ञान क्षेत्राच्या सुरक्षेसाठी २०११ हे वर्ष अतिशय आव्हानात्मक राहिले. त्यामुळे या वर्षाला 'द इयर ऑफ द हॅक' असेही म्हटले जाऊ लागले आहे. आतापर्यंत सॉफ्टवेअर, ईमेल याद्वारे हल्ले करणाऱ्या हॅकर्सनी यंदा सोशल मीडियाची कास धरली. मोठमोठे उद्योग आणि संघटनांच्या माहितीवर हल्ला करण्याबरोबरच स्वत:चा 'आवाज' इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठीही हॅकिंगचा वापर करणाऱ्यांमध्ये मोठी वाढ झाली.

मालवेअरची संख्या यंदा ७५ दशलक्षचा आकडा पार करेल, अशी शक्यता मॅकाफी लॅब्सने वर्तविली आहे. स्पॅमची संख्या यंदा कमी असली तरी काही विशेष 'लक्ष्य' ठेवून पाठविण्यात आलेले स्पॅम मात्र वाढले. बोटनेट्सची संख्याही यंदा जगाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात वाढली. भारतात तर मे, जून आणि जुलैमध्ये बोटनेट्स पाठविणाऱ्यांनी कहरच केला होता, अपेक्षेप्रमाणेच मोबाइल मालवेअरची संख्या या वर्षात प्रचंड वाढली. विशेषत: बाल्यावस्थेत असलेल्या अँड्रॉईडवर हल्ला करणे सोपे असल्याने यंदाचे मुख्य लक्ष अँड्रॉईडच होते.

आतापर्यंत बहुतांशी कम्प्युटर, मोबाइलपर्यंत मर्यादित असलेल्या व्हायरसची व्याप्ती या वर्षी एटीएम, वैद्यकीय उपकरणे, किओस्क आणि इतर उपकरणांपर्यंत पोहोचली. कारण एम्बेडेड सिस्टिमचा दैनंदिन वापर मोठ्या प्रमाणात वाढत आहे. गेल्या वर्षी १ अब्जाच्या आसपास असणारे हे डिव्हाइसेस २०२० पर्यंत ५० अब्जांपर्यंत पोहोचतील, असा अंदाज एरिक्सनने वर्तवला आहे. पेनड्राईव्ह, डेटाकार्ड यासारख्या डिव्हाइसच्या माध्यमातून व्हायरस इतर उपकरणांपर्यंत पोहोचेले.

* हार्ड डिस्कचा तुटवडा

कम्प्युटर्स, लॅपटॉपमध्ये हार्ड डिस्क नसणे म्हणजे चारचाकी गाडीला ॲक्सलेटर नसणे. कुठल्याही प्रकारचा डेटा स्टोअर करण्यासाठी हार्ड ड्राइव्ह असणे गरजेचे असते. पण हार्ड डिस्कचाच तुटवडा जाणवू लागला तर? यंदाच्या वर्षी जुलै महिन्यात थायलंडमध्ये आलेल्या पुराचा मोठा फटका कम्प्युटर वर्ल्डला बसला असून हार्ड ड्राइव्हच्या तुटवड्यामुळे येत्या काळात कम्प्युटर्सच्या प्रॉडक्शनवर विपरीत परिणाम होणार आहे. हार्ड ड्राइव्ह बनविणाऱ्या जगातील पहिल्या क्रमांकाच्या इंटेल कार्पोरेशनचे आगामी काळात हार्ड ड्राइव्हचा पुरवठा कमी होईल असे जाहीरच केले आहे.

जुलै महिन्याच्या शेवटी थायलंडमध्ये आलेल्या पूरात शेकडो माणसांचा मृत्यू आणि करोडोंचे नूकसान झाले होते. पण त्याचा सर्वाधिक फटका कम्प्युटर वर्ल्डला बसणार आहे. या प्रचंड पुरामुळे केवळ इंटेलच नव्हे तर सीगेटसारख्या अनेक हार्ड डिस्क तयार करणाऱ्या कंपन्यांचे माठे नुकसान झाले आहे. दरम्यान, इंटेल कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांनीच हार्ड ड्राइव्हच्या पुरवठ्यावर येत्या तिमाहीत घट होणार असल्याचे स्पष्ट केले आहे. इंटेलच्या या इशाऱ्यामुळे एचपी, डेल, लेनोवो, एरर अशा कम्प्युटर्स आणि लॅपटॉप बनविणाऱ्या कंपन्यांनीही तत्काळ पावले उचलत हार्ड ड्राइव्हचा उपलब्ध स्टॉक जपून वापरत कम्प्युटर्सच्या निर्मितीच्या वेगावर नियंत्रण आणले आहे. तसेच हार्ड ड्राइव्ह रिप्लेसमेंटवरही बंधने आणण्यात येणार आहे. परिणामी नजीकच्या काळात हा वेग मंदावून कम्प्युटर आणि लॅपटॉपच्या किंमतीही वाढण्याची शक्यता आहे. इंटलेच्या या इशाऱ्यामुळे जगभरातील कम्प्युटर बनविणाऱ्या कंपन्यांनी कम्प्युटरची निर्मितीवर बंधने आणण्यास सुरुवात केली आहे.

हार्ड ड्राइव्ह निर्मितीमधील मोठी कंपनी सिगेट टेक्नोलॉजीच्या कंपन्यांना मात्र पूराचा सरळ फटका बसला नसला तरी कंपन्यांना होणाऱ्या विविध पार्ट्सचा पुरवठा बंद झाल्याने त्यांच्याही उत्पादनावर बंधने येत आहे. उत्पादनावर कुऱ्हाड कोसळली असल्यामुळे शेअर बाजारातही इंटेलला चांगलाच फटका बसत असून कंपनीचे शेअर्स ४.८ टक्क्यांनी घटले आहेत. इंटेलसह एनविडीया या कंपनीचे शेअर्सही ३ टक्क्यांनी घसरलेत. निदान पुढील काही काळ तरी हार्ड डिस्क आणि परिणामी कम्प्युटर, लॅपटॉपच्या बाजारात अनिश्चितता असेल असे चित्र दिसत आहे.

* 'कम्प्युटर व्हायरस'द्वारे मानवी मनाचे 'हॅकिंग'

कम्प्युटरमध्ये शिरलेला व्हायरस म्हणजे संपूर्ण हार्ड डिस्कचे नुकसान, विंडोज क्रॅश होणे, सॉफ्टवेअर बंद पडणं, मग इंजिनियरला बोलवा, विंडोज लोड करा,

३री आवृत्ती

ग्रामसंस्कृती

आनंद यादव

गेल्या पन्नास वर्षात ग्रामसंस्कृतीत झालेला बदल अचूक टिपणारे पुस्तक

१७०रु. पोस्टेज २५रु.

सॉफ्टवेअर इन्स्टॉल करा... ही सगळी मेहनत आलीच; शिवाय पर्सनल डाटा जातो ते वेगळंच. एकूणच कॉम्प्युटरचा व्हायरस म्हटलं की, प्रत्येकाचीच गाळण उडते. पण, असाच एखादा व्हायरस थेट कॉम्प्युटरमधून मनात शिरला तर...

पटत नाही ना! सध्या नाहीच पटणार. पण नजीकच्या भविष्यात तुमच्या मनावर कॉम्प्युटर व्हायरसचा हल्ला होऊ शकतो. ही किमया साधता येणार आहे. 'सिंथेटिक बायोलॉजी' तंत्रज्ञानाने, सिंथेटिक बॉयोलॉजी म्हणजेच कृत्रिम जीवशास्त्र, आरोग्य तंत्रज्ञानात दिवसेंदिवस झपाट्याने प्रगती होत चालली आहे. वेगवेगळ्या असाध्य आजारांवर इलाज शोधण्यात यश मिळवतानाच क्लोनिंग, कृत्रिम अवयव निर्मिती, गुणसुत्रांची फेररचना अशा एकेकाळच्या अचाट कल्पनांनाही मानवाने वास्तवात आणले आहे. त्याच प्रगतीच्या वाटेवर सिंथेटिक बॉयोलॉजी हा महत्त्वाचा टप्पा सुरू झाला आहे. त्यानुसार केवळ कम्प्युटरचा प्रोग्राम आणि कृत्रिम डीएनएच्या साह्याने गेल्याच वर्षी केग टर्नर या अब्जाधीशाने एक जैवपेशी बनवली. त्याच तंत्रज्ञानाच्या पुढच्या टप्प्यात मानवी मनावर नियंत्रण मिळवणारा व्हायरस निर्माण करता येऊ शकेल, असा अंदाज शास्त्रज्ञांनी व्यक्त केला आहे.

'सिंथेटिक बायोलॉजीचे तंत्रज्ञान खूपच झपाट्याने विस्तारत असून, काही वर्षांत हॅकर्स एखादा व्हायरस बनवून तो मानवी मनात सोडू शकतील' असे सिंग्युलॅरिटी युनिव्हर्सिटीचे अँड्र्यू हेसल यांनी म्हटले आहे. कम्प्युटरच्या मदतीने एखाद्या व्यक्तीच्या डीएनएची प्रिंट काढून व त्यात फेररचना करणे शक्य होईल. मग, त्यात एखादा व्हायरस सोडून तो व्हायरस संबंधित व्यक्तीच्या शरीरात पुन्हा सोडण्यात येईल. त्यानंतर हा व्हायरस मेंदूवर नियंत्रण मिळवेल आणि त्या व्यक्तीला आपल्या इशाऱ्यावर नाचवेल, अशी थिअरीच हेसल यांनी मांडली आहे.

जगातील दहशतवाद मिटवण्यासाठी दहशतवाद्यांवर असा प्रयोग करून शांतता प्रस्थापित करता येईल, असे काही तज्ज्ञांचे म्हणणे आहे. पण याचा गैरवापरही होऊ शकतो, याकडे काहीजण लक्ष वेधताहेत.

* गुगलचे 'डूडल' आता विक्रीसाठी

गुगलचा 'डूडल' हा प्रकार भलताच हिट आहे. महत्त्वाच्या, सणासुदीच्या तसेच मोठ्या व्यक्तींच्या जन्मतिथी, पुण्यतिथींच्या प्रत्येक दिवशी गुगल त्यांच्या होमपेजशी काही ना काही खेळ करत असतो. यातले अनेक डूडल्स आजही लोकांच्या लक्षात आहेत. कधी नुसतीच चित्रे, कार्टून तर कधी चलतचित्रे असे वेगवेगळे प्रयोग गुगलने यापूर्वी केले आहेत. त्यादिवसापुरता दिसणारा हा डूडल नंतर दिसत नाही. पण आता प्रथमच गुगलने त्याचे हे डूडल विक्रीसाठी ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. हे डूडल

असणाऱ्या वेगवेगळ्या वस्तूंच्या मार्फत विक्री होणार आहे.

१९९८ पासून गुगलने डूडल हा प्रकार सुरू केला. कार्टून किंवा फक्त छायाचित्रांपुरतेच मर्यादित असणारे हे डूडल गेल्या काही वर्षांत पूर्ण बदलून गेले. २००९ मध्ये सर्वांत पहिल्यांदा हॅलोविनचा स्लाइडशो गुगलने आणला. त्यानंतर संगीताचे सूर काढणारे, डायलॉग म्हणणारे, स्क्रीन उल्टा-पुल्टा करणारे असे अनेक डूडल गुगलने प्रसिद्ध केले असेच तब्बल १००० डूडल्स नेटिझन्ससाठी वेबसाइटवर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे अनेक असे डूडल्स आहेत जे काही कारणामुळे प्रसिद्ध होऊ शकले नाहीत किंवा जे प्रसिद्ध झाले त्यांचे पर्यायही या वेबसाइटवर ठेवण्यात आले असल्याचे प्रॉडक्ट मॅनेजमेंटचे डायरेक्टर थिंग वॉंग यांनी सांगितले.

डूडलच्या मार्फत गुगलने खेळलेले मार्केटिंगचे डावपेच उत्कृष्ट असल्याचे नेटिझन्समध्ये बोलले जात आहे. तुम्ही एखाद्या डूडलच्या प्रेमात पडलात आणि येन-केन प्रकारेण ते तुम्हाला तुमच्या संग्रही हवेच असेल तर 'डूडल्स ऑन डिमांड'च्या माध्यमातून मिळू शकतील. टी-शर्ट, मग, स्टीकर, स्केटबोर्ड, कार्डवर गुगलचे डूडल प्रिण्ट होऊन युजर्सना देण्याची सोयही कंपनीने केली आहे. विशेष म्हणजे त्यासाठी झॅझल या 'प्रिंट ऑन डिमांड' कंपनीशी गुगलने करार केला आहे. कंपनीचे सोव्हेनियर्स तयार करण्याची पद्धत टेक्नोलॉजी कंपन्यांमध्येही रूजलेली आहे. पण डूडल्सना मार्केट मध्ये आणून गुगलने मायक्रोसॉफ्ट आणि ॲपलला स्पर्धा दिली आहे. मायक्रोसॉफ्ट मर्चंटाइज स्टोअर आणि ॲपल कंपनी स्टोअर यांच्या शर्यतीत आता 'डूडल्स ऑन डिमांड' येणार आहे.

*** गुगलही उतरणार स्वस्त टॅबच्या स्पर्धेत**

जगात स्वस्त टॅबची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या भारत सरकारच्या 'आकाश' या

६वी आवृत्ती

घरजावई

आनंद यादव

प्रसन्न, दिलखुलास विनोदाची झकास पखरण

१५०रु. पोस्टेज २५रु.

टॅब्लेटला टफ फाइट देण्यासाठी गुगलनेही स्वस्त टॅबची घोषणा केली. अर्थात 'आकाश' ग्लोबल मार्केटमध्ये उपलब्ध होणार नसला, तरी जागतिक मार्केटमध्ये यामुळे भीती निर्माण झाली आहे. 'आकाश' भविष्यात जागतिक मार्केटमध्ये येईल आणि स्पर्धा निर्माण होईल या विचारानेच अनेक कंपन्यांना बाह्या सरसावल्या आहेत. यात गुगलही मागे राहिले नसून त्यांनीही स्वस्त टॅब्लेट उपलब्ध करून देण्याची घोषणा केली आहे. अर्थात हा टॅब्लेट 'आकाश'पेक्षा स्वस्त नसला तरी सध्या मार्केटमध्ये उपलब्ध असलेल्या इतर टॅब्लेटपेक्षा नक्कीच स्वस्त असणार आहे.

गुगलचे अध्यक्ष एरिक स्विमिड यांनी नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत याची घोषणा केली. गुगलचा हा टॅब्लेट पुढील सहा महिन्यात बाजारात येणार असून याची किंमत ५०० डॉलर्सपेक्षा जास्त नसणार आहे. याआधी गुगलने नेक्सेसच्या रूपातून बाजारात टॅब्लेट आणले आहेत. या टॅब्लेटसाठी गुगल अँड्रॉइडचे नवे व्हर्जन बाजारात आणणार आहे. गुगलने नुकतेच आईस्क्रिम सँडविच हा नवा अँड्रॉइडचा ताजा ब्रँण्ड बाजारात आणला आहे, असे असताना आणखी एक नवीन व्हर्जन या स्वस्त टॅब्लेटच्या रूपाने बाजारात येणार आहे. या टॅब्लेटमध्ये नवीन क्चाडकोर प्रोसेसर वापरण्यात येणार आहे. याचबरोबर यासाठी खास इंटेलकडून 'मेडफिल्ड' नावाची चिप बनवून घेणार आहे. यामध्ये वापरण्यात येणारी टचस्क्रीन ही अत्याधुनिक असणार आहे. म्हणजे याचा वापर जाड बोट असलेल्या व्यक्तीलाही करता येणार आहे. आयफोन किंवा आतापर्यंतच्या बहुतांश टचस्क्रीन फोन्समध्ये जाड बोटे असलेल्या व्यक्तींना टाइपिंग करणे अवघड जात असे. मात्र या समस्येवर गुगलच्या नव्या टॅब्लेटमध्ये तोडगा निघू शकणार आहे. यामध्ये गुगलचे 'क्रोम' हे ब्राऊजर वापरण्यात येणार आहे. याचबरोबर मॉझिलाने नुकतेच लॉन्च केलेले अँड्रॉइडसाठीचे विशेष ब्राउजर ही या टॅब्लेटची खासियत असणार आहे.

येत्या वर्षात मार्च, एप्रिलमध्ये ॲपल आयपॅड-३ बाजारात आणणार आहे. याचवेळी आयपॅड-२च्या किंमती कमी करण्यात येणार असून ते पूर्णत: सोल्डआउट करण्याचा ॲपलचा मानस आहे.

* 'आकाश'ची ऑनलाइन भरारी

'ॲपल'च्या आयपॅड या टॅब्लेट पीसीने जगभर 'आव्वाज' केला असला, तरी भारतीय बाजारपेठेत डेटाविंड या कंपनीचा 'आकाश' हा टॅबलेट पीसी झेप घेण्याच्या तयारीत आहे. विद्यार्थ्यांसाठी अडीच हजार रूपयांत उपलब्ध करून दिल्यावर कंपनीने याचे अपग्रेडेड व्हर्जन लाँच करण्याची तयारी केली असून, 'यूबी आयस्लेट ७' नावाने बाजारात येईल. आकाशची ऑनलाइन नोंदणीही आता सुरू झाली आहे.

आकाश या टॅबलेट पीसीमध्ये फक्त वायफायची सुविधा आहे. यावरून फोन करणे, जीपीआरएस यासारख्या सुविधा नाहीत. त्याचप्रमाणे याचा प्रोसेसरही अर्म११-३६६ एमएचझेड आहे. प्रामुख्याने विद्यार्थ्यांसाठी आकाश तयार करण्यात आला आहे. मात्र, भारतीय बाजारपेठेतील टॅबलेट पीसीची संभाव्य बाजारपेठ लक्षात घेता कंपनीने नवा टॅबलेट पीसी लाँच करण्याचे पाऊल उचलले आहे. 'यूबीस्लेट ७'ला गुगलची अँड्रॉइड २.३ ही ऑपरेटिंग सिस्टिम असून, कोरटेक्स ए ८-७०० एमएचझेड हा नवा प्रोसेसर बसविला आहे. यामुळे या टॅबलेटचा स्पीड तीन पटीने वाढणार आहे. वायफाय आणि जीपीआरएस (सिम, फोन फंक्शन) सुविधा आहे. याची बॅटरी पाच तास चालणार आहे. वायफाय आणि जीपीआरएस यामुळे इंटरनेट ॲक्सेस शक्य होणार आहे.

'आकाश हा मेड-इन-इंडिया टॅबलेट आहे. चांगली आणि टॅबलेटमधील तशीच फीचर्स स्वस्तात उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे,' असे 'डेटाविंड' चे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनिल सिंग टुली यांनी सांगितले. कंपनीने 'यूबीस्लेट ७'ची किंमत तीन हजार रूपये ठेवली असून, यातील फीचर्स सर्व वयोगटातील ग्राहक वर्ग डोळ्यासमोर ठेऊन बनविण्यात आली आहेत.

*** 'ॲपल'ला देणार 'मँगो' टक्कर**

मँगो ऑपरेटिंग सिस्टिमवर आधारित 'नोकिया'चे 'ल्युमिया ८००' मॉडेल

'ॲपेल' कंपनीच्या 'आयफोन ४ एस' या ॲडव्हान्स्ड स्मार्टफोनला टक्कर देण्यासाठी मायक्रोसॉफ्टच्या मँगो ऑपरेटिंग सिस्टिमवर आधारित नोकियाचा 'ल्युमिया ८००' हा स्मार्टफोन ग्राहकांच्या हातात पडणार आहे. मोबाईलच्या स्क्रीनवर दिसणाऱ्या कंटाळवणाऱ्या 'आयकॉन्स'ऐवजी 'लाइव्ह टाइल्स'द्वारे कॉल, मेसेज, ट्विटर, ईमेल, न्यूज अशा विविध विषयांमध्ये ग्राहकाला 'अपडेट' ठेवण्याची खास सुविधा



३री आवृत्ती

द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ

चेतन भगत अनु. सुप्रिया वकील

बिझनेस, क्रिकेट आणि धर्म याभोवती गुंफलेली सुरेख कहाणी

२२०रु. पोस्टेज ३०रु.

'ल्युमिया ८००' मॉडेलमध्ये मँगो सिस्टिमच्या मदतीने करण्यात आली आहे.

स्मार्टफोन म्हणजे 'नाजूक' फोन हा समज यापुढील काळात खोटा ठरेल. कारण दणकट हँडसेट म्हणून ओळख असणाऱ्या 'नोकिया' कंपनीने स्मार्टफोनच्या बाजारात या निमित्ताने 'एन्ट्री' केली आहे. पुण्यातील 'नोकिया प्रायोरिटी' दुकानांमध्ये सर्वप्रथम ल्युमिया हँडसेट विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे. चढ्या किमतीमुळे स्मार्टफोनकडे पाठ वळविणाऱ्या ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी नोकियाने शून्य टक्के व्याजदरावर आणि तीन मासिक हप्त्यांची सुविधा देण्यासाठी एचडीएफसी, आयसीआयसीआय आणि सिटीबँक या बँकांबरोबर करार केला आहे, अशी माहिती नोकिया प्रायोरिटीचे वसिम पठाण यांनी दिली.

एचटीसी, नोकिया, सॅमसंग आणि अ‍ॅसर या कंपन्यांच्या आधारे मायक्रोसॉफ्ट कंपनीने बनविलेले स्मार्टफोन मँगो म्हणजेच 'विंडोज फोन ७.५' सिस्टिमवर चालणार आहेत. वेगवान ब्राऊझिंगसाठी 'इंटरनेट एक्सप्लोरर ९'ची सोय मँगो सिस्टिममध्ये देण्यात आली आहे. निळा, लाल आणि पिवळा या तीन रंगांमध्ये उपलब्ध असलेल्या 'ल्युमिया'मध्ये 'थ्रेड्स'चा वापर करण्यात आला आहे. थ्रेड्समुळे मोबाईल वापरणाऱ्या व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीबरोबरचे त्याचे टेक्स्ट मेसेज, इंटरनेट मेसेंजर आणि फेसबुकवरील चॅटिंग एकाच 'कॉन्व्हर्सेशन'मध्ये दिसतील.

'नोकिया ड्राईव्ह' ही थ्री-डी सॅटेलाइट नॅव्हिगेशन सिस्टिम ल्युमियामध्ये मोफत देण्यात आली आहे. डेटा कनेक्शन कार्यान्वित केल्यानंतर या अ‍ॅप्लिकेशनद्वारे संपूर्ण शहराचा नकाशा डाऊनलोड करण्याची सोय ग्राहकांना असेल, त्याचा वापर पादचारी, सायकलस्वार किंवा वाहनचालकांना रस्ता शोधण्यासाठी करता येईल. एखादे 'लोकेशन' आपल्या मित्रांबरोबर सोशल नेटवर्कवर शेअर करण्याची सोयदेखील या अ‍ॅप्लिकेशनने दिली आहे. २५ गीगाबाईट्सचे मोफत स्कायड्राईव्ह स्टोरेज ल्युमियामध्ये देण्यात आले आहे.

* हायटेक बोर्डाचे पहिले ई-बुक

एसएससी बोर्डाने दहावीला इंग्रजीसाठी सुधारित पाठ्यपुस्तकाबरोबरच ई-बुक विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील वर्षीपासून दहावीच्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाबरोबरच ई-बुकची सीडीही मोफत मिळणार आहे.

दहावीच्या सर्व विषयांसाठी ई-बुक देणे शक्य नसले तरी टप्प्याटप्प्याने इतर विषयांमध्येही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत ई-बुक उपलब्ध करण्याचा बोर्डाचा विचार आहे. दहावीला बोर्डाच्या परीक्षेने धास्तावलेल्या विद्यार्थ्यांना गाईड्स आणि खासगी कोचिंग क्लासेसच्या विळख्यातून बाहेर काढत स्वयंअध्ययनावर भर देण्याच्या

उद्देशाने ई-बुक उपयोगी ठरेल, असा विश्वास बोर्डाच्या अध्यक्ष उज्ज्वलादेवी पाटील यांनी व्यक्त केला.

‘ई-बुक म्हणजे केवळ पाठ्यपुस्तकांची संगणकीय प्रत असणार नाही. तर इंटरॲक्टिव्ह स्वरूपात अवघड शब्दांचे उच्चार करून देण्याची सोय या पुस्तकात असेल. थोडक्यात ई-बुक म्हणजे पाठ्यपुस्तक नसून, पाठ्यपुस्तकातील अवघड वाटणाऱ्या प्रकरणांची उजळणी करत स्वयंअध्ययनाचे हे प्रभावी माध्यम असेल’, असे पाटील म्हणाल्या.

इंग्रजीसह सर्वच विषयांच्या नवीन पाठ्यपुस्तकांमध्ये धडे-कविता आणि त्यानंतर प्रश्नोत्तरे या पारंपरिक मांडणीला फाटा देण्यात आला आहे. आजच्या इंटरनेटच्या युगात विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकांवर अवलंबून राहण्यापेक्षा इंटरनेटवरील माहितीविश्वातून विषयाच्या आणखी खोलात जाता यावे या उद्देशाने प्रत्येक प्रकरणानंतर वेबसाइटचे यूआरएल देण्याचे अभिनव पाऊल बोर्डाने उचलले आहे. सर्वच पाठ्यपुस्तकांमध्ये आकृती, आलेख यांचा समावेश करण्यात आला आहे. नववीची वेगवेगळ्या विषयांची ७२ तर अकरावीची ३२ नवीन पाठ्यपुस्तके बाजारात येणार आहेत.

*** शंभरी पूर्ण केलेले ‘संगीत मानापमान’ आता रंगणार नव्या रूपात!**

काकासाहेब खाडीलकर लिखित ‘संगीत मानापमान’ अजरामर करणाऱ्या बालगंधर्व, केशवराव भोसले, दीनानाथ मंगेशकर आणि छोटा गंधर्व या दिग्गज नटवर्यांच्या रांगेत आताच्या काळातील एक नाव नव्याने जोडले जाणार आहे. ते आहे दिवंगत डॉ. वसंतराव देशपांडे यांचे नातू व युवा शास्त्रीय गायक राहुल देशपांडे यांचे.

८वी आवृत्ती

स्वप्नाकडून सत्याकडे...

माधुरी शानभाग

कल्पना चावलाची आणि आपल्या उच्च ध्येयासाठी तिने केलेल्या संघर्षाची मार्गदर्शक कहाणी

६०रु. पोस्टेज २०रु.

१९११ साली सर्वप्रथम रंगमंचावर आलेल्या 'संगीत मानापमान' ने यंदा १०० व्या वर्षात पदार्पण केले आहे. शताब्दीनिमित्त ही सुप्रसिद्ध कलाकृती नव्या रूपात आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेऊन पुन्हा एकदा रसिक प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. हे आव्हान पेलले आहे, राहुल देशपांडे यांच्या 'राहे' या निर्मितीसंस्थेने, त्याला निपुण धर्माधिकारी यांचे दिग्दर्शन व गंधार संगोराम यांनी संगीत दिले आहे. नाटकातील 'धैर्यधर' ही प्रमुख व्यक्तिरेखा राहुल देशपांडे साकारणार आहेत. 'भामिनी' आणि 'लक्ष्मीधर'च्या भूमिकेत अनुक्रमे सायली पानसे आणि अमेय वाघ दिसणार आहेत. या नाटकाचा पहिला प्रयोग १८ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता कोथरूडच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात झाला.

सध्याच्या धावपळीच्या जगात युवावर्गाला भावेल अशा आधुनिक स्वरूपात हे नाटक सादर झाले. त्यासाठी मूळ पाच अंकी असणारे हे नाटक आता दोन अंकात सादर होईल. तसेच 'युवती मना', 'शूरा मी वंदिले', 'रवि मी', 'नाही मी बोलत' अशी रसिकांच्या मनावर रुंजी घालणारी २२ गाणी यात आहेत. प्रेक्षपण यंत्रणा दृकश्राव्य माध्यमांचा प्रभावी वापर या नाट्यप्रयोगात करण्यात येणार आहे. नाटकाच्या नेपथ्यात देखील एक आगळा प्रयोग करण्यात येणार असून, सेटवर कमीत कमी वस्तूंचा वापर करून प्रसंगास अनुरूप वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. अनुज देशपांडे यांनी या नाटकाचे प्रमुख वैशिष्ट्य असणाऱ्या स्पेशल इफेक्ट्सची धुरा सांभाळली आहे.

'भारंभार प्रयोग करण्यापेक्षा काही मर्यादित प्रयोग करून नाटकाची गुणवत्ता टिकविण्याचा प्रामाणिक प्रयत्न आमची पूर्ण टीम करणार आहे', असे राहूल देशपांडे यांनी म्हटले आहे. नाटकाचे पुण्यात ४ ते ५ प्रयोग होणार असून राज्यातील इतर शहरांमध्येही प्रयोग सादर होणार आहेत. राहुल देशपांडेंनी यापूर्वी नव्या ढंगात सादर केलेल्या 'कट्यार काळजात घुसली' आणि 'संशयकल्लोळ' या संगीत नाटकांना रसिकांचा चांगला प्रतिसाद लाभला. त्यापाठोपाठ आता 'संगीत मानापमान' येत आहे.

* पुण्यात सांस्कृतिक केंद्र उभारावे

कलेविषयी पुणेकरांना प्रेम असून, 'फोर डी थिएटर' त्याचेच उदाहरण आहे. अशा या पुण्यात कलामहोत्सव, समारंभ आदींकरीता सांस्कृतिक केंद्र उभारावे, अशी अपेक्षा चित्रपट दिग्दर्शक जब्बार पटेल आणि सुभाष घई यांनी व्यक्त केली.

महापालिकेने यशवंतराव चव्हाण उद्यानात उभारलेल्या 'स्व. दादासाहेब फाळके फोर डी थिएटर'चे उद्घाटन अभिनेत्री शर्मिला टागोर यांच्या हस्ते झाले. या वेळी ते बोलत होते. पुण्याला चित्रपट, नाट्य, संगीत अशा कलाक्षेत्राची परंपरा आहे, असे

सांगताना घई म्हणाले, ''पुण्यामुळेच कारकीर्द घडली. पुणेकर कलेविषयी भावनिक आहेत. शहरात भरपूर बदल झाला; पण त्यांचे कलेवरील प्रेम कायम राहिले आहे, 'फोर डी थिएटर' उभारणारे पुणे देशातील पहिले शहर ठरले आहे. महापालिका प्रशासनाच्या सकारात्मक प्रतिसादामुळेच हे घडले आहे, असे सहकार्य पुढेही राहायला हवे.''

तत्पूर्वी शर्मिला टागोर, पटेल, घई, कलादिग्दर्शक नितीन देसाई, दिग्दर्शक महेश टिळेकर, अभिनेते विजू खोटे, अभिनेत्री किशोरी अंबिये, किशोरी गोडबोले, महापौर मोहनसिंग राजपाल, उपमहापौर प्रसन्न जगताप, शरद रणपिसे, अंकुश काकडे यांनी 'फोर डी थिएटर'मध्ये 'ॲलीस इन वंडरलँड' या चित्रपटाचा आनंद लुटला. 'लहानपणात घेऊन जाणारा हा अनुभव होता', अशी प्रतिक्रिया शेवटी किशोरी गोडबोलेने दिली. 'तेरा क्या होगा कालिया' हा 'शोले' चित्रपटातील संवाद फेकत विजू खोटे यांनी उपस्थितांना खूष केले.

यावेळी आयुक्त महेश पाठक, अतिरिक्त आयुक्त अनुपकुमार यादव, नरेश झुरमुरे, नगर अभियंता प्रशांत वाघमारे, नगरसेवक वीरेंद्र किराड उपस्थित होते.

अभिनेत्री शर्मिला टागोर या कार्यक्रमाच्या प्रमुख आकर्षण होत्या. 'येथे येऊन मला खूप आनंद झाला' असे वाक्य मराठीत उच्चारून सर्वांची मने जिंकली.

*** 'पुलोत्सव-तरुणाई'**

या वर्षी नवव्या वर्षात पदार्पण करणारा पुलोत्सव तरुणाईकडून नव्या रंगरूपात सादर केला गेला. त्याचे नामकरण 'पुलोत्सव-तरुणाई' असे करण्यात आले होते. हा महोत्सव १६ ते १९ डिसेंबर दरम्यान रमणबागेतील न्यू इंग्लिश स्कूल, राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय, पाथफाईंडर तसेच मयूर कॉलनीतील बाल शिक्षण मंदिर या चार



२री आवृत्ती

उधाण वारा

तसलिमा नासरिन अनु. विलास गिते

वादग्रस्त लेखिका तसलिमा नासरिन यांच्या आमार मेयेबेला (माझं कुवांरपण) या आत्मचरित्राचा दुसरा भाग

४००रु. पोस्टेज ३०रु.

ठिकाणी साजरा झाला.

आशय सांस्कृतिक व परांजपे स्कीम्स आयोजित पुलोत्सवाची सुरुवात १६ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता पाथफाईंडर येथे कवी संदीप खरे यांच्या हस्ते पुस्तक प्रदर्शनाच्या उद्घाटनाने झाली. प्रसिद्ध व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांच्या हस्ते न्यू इंग्लिश स्कूल येथे सायंकाळी ६ वाजता पुलोत्सव-तरुणाईचे उद्घाटन झाले. यावेळी 'मंगलम्' हा मधुरा खिरे आणि सहकारी यांचा नृत्याचा कार्यक्रम झाला. ज्येष्ठ रंगकर्मी विजया मेहता यांच्या हस्ते नाना पाटेकर यांना 'पु.ल.स्मृती सन्मान आणि आर.के.लक्ष्मण यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

पुलोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी (१७ डिसेंबर) प्रसिद्ध युवा दिग्दर्शक उमेश कुलकर्णी यांच्या हस्ते लघुपट महोत्सवाचे उद्घाटन झाले. कुलकर्णी यांच्या 'थ्री ऑफ अस' या लघुपटाने महोत्सवाची सुरुवात झाली. महेश पाटणकर यांचा 'शोध कवितेचा', ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते अहमदनगर येथील 'स्नेहालय' या संस्थेस पुलोत्सव-कृतज्ञता हा सन्मान प्रदान करण्यात आला. याशिवाय अर्काइव्ह थिएटर येथे लघुपट महोत्सव, भिन्न षडज्' गानसरस्वती किशोरी अमोणकर यांच्यावरील लघुपट असे विविध कार्यक्रम या महोत्सवात झाले.

पुलोत्सवात शेवटच्या दिवशी (१९ डिसेंबर) जर्मन नाटक 'टेकिंग साईड' चे मराठी रूपांतर 'मांडिता कैवार' सादर केले गेले. यावर्षीचा पुलोत्सव जीवनगौरव पुरस्कार मंगेश पाडगावकर यांना डॉ. श्रद्धानंद ठाकूर यांच्या हस्ते दिला गेला.

*** दुर्ग साहित्य संमेलन यंदा कर्नाळ्यावर**

दुर्गप्रेमींसाठी पर्वणी ठरणारे दुर्गसाहित्य संमेलनाचे दुसरे पर्व यंदा ६,७,८ जानेवारी रोजी पनवेलजवळील कर्नाळा किल्ल्यावर रंगले. गोनीदा दुर्गप्रेमी मंडळातर्फे दर वर्षाआड या संमेलनाचे आयोजन केले जाते. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. ब्रह्मानंद देशपांडे हे या संमेलनाचे अध्यक्ष होते. तर स्वागताध्यक्षपदी ज्येष्ठ दुर्गप्रेमी आणि राजमाची ग्रामसहाय्य योजनेचे कार्यवाह मुकुंद गोंधळेकर होते.

यंदाच्या संमेलनात खुले अधिवेशन, तीन परिसंवाद, मुलाखत, चर्चासत्र, प्रदर्शन, प्रश्नमंजुषा, दुर्गविषयक कीर्तन, दुर्गदर्शन आणि समारोप सोहळा आदी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. राज्यभरातील दुर्गप्रेमी, अभ्यासक, लेखक, गिर्यारोहक यांच्या सहभागातून तयार झालेल्या गो. नी. दांडेकर दुर्गप्रेमी मंडळाच्या वतीने सन २००९ पासून दरवर्षाआड दुर्गसाहित्य संमेलनाचे आयोजन केले जाते. यापूर्वीचे पहिले संमेलन २००९ मध्ये राजमाची किल्ल्यावर आयोजित केले होते.

यंदाच्या संमेलनाचे आयोजन स्थानिक आयोजन समितीतर्फे केले गेले. या तीन

दिवसीय संमेलन सोहळ्यात उद्घाटन आणि समारोप सोहळ्याबरोबरच महाराष्ट्रातील दुर्ग संवर्धन, ऐतिहासिक दस्तऐवजांतून घडणारे दुर्गदर्शन आणि 'गोनीदां'च्या दुर्गविषयक कादंबऱ्या या तीन विषयांवर परिसंवाद झाले. खुले अधिवेशन, चर्चासत्राबरोबरच या संमेलनात राष्ट्रीय कीर्तनकार चारूदत्त आफळे यांच्या 'दुर्गमाहात्मय' या विषयावर कीर्तन झाले. या संमेलनाच्या निमित्ताने प्रसिद्ध चित्रकार भास्कर सगर यांनी काढलेल्या महाराष्ट्रातील दुर्गांच्या चित्रांचे प्रदर्शनही भरविण्यात आले. कर्नाळा किल्ल्याच्या साक्षीने साकारलेल्या 'गोनीदां'च्या 'जैत रे जैत' या कादंबरीचे अभिवाचन, स्थानिक आदिवासींचे नृत्य, कर्नाळा दुर्गदर्शन व अरण्यवाचन, दुर्गांवर आधारित प्रश्नमंजुषा आदी कार्यक्रमांचेही आयोजन केले होते. या संमेलनामध्ये डॉ. देशपांडे यांच्याशिवाय माजी संमेलनाध्यक्ष शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे हेही सहभागी झाले होते.

*** टागोरांच्या वहीला १,७०,५०० डॉलरची किंमत**

नोबेल पारितोषिक विजेते, थोर भारतीय लेखक रवींद्रनाथ टागोर यांच्या एका वहीला अमेरिकेतील लिलावात १,७०,५०० डॉलरची किंमत मिळाली आहे. १९२८ सालच्या या वहाचे 'सॉद्बे' या संस्थेने या लिलावाचे आयोजन केले होते.

या वहीमध्ये टागोरांच्या १२ कविता व बंगालीतील काही गीते आणि त्यांच्या प्रकाशित साहित्याच्या हस्तलिखितांतील काही भाग आहे.

टागोरांनी त्यांच्या एका मित्राला ही वही १९३० च्या दशकाच्या सुरवातीला भेट म्हणून दिली होती. या वहीतील गीतापैकी दोन गीते नंतर 'चित्रांगदा' या नृत्यनाटिकेत समाविष्ट करण्यात आली. शिवाय त्यांच्या 'गिताबितन' या गीतांचे संकलन असलेल्या पुस्तकातील तीन गीतांची हस्तलिखिते या वहीत आहेत.

ठिकरी

८वी आवृत्ती

व. पु. काळे

नियतीच्या खेळात वेगवेगळ्या परिस्थितीत ठिकरीप्रमाणे फेकल्या गेलेल्या एका मनस्वी मुलीची विलक्षण कहाणी

७०रु. पोस्टेज २०रु.

∗ संगीत क्षेत्राने चित्रकलेला स्वीकारलेच नाही

ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे यांची खंत

चित्रकलेबद्दलची जागृती साहित्य क्षेत्रात दिसत असली तरी संगीताच्या क्षेत्राने या कलेला स्वीकारले नसल्याची खंत व्यक्त करत ही परिस्थिती बदलली पाहिजे, असे मत ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे यांनी व्यक्त केले.

आशय सांस्कृतिकतर्फे आयोजित करण्यात आलेल्या पुलोत्सवामध्ये किराणा घराण्याचे गायक जयतीर्थ मेबुंडी यांचा पुलोत्सव तरुणाई सन्मान देऊन परांजपे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. पुणेरी पगडी, उपरणे, सन्मानचिन्ह, मानपत्र आणि २५ हजार रूपये असे त्याचे स्वरूप आहे. आशयचे सतीश जकातदार आणि वीरेंद्र चित्राव उपस्थित होते.

एका संगीतकाराचा चित्रकाराच्या हस्ते सत्कार होतो, ही मोठी गोष्ट आहे. संपूर्ण महाराष्ट्रात साहित्य क्षेत्रामध्ये चित्रकला दिसत असली तरी संगीताच्या क्षेत्रात ती दिसत नाही. संगीताच्या जवळचा चित्रकलेचा भाग कोणता असेल तर तो भावस्पर्शी चित्रकला आहे. मात्र, संगीताच्या क्षेत्राने चित्रकलेला स्वीकारलेले नाही, ही परिस्थिती बदलायला हवी. संगीतातील लोक चित्रकलेत जातात आणि साहित्यिक या दोघांचा मेळ साधतात, हे चित्र पुण्यात दिसायला हवे.

पु. ल. देशपांडे सर्व कलांबाबत जागरूक होते. कलावंताना आपुलकीने वागवायचे. पु. लं.च्या नावाने देण्यात येणारा हा पुरस्कार मोठा असल्याने परांजपे यांनी नमूद केले.

‘पु.ल.देशपांडे मोठे साहित्यिक, संगीतकार होते. किराणा घराण्याबद्दल त्यांना प्रेम होते. पंडित भीमसेन जोशींच्या ते जवळ होते. आतापर्यंत आपल्याला खूप पुरस्कार मिळाले असले तरी त्यांच्या नावाने मिळणारा पुरस्कार आपण वेगळा मानतो. संगीताचा भरपूर रियाज करून रसिकांसमोर आपली कला सादर करणार आहे,’ असे जयतीर्थ मेबुंडी म्हणाले.

∗ ‘मिनी संमेलन’

दरवर्षी विविध भागांत होणाऱ्या साहित्य संमेलनांच्या धर्तीवरच राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये मराठी भाषेचा प्रसार करण्यासाठी राज्य सरकारतर्फे ठिकठिकाणी ग्रंथोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. मराठी भाषा विभाग, राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने २३ ते २५ डिसेंबरदरम्यान पुण्यात हा ग्रंथोत्सव झाला.दर्जेदार साहित्य आणि विविध विषयांवरील ग्रंथ वाचकांना एकाच

ठिकाणी उपलब्ध व्हावेत, या हेतून हा ग्रंथोत्सव आयोजित केला होता. टिळक स्मारक मंदिरच्या प्रांगणात हा ग्रंथोत्सव झाला. पुस्तक प्रदर्शनासह ग्रंथ दिंडी, काव्यवाचन, परिसंवाद, कथाकथन, नाटिका अशा साहित्यिक उपक्रमांचाही समावेश यामध्ये करण्यात आला होता.

पुण्यातील ग्रंथोत्सवाचे उद्घाटन साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. जिल्हाधिकारी विकास देशमुख कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. त्याचदिवशी सायंकाळी ६ वाजता 'काव्य संध्या' हा काव्य-वाचनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

'जागतिकीकरणाचे आव्हान पेलण्यास मराठी साहित्य समर्थ आहे का?' या विषयावर परिसंवाद भरविण्यात आला. 'ग्रामीण कथा : भाष्य आणि कथाकथन' हा कार्यक्रम झाला. समारोपाच्या दिवशी 'मुलगी झाली हो' ही नाटिका सादर केली गेली. तर 'नोबेल ललना' या कार्यक्रमाने ग्रंथोत्सवाचा समारोप झाला.

*** लेखक आहात, तर रोज लिहिलेच पाहिजे**

''लेखन ही एक शिस्तबद्ध प्रक्रिया आहे. एखाद्या दिवशी आपल्याला अद्भुत शक्ती लेखनाची प्रेरणा देईल, याची वाट पाहण्यात अर्थ नाही. लेखक आहात, तर रोज लिहिलेच पाहिजे,'' असा कानमंत्र दिला लेखक विल्बर स्मिथ यांनी.

लॅंडमार्कने आयोजिलेल्या कार्यक्रमात विल्बर स्मिथ पुण्यातील वाचकांना भेटले. जगभर असलेली लोकप्रियता, ३२ पुस्तकांचा लेखक, वाचकांचा मिळणारा उदंड प्रतिसाद यामुळे अत्यंत सहजतेने व सुंदरतेने त्यांनी वाचकांशी संवाद साधला. पहिल्या काही पुस्तकांना वाचकांचा अजिबात न मिळालेल्या प्रतिसादापासून ते मृत्यूनंतर थडग्यात स्मिथ यांची पुस्तके ठेवावी, अशी इच्छा व्यक्त करणारा वाचक,

९वी आवृत्ती

पुण्यभूमी भारत

सुधा मूर्ती अनु. लीना सोहोनी

मानवी स्वभाव आणि प्रवृत्तींच्या विविध पैलूंचे नेमके चित्रण

१३०रु. पोस्टेज २५रु.

असे अनेक अनुभव त्यांनी अत्यंत मनमोकळेपणे मांडले.

लेखक व्हायचे होते; पण कोणी प्रोत्साहन दिले नाही. विशेषत: वडिलांनी तर खूपच विरोध केला. लेखक झाल्यावर माझ्या उदरभरणाचे काय होणार, हा प्रश्न वडिलांसमोर असल्याचे दिलखुलासपणे सांगत ते म्हणाले, ''वडिलांच्या आग्रहामुळे मी अकाउंट विषय शिकलो. त्याचबरोबर लेखनही केले. पहिल्या पुस्तकाला मिळालेला प्रतिसाद पाहून वडिलांचा निर्णय बरोबर असल्याचे मला पटले.''

लेखनाच्या सुरवातीच्या टप्प्यात वाचकांचे आलेले विनोदी अनुभवही त्यांनी सांगितले. ते म्हणाले, ''एकदा विमानतळावर एक महिला माझे पुस्तक वाचत होती. ते पाहून मी रोमांचित झालो. आपले पुस्तक कोणीतरी वाचत आहे, याचा आनंद खूप मोठा होता. त्यामुळे त्या महिलेकडे गेलो. सुरवातीला तिचे लक्ष नव्हते. मग, तिला अभिवादन करून म्हटले, 'मॅडम, तुम्ही माझे पुस्तक वाचत आहात...'' त्यावर ती उतरली, ''माफ करा, इथे पडलेले दिसले म्हणून मी वाचत होते. हे घ्या तुमचे पुस्तक.''

इजिप्त संस्कृती, दक्षिण आफ्रिकेतील संस्कृती, तेथील लोक यांच्यावर लिहिलेल्या कादंबऱ्या केवळ गाजल्या नाही; तर अनेकांना जगण्याची प्रेरणा देणाऱ्या ठरल्या. याचाही अनुभव त्यांनी सांगितला. ते म्हणाले, ''ऑस्ट्रेलियात असताना एक अपंग माणूस मला भेटायला आला. एका अपघातानंतर त्याला अपंगत्व आले होते. तो जिद्द हरला होता; पण पुस्तक वाचल्यामुळे पुन्हा जगण्याची उमेद मिळाली, विविध देशांत हिंडलो, पुन्हा काम करू लागलो, असे त्यांनी सांगितल्यावर मला लेखनाचे सार्थक झाल्यासारखे वाटले.''

* सूर्यसिद्धांतीय देशपांडे पंचांगाचे प्रकाशन

महाराष्ट्रातून निघणाऱ्या पहिल्या सूर्यसिद्धांतीय देशपांडे पंचांगाचे प्रकाशन पुण्यात झाले. संगणक अभियंता म्हणून पदवी प्राप्त केलेल्या ज्योतिषी गौरव देशपांडे या युवकाने या पंचांगाची निर्मिती केली आहे. पुण्याच्या अक्षांश-रेखांशावर आधारित हे पंचांग असून महाराष्ट्र सोडून इतर राज्यांमध्ये सर्व धार्मिक कार्यासाठी सूर्यसिद्धांतीय पंचांगाचाच वापर करण्यात येत असल्याचे देशपांडे यांनी सांगितले.

वेदशास्त्रोत्तेजक सभा येथे महापौर मोहनसिंग राजपाल, डॉ. विजय भटकर, वेदमूर्ती प्रकाशभट्ट दंडगेशास्त्री, कल्याणी नामजोशी, चारूदत्त आफळे, वाराणसीचे पं. गणेश्वरशास्त्री द्रविड आदींच्या उपस्थितीत या पंचांगाचे प्रकाशन झाले. सूर्यसिद्धांतीय पंचांग उपलब्ध नसल्यामुळे अशा पद्धतीच्या पंचांगाची आपण निर्मिती केल्याचे देशपांडे म्हणाले.

* रजनीच्या चरित्राचे प्रकाशन १२.१२.१२ला

आपल्या अनोख्या 'स्टायली'ने लोकप्रियतेच्या शिखरावर पोचलेल्या सुपरस्टार रजनीकांतचे पहिले अधिकृत चरित्रही सर्वार्थाने अनोखे ठरणार आहे. चरित्राच्या प्रकाशन तारखेपासूनच हे अनोखेपण सुरू होईल. शंभर वर्षात एकदाच येणाऱ्या १२.१२.१२ या तारखेला हे चरित्र प्रकाशित होणार आहे. याचदिवशी त्यांचा वाढदिवसही असतो.

रजनीकांत यांचे चित्रपटसृष्टीतील स्थान एकमेव आहे. त्यांचे हे अनोखेपण लक्षात घेऊनच प्रकाशकांनी ही तारीख निवडली असावी. या वर्षीच्या १२ डिसेंबरला रजनीकांत वयाची ६२ वर्षे पूर्ण करणार आहेत, त्यानिमित्त 'पेंग्विन बुक्स'तर्फे त्यांचे चरित्र प्रकाशित करण्यात येणार आहे. चित्रपट समीक्षक नमन रामचंद्रन यांनी लिहिलेले हे चरित्र रजनीकांत यांचे पहिले व एकमेव अधिकृत चरित्र असल्याचे प्रकाशकांनी म्हटले आहे.

चित्रपटसृष्टीतील पदार्पणापासून 'राणा' या आगामी चित्रपटापर्यंतचा रजनीकांत यांच्या अफाट कारकिर्दीचा सर्वांगीण आढावा या पुस्तकात घेण्यात आला आहे. त्यांच्या व्यक्तिगत व राजकीय जीवनावरही या पुस्तकात प्रकाश टाकण्यात आला आहे. सुपरस्टारची प्रतिमा असूनही व्यक्तिमत्वातील नम्रता कायम ठेवलेल्या रजनीकांत यांच्या करिष्म्याचा शोधही लेखकाने घेतला आहे, असे प्रकाशकांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

* 'यशदा'मध्ये पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन संस्थेतर्फे (यशदा) पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या लेझीम सभागृहात हे प्रदर्शन पार पडले या निमित्ताने व्याख्यानमालेचेही आयोजन करण्यात आले होते.



२री आवृत्ती

सुखद बालसंगोपन

डॉ. रत्नावली दातार

बाळलीलांतून बाळाचे मनोगत जाणून घ्या. बाळाची भाषा समजून घेऊन शिका. बाळाचे संगोपन सुखद करा, बाळासाठी आणि तुमच्यासाठीही.

७०रु. पोस्टेज २०रु.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते सकाळी १० वाजता पुस्तक प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्यात आले.

शासकीय प्रकाशकांचे प्रदर्शन भरविण्यास गेल्या वर्षीपासून सुरवात झाली. हे या प्रदर्शनाचे दूसरे वर्ष आहे. यात शासकीय मुद्रणालय, नॅशनल बुक ट्रस्ट, महाराष्ट्र उद्योजकता विकास मंडळ, समाजकल्याण, आरोग्य विभाग, राज्य शिक्षण परिषद, जनगणना कार्यालय, राज्य मराठी विकास संस्था अशी विविध प्रकाशने सहभागी झाले होते.

अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आणि 'सकाळ'चे मुख्य संपादक उत्तम कांबळे तसेच अभिनेते राहुल सोलापूरकर यांचे व्याख्यानही ठेवण्यात आले होते.

*** एव्हरेस्ट मोहीम प्रसारगीताचे प्रकाशन**

'गिरिप्रेमी'च्या एव्हरेस्ट मोहिमेची वातावरणनिर्मिती करण्यासाठी अनोख्या संकल्पनेतून प्रसारगीत रचण्यात आले आहे. 'शिवशाहीर' बाबासाहेब पुरंदरे यांचा सहभाग असलेल्या या प्रसारगीताच्या प्रकाशनाचा कार्यक्रम कृष्णसुंदर लॉन्स (म्हात्रे पुल) येथे पार पडला. स्मरणिकेचेही प्रकाशन झाले.

मोहिमेचा नेता उमेश झिरपे यांनी सांगितले की, प्रसारगीत तीन मिनिटांचे आहे, ऑडिओ-व्हिडिओ अशा दोन्ही स्वरूपात हे आहे. प्रसिद्ध शास्त्रीय गायक राहुल देशपांडे त्याचे प्रकाशन करतील. स्मरणिकेचे प्रकाशन उद्योजक आनंद जोग आणि सुधीर दरोडे यांच्या हस्ते झाले.

उमेशने बाबासाहेब पुरंदरे यांचे आवर्जून आभार मानले. त्याने सांगितले की, 'अलीकडे फार व्यस्त असूनही बाबासाहेबांनी चित्रीकरणात भाग घेण्यासाठी वेळ काढला. गिर्यारोहक हे जणू काही मावळे आहेत आणि ते 'मोहिमे'वर निघाले आहेत. बाबासाहेब कुणाला हेल्मेट, कुणाला रोप, कुणाला आईस ॲक्स अशी विविध 'आयुधे' देऊन सज्ज करीत आहेत आणि मुख्य म्हणजे शुभाशिर्वाद देत आहेत, अशी गीताची संकल्पना आहे. मोहिमेत प्रत्यक्ष चढाई करणारे आठ आणि त्यांना साथ देणारे १२ असे सर्व वीस सदस्य चित्रीकरणात सहभागी झाले. प्रत्येकासाठी चित्रीकरणातील सहभाग हा भारावून टाकणारा अनुभव होता. आतापर्यंत आम्ही इतक्या मोहिमा केल्या, तेव्हा घरी पारंपरिक पद्धतीने ओवाळणे आणि परत आल्यावर रेल्वे स्थानकावर मोजक्या हितचिंतकांचे हार-तुरे घेऊन येणे इतकाच प्रतिसाद आम्हाला ठाऊक होता. या प्रसारगीतामुळे आमच्या मोहिमेविषयीच नव्हे, तर एकूण गिर्यारोहणाविषयी जनजागृती होईल, असा विश्वास वाटतो.'

प्रसारगीत तीन मिनिटांचे असले तरी ते जास्तीत जास्त परिणामकारक ठरावे आणि सामान्य नागरिकांमध्ये मोहिमेविषयी जिव्हाळा निर्माण व्हावा आणि त्याद्वारे 'जनता जनार्दनाचे आशीर्वाद' मिळावेत म्हणून 'गिरीप्रेमी'ने फार मेहनत घेतली. 'गिरीप्रेमी'च्या आतापर्यंतच्या 'फिल्म' आणि महितीपटांच्या निर्मितीत पुढाकार घेतलेले छायाचित्रकार मिलिंद भणगे यांनी चित्रीकरण केले आहे. विश्रामबागवाडा, खाटपेवाडीतील डोंगररांग तसेच कात्रजचा डोंगर आणि पर्वती अशा ठिकाणी चित्रीकरण करण्यात आले आहे.

*** सर्वच संमेलनांना 'अर्थसाहाय्य'**

''साहित्य, नाट्य, शाहिरी अशा वेगवेगळ्या विषयांवर महाराष्ट्रात महत्त्वपूर्ण संमेलने होतात. यातील काही संमेलनांस राज्य सरकारने आजवर आर्थिक मदत केली आहे. मात्र, सर्वच संमेलनांना योग्य न्याय देण्यासाठी लवकरच नवे आर्थिक धोरण तयार केले जाणार आहे,'' अशी घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री संजय देवतळे यांनी येथे केली.

महाराष्ट्र शाहीर परिषदेतर्फे आयोजित पहिल्या मराठी शाहिरी साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन देवतळे यांच्या हस्ते झाले. 'ठराविक साहित्य संमेलनासच आर्थिक मदत केली जाते', अशी टीका राज्य सरकारवर होते. या पार्श्वभूमीवर देवतळे यांनी ही घोषणा केली. या प्रसंगी संमेलनाध्यक्ष शाहीर राजाराम जगताप, सांस्कृतिक कार्यसंचालक आशुतोष घोरपडे, स्वागताध्यक्ष लक्ष्मण पासलकर, परिषदेचे अध्यक्ष दादा पासलकर आदी उपस्थित होते.

देवतळे म्हणाले, ''नव्या पिढीला प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात 'बाल महोत्सव' घेण्यात येणार आहे. तसेच वृद्ध कलावंताचे मानधन वाढवण्याचा निर्णयही घेतला जाईल. मात्र या मानधनाची तरतूद नव्या आर्थिक वर्षात होईल. शाहिरी ही कधीही

१०वी आवृत्ती

रंगपंचमी

व. पु. काळे

आपल्या अवती भोवतीचेच जग आपल्या समोर उभे करणारे खुसखुशीत शैलीतील सहज लेखन

२००रु. पोस्टेज ३०रु.

न संपणारी कला आहे. पण आजच्या संगणक आणि ‘ऑर्केस्ट्रा’च्या युगात शाहिरीची गोडी वाढवण्यासाठी कलावंतांनी नवी आव्हाने पेलायला हवीत.’’

जगताप म्हणाले, ‘‘शाहिरांनी हलकी-फुलकी गाणी गाऊ नयेत. मेलेल्या मनाला जागे करणारे, देशाबद्दल प्रेमाची भावना वाढवणारे, प्रबोधन करणारे वीराचे गाणे गायला हवे. चरित्र सांगून चारित्र्य वाढवण्याचे काम शाहीर करतात. मात्र, शाहिरी कलावंतांकडे सरकार आणि समाजाचे दुर्लक्ष होत आहे.’’ शाहिरांच्या सर्व संघटनांनी एकत्र यावे, अशी अपेक्षा घोरपडे यांनी व्यक्त केली.

*** गझल हा प्रकार मराठीत रुजलाच नाही : द.भि.कुलकर्णी**

‘‘मराठी रसिक विवेक विसरून ‘रोमँटिक’ होऊ शकत नाही. कवितेच्या रसास्वादात उधळून देऊ शकत नाही. त्यामुळेच गझलसारखा भावोत्कट काव्यप्रकार मराठी रसिकांमध्ये खऱ्या अर्थाने रुजू शकला नाही,’’ असे मत ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले. साहिल फाउंडेशन व रंगतसंगत प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा ‘भाऊसाहेब पाटणकर स्मृती पुरस्कार’ डॉ. अविनाश सांगोलेकर यांना कुलकर्णी यांच्या हस्ते देण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. डॉ. अविनाश अवलगावकर, ॲड. प्रमोद आडकर, मनीष खाडीलकर आदी यावेळी उपस्थित होते. कुलकर्णी म्हणाले की, भाऊसाहेब पाटणकर यांनी मराठी शेरोशायरी रूजविण्यासाठी प्रयत्न केले. सुरेश भट यांनी तर विरोधाची वादळे अंगावर घेऊन आयुष्याचे मोल दिले. या दोघांनाही प्रसिद्धी मिळाली; परंतु वाङ्मयीन प्रतिष्ठा मात्र मिळाली नाही. मृण्मयी भजक यांनी सूत्रसंचालन केले.

*** अर्थपूर्ण चित्रपटच जवळचे वाटतात**

दिग्दर्शक प्रियदर्शन यांना ‘झेनिथ एशिया सन्मान’ प्रदान

‘‘चित्रपटाच्या निर्मिती प्रक्रियेत स्वातंत्र्य असेल आणि हृदयापासून काम करण्याची तयारी असेल, तर अर्थपूर्ण चित्रपट तयार होऊ शकतो. मात्र, अर्थपूर्ण किंवा वास्तववादी चित्रपट तयार करताना दिग्दर्शकाचा खरा कस लागतो. निव्वळ मनोरंजनापेक्षाही शेवटी असेच चित्रपट अधिक जवळचे ठरतात,’’ असे प्रतिपादन दिग्दर्शक प्रियदर्शन यांनी केले.

‘हेराफेरी’, ‘भूलभुलैया’, ‘गरम मसाला’, ‘हंगामा’ अशा एकाहून एक सरस चित्रपटांमधून प्रेक्षकांना खळखळून हसविणाऱ्या प्रियदर्शन यांना सातव्या आशियायी चित्रपट महोत्सवात अभिनेते विक्रम गोखले यांच्या हस्ते ‘झेनिथ एशिया सन्मान’ प्रदान करण्यात आला. पुणेरी पगडी, सन्मान चिन्ह, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. दिग्दर्शक मनीष कोरडे, आयोजक वीरेंद्र चित्राव, सतीश जकातदार, गोविंद

ठक्कर या प्रसंगी उपस्थित होते.

राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार मिळालेल्या 'कांजीवरम्'ने अर्थपूर्ण चित्रपटाच्या माझ्या अपेक्षा पूर्ण झाल्या. याबाबत मी अत्यंत समाधानी आहे. श्याम बेनेगल यांच्यापासून अनेकांनी या चित्रपटाचे कौतुक केले. हे माझ्यासाठी अविस्मरणीय आहे, असे प्रियदर्शन यांनी सांगितले. कोणत्याही कलाकृतीची समीक्षा होणे महत्त्वाचे आहे. माझ्या कलाकृतीचा पहिला समीक्षक मी स्वत:च आहे. समीक्षेमुळे कलाकारांना सुधारणा होतात. त्याला चुका, कमतरता समजतात. याशिवाय कलाकृती अधिकाधिक 'हेल्दी' होते. या दृष्टिकोनातून मी समीक्षेला अत्यंत महत्त्व देतो, असेही ते म्हणाले.

भाषेवर प्रभुत्व, वक्तशीरपणा, माध्यमाची जाण अशा कलागुणांमुळे प्रियदर्शन यांची वेगळी ओळख आहे, असे गोखले यांनी सांगितले. सुप्रिया चित्राव यांनी सूत्रसंचालन केले.

'चित्रपट हे संवादाचे प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे बुद्धिवादी लोकांपुरते ते मर्यादित असू नये. चित्रपट तयार करताना सर्वसामान्यांचाही विचार व्हावा,'' असे प्रियदर्शन यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. तमीळ, हिंदी, तेलगू, कन्नड चित्रपटांत काम करणारे अभिनेते मोहनलाल हे माझे सर्वांत आवडते कलाकार आहेत. त्यांच्या अभियनाची पद्धत निराळी आणि प्रभावी आहे. झोया आणि फरहान यांचा 'जिंदगी ना मिलेगी दोबारा' हा सर्वोत्तम चित्रपट असल्याचेही ते म्हणाले.

*** संमेलनस्थळास डॉ. आंबेडकर यांचे नाव**

चंद्रपूर येथे फेब्रुवारीत भरणाऱ्या ८५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी उभारण्यात येणाऱ्या साहित्य नगरीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात आले असून विविध प्रवेशद्वारे आणि मंडपांना देण्यात येणाऱ्या नावांतून चंद्रपूरातील दिवंगत लोकनेते तसेच साहित्यिकांच्या स्मृती जागवल्या गेल्या.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ आयोजित हे संमेलन राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयात पार पडले इथे उभारण्यात येणाऱ्या साहित्य नगरीला चंद्रपूर शहराच्या रचनेनुसार चार प्रवेशद्वारे होती. यातील मुख्य प्रवेशद्वारास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे नाव असून अन्य प्रवेशद्वारांस ददासाहेब देवतळे, बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे, चंद्रपूर जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष अब्दुल शफी या चंद्रपूरच्या लोकनेत्यांची नावे देण्यात आली होती. चंद्रपूरच्या ऐतिहासिक वारशाला अनुसरून गोंडकालिन वास्तूवैभावचे दर्शन घडवणारी सजावट या परिसरात केली गेली होती.

संमेलनाच्या मुख्य सभागृहास माजी मुख्यमंत्री दादासाहेब कन्नमवार यांचे नाव देण्यात आले असून या सभा मंडळाच्या व्यासपीठाला १८५७ च्या गोंडवनातील स्वातंत्र संमेलनाचे अग्रणी वीर बाबूराव सेडमाके यांचे नाव देण्यात आले होते. संमेलनात पत्रकारांसाठी असणाऱ्या कक्षाला संमेलनाचे पूर्वाध्यक्ष दिवंगत राम शेवाळकर यांचे नाव देण्यात आले होते.

* 'हुजूरपागे'त रंगले साहित्य संमेलन

ग्रंथदिंडी... ग्रंथप्रदर्शन... साहित्य संमेलनासारखाच सर्व थाटमाट... हे सर्व दृश्य मोठ्यांच्या साहित्य संमेलनासारखेच असले तरी हे होते शालेय विद्यार्थिनींचे संमेलन! एचएचसीपी हायस्कूल, हुजूरपागेच्या शालेय मराठी साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन प्रवासवर्णनकार डॉ. मीना प्रभू यांच्या हस्ते करण्यात आले.शालेय स्तरावर राबविण्यात आलेल्या या साहित्य संमेलनाचे यंदाचे हे ७ वे वर्ष होते. दोन दिवस चाललेल्या या संमेलनात जन गण मनचे शताब्दी वर्ष, कुसुमाग्रजांची जन्मशताब्दी, संत तुकारामांचे जन्मचतु:शताब्दी हे विषय प्रमुख होते. या विषयांवर आधारित अभंग, साहित्य तसेच काव्यचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. दोन सत्रात चालणाऱ्या या संमेलनात डॉ. मीना प्रभू, लेखक शिवराज गोर्ले यांचे मार्गदर्शन विद्यार्थिनींना लाभले तर दुसऱ्या दोन सत्रात लेखक अनंत भावे आणि कवयित्री अश्लेषा महाजन यांचे मार्गदर्शन विद्यार्थिनींना लाभले. यावेळी संस्थेच्या विश्वस्त शकुंतला नवाथे, सचिव विद्या महाशब्दे, कोषाध्यक्षा शामा वाघ, मुख्याध्यापिका अलका काळे, संयोजिका सुधा कांबळे उपस्थित होत्या.

* शुद्ध हिंदी नको; आता 'हिंग्लिश' वापरा!

'हिंग्लिश'ला आता थेट केंद्र सरकारनेच अप्रत्यक्ष मंजुरी दिली आहे. अवघड 'हिंदी' शब्दांच्या जागी 'हिंग्लिश' (हिंदी आणि इंग्लिश) शब्द वापरण्याच्या सूचना गृह खात्याच्या राज्यसभा विभागाने सर्व अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. अतिशुद्ध हिंदीमुळे सर्वसामान्य लोकांना विषयाची रूची वाटत नाही, असे निरीक्षण गृह खात्याने नोंदविले आहे.अवघड हिंदी शब्दांना पर्यायी असे सोपे इंग्रजी शब्द देवनगरी लिपीमध्ये सरकारी निवेदनात वापरण्यास सुरवात करावी, असे गृह खात्याने म्हटले आहे. भाषा अधिक लोकप्रिय आणि समजेल अशी बनविण्यासाठी पर्यायी लोकप्रिय हिंदी-इंग्रजी शब्दांचा वापर करण्यास सरकारने प्रोत्साहन दिले आहे. 'सरकारी कामकाजामध्ये भाषांतरासाठी हिंदीचा वापर करणे कठीण आणि गुंतागुंतीचे ठरते आहे. भाषांतरात पर्यायी इंग्रजी शब्दांचा वापर तातडीने सुरू करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक शब्दाचा हिंदी प्रतिशब्द वापरणे म्हणजे भाषांतर नव्हे,' असा खुलासा या खात्याने केला आहे. 'लोकप्रिय उर्दू, इंग्रजी आणि इतर प्रादेशिक भाषांतील

शब्दांचा सरकारी पत्रव्यवहारामध्ये वापर वाढविला पाहिजे. शुद्ध हिंदीचा वापर साहित्यामध्ये ठीक आहे; तथापि प्रत्यक्षातील कामासाठी 'मिक्स्ड' भाषेचा वापर व्हावा,' अशी अपेक्षाही सरकारने व्यक्त केली आहे. लोकप्रिय इंग्रजी शब्दांना प्रतिशब्द वापरण्याऐवजी तेच शब्द देवनागरी लिपीमध्ये वापरणे अधिक योग्य आहे, असेही भाषा विभागाने म्हटले आहे.कुठलीच भाषा सोपी किंवा अवघड असत नाही. तसे भाषाशास्त्रात कधी मनात नाहीत. भाषा फक्त दूरची किंवा जवळची असते. भारतात हिंदी आणि इंग्रजी दोन्ही व्यवहारातील भाषा आहेत. सरकारी विभागांनी दोन्ही भाषांमध्ये स्वतंत्रपणे सूचना देणे कधीही चांगले.

'प्रत्याभूती'सारख्या क्लिष्ट शब्दाला 'गॅरेंटी', 'कुंजीपटल' या शब्दाला 'कीबोर्ड', 'संगणक' ऐवजी 'कॉम्प्युटर' शब्द वापरावा, अशी उदाहरणे गृह खात्यातील सरकारी भाषा विभागाने दिली आहेत.

❒

आगामी

सहा संशयित

मूळ लेखक
विकास स्वरूप
अनुवाद
वन्दना अत्रे

४५०रु. पोस्टेज ३०रु.

हत्येतही जातीची उतरंड असते.
विकी राय, एका अत्यंत प्रतिष्ठित मंत्र्याच्या मुलाचा
त्यानेच आयोजित केलेल्या झगमगत्या पार्टीत त्याचा खून होतो.
पार्टीला आलेल्या पाहुण्यांपैकी एकाने हा खून केला आहे.
सगळे पाहुणे अतिशय प्रतिष्ठित;
पण त्यात पोलिसांना सहा अशा तऱ्हेवाईक व्यक्ती आढळतात
ज्यांच्याकडे पिस्तूल होते आणि मनात विकी रायच्या हत्येची छुपी,
पण धगधगती प्रेरणा!
भारतातील एक नामवंत शोधपत्रकार अरुण अडवाणी
याने खुनी कोण याचा छडा लावण्याचे व्रतच घेतले आहे!
या प्रयत्नामध्ये आपल्यासमोर उलगडत जातो,
तो त्या सहा व्यक्तींच्या आयुष्याचा बहुरंगी, कधी सुन्न करणारा,
तर कधी मन हेलावणारा जीवनपट!
पण अडवाणी तरी विश्वासार्ह आहे?
का काही वेगळा हेतू, अजेंडा त्याच्याही मनात आहे?

आगामी

काळी

मूळ लेखिका

पर्ल बक

अनुवाद

भारती पांडे

२८०रु. पोस्टेज ३०रु.

अत्यंत जीवघेण्या संघर्षानं व्यापलेलं पण त्याचवेळी अत्यंत संथ असणारं वांगलुंग या चिनी शेतकऱ्याचं लांबलचक आयुष्य हा या कादंबरीचा गाभा आहे. वांगलुंगच्या लग्नाच्या दिवसापासून या कादंबरीची सुरुवात होते,
ती त्याचे प्रौढ, सुशिक्षित, शहरी मुलगे त्याच्या मरणाची वाट पाहात आहेत, इथं ती संपते.
या मधल्या मोठ्या कालखंडात जमिनीवर प्रेम करत करत समृद्ध आयुष्याचे टप्पे ओलांडणारा, संपन्नतेच्या काठावर उभा राहून तटस्थपणे
आपल्या गतजीवनाकडे बघणारा वांगलुंग दिसतो.
हे सारं आयुष्य कोणत्याही देशात आणि कोणत्याही संस्कृतीत घडू शकेल इतकं सामान्य आहे.
एका गरीब चीनी शेतकऱ्याच्या धकाधकीच्या आणि लांबलचक आयुष्याचं अगदी सरळ सोप्या भाषेत वर्णन करणारी
ही कादंबरी अमेरिकन साहित्याचा मानदंड ठरली आहे.

*** कवी अनंत फंदी साहित्य पुरस्कार**

संगमनेर इतिहास संशोधन मंडळाच्या वतीने देण्यात येणाऱ्या 'कवी अनंत फंदी पुरस्कारा'साठी कादंबरी व कथासंग्रह विभागात मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित व डॉ. प्रमिला जरग लिखित 'आदिपर्व' या कादंबरीची निवड करण्यात आली आहे. १ हजार १११ रूपये, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व महावस्त्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुरस्कार वितरण सोहळा १५ जानेवारी २०१२ रोजी व्यापारी मंडळ हॉल, पडतानी कॉम्प्लेक्स संगमनेर येथे पार पडला.

*** करवीर साहित्य परिषद पुरस्कार**

करवीर साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित केलेल्या राज्यपातळीवरील ग्रंथ पुरस्कार योजनेत मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित, डॉ. प्रमिला जरग लिखित 'आदिपर्व' या कादंबरीला प्रथम पुरस्कार मिळाला. पुरस्कार वितरण समारंभ २२ डिसेंबर २०११ रोजी करवीर नगर वाचन मंदीर, कोल्हापूर येथे पार पडला. पुरस्काराचे स्वरूप १ हजार रूपये रोख, शाल, श्रीफळ असे होते.

*** दिलीप प्रभावळकर यांना गदिमा पुरस्कार**

'मराठी माणूस म्हणून आपण कितीही विवेकनिष्ठ असलो, तरी आपण आपला प्रदेश सोडून आपली भाषा बाहेर नेत नाही. त्यामुळे आपल्याकडे आलेल्या पाहुण्यांनाही प्रेमाने मराठी शिकवण्याची जबाबदारी आपण घेणे म्हणजे खऱ्या अर्थानी गदिमांना श्रद्धांजली वाहण्यासारखे आहे,' असे मत ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. मोहन आगाशे यांनी व्यक्त केले.

ज्येष्ठ अभिनेता दिलीप प्रभावळकर यांना आगाशे यांच्या हस्ते गदिमा प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणाऱ्या 'गदिमा पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले.

तसेच यावेळी प्रतिष्ठानतर्फे ज्येष्ठ अभिनेत्री लालन सारंग यांना ‘गृहिणी-सखी सचिव पुरस्कार’, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रावसाहेब शिंदे यांना ‘गदिमा स्नेहबंध पुरस्कार’, लेखिका डॉ. मोनिका गजेंद्रगडकर यांना ‘चैत्रबन पुरस्कार’ तर मोक्षा चौधरी यांना मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळवल्याबद्दलच्या गदिमा पारितोषिकाने गौरविण्यात आले.

आगाशे म्हणाले, ‘मराठी माणूस फारच भाबडा आहे. आमच्या काळात गदिमा, सुधीर फडके आणि राजा परांजपेंमुळे आम्हाला ‘व्हॅल्यु एज्युकेशन’ काय असतं ते समजलं होतं. आता मराठीच्या प्रसाराविषयी आरडाओरडा न करता प्रेमाने भाषेचा प्रसार करणे हीच गदिमांना श्रद्धांजली ठरणार आहे.’

प्रभावळकर म्हणाले, ‘बहुमाध्यमांमधून काम केले असले तरी मला रंगभूमीची ओढ कायम आहे. नाटकांचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले नसले, तरी नाटक करताना नाटककारांनी लिहिलेल्या व्यक्तिरेखा आणि भूमिकाच मला बरेच काही शिकवून गेल्या.

प्रतिष्ठानचे आनंद माडगूळकर, श्रीधर माडगूळकर यावेळी उपस्थित होते. राजेश दामले यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्राजक्ता माडगूळकर यांनी आभार मानले.

*** जीवनगौरव पुरस्कार**

अमेरिकेतील महाराष्ट्र फाऊंडेशनच्या वतीने देण्यात येणारा साहित्य जीवनगौरव पुरस्कार यंदा कविवर्य मंगेश पाडगावकर यांना, तर समाजकार्य जीवनगौरव पुरस्कार डॉ. जी. जी. पारीख यांना जाहीर झाला ओह. प्रत्येकी दोन लाख रुपये, स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

समाज कार्यासाठी दिला जाणारा कार्यकर्ता पुरस्कार यंदा सुनीती सु. र. (पुणे), सुभाष लोमटे (औरंगाबाद) व ब्रायन लोबो (ठाणे) यांना दिला जाणार आहे. प्रत्येकी ५० हजार रुपये असे त्याचे स्वरूप आहे.

१३ जानेवारीला बालगंधर्व रंगमंदिरात या पुरस्कारांचे वितरण झाले. ललित ग्रंथाचा पुरस्कार मंगेश काळे यांच्या ‘तृतीय पुरुषाचे आगमन’ या काव्यसंग्रहाला तर सतीश काळसेकर यांच्या ‘वाचणाऱ्यांची रोजनिशी’ या पुस्तकाला अपारंपरिक ग्रंथ पुरस्कार दिला गेला. वैचारिक ग्रंथ पुरस्कार मंगला आठलेकर यांच्या ‘महापुरुषांच्या नजरेतून स्त्री’ या पुस्तकाला, विशेष ग्रंथ पुरस्कार चंद्रकांत वानखेडे यांच्या ‘आपुलचि वाद आपणासी’ आणि अचला जोशी यांच्या ‘आश्रम नावाचे घर’ या पुस्तकाला दिला गेला. सामाजिक कार्य विशेष पुरस्कार ज्योती म्हापसेकर आणि मॅगसेसे पुरस्कार विजेत्या नीलिमा मिश्रा यांना देण्यात येणार आहे. याबरोबरच रा. शं. दातार नाट्य पुरस्कार सुषमा देशपांडे यांच्या ‘बया दार उघड’ या नाटकाला मिळाला आहे.

∗ पं. चौरासिया यांना श्री मोरया पुरस्कार

'पंडित हरिप्रसाद चौरासिया यांच्या बासरीत स्वरांचा गंधार आहे,'' असे गौरवोद्गार ज्येष्ठ संगीतकार अनिल मोहिले यांनी चिंचवडमध्ये काढले. पं. चौरासिया यांचा माझ्या हस्ते सन्मान होणे हे माझे भाग्य समजतो, अशा शब्दांत त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

श्री महासाधू मोरया गोसावी संजीवन समाधी महोत्सवानिमित्त प्रसिद्ध बासरीवादक पद्मभूषण पं. हरिप्रसाद चौरासिया यांना 'श्री मोरया गोसावी जीवन गौरव पुरस्कार' संगीतकार मोहिले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. दहा हजार रुपये रोख, मानपत्र, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते.

चिंचवड गावातील देऊळमळा पटांगणावर कार्यक्रम झाला. प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक डी.एस.कुलकर्णी, संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे, विघ्नहरीदेव महाराज, सतीश गडाळे या वेळी उपस्थित होते. बालशाहीर हेरंब पायगुडे, हर्शल खैरमोडे, गीतांजली मारकड, अमोल आढाव, अमितकुमार बॅनर्जी, प्रभाकर कुकडोलकर, श्रमिक गोजमगुंडे, अरविंद खळुगे, राजेंद्र मुथा, योगेश मालखरे, अण्णा मुणगेकर यांनाही विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. वेदमूर्ती दिनकर फडके यांना विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले.

∗ डॉ. रा. चिं. ढेरे यांना 'जीए सन्मान' जाहीर

आशय सांस्कृतिक, जीए कुटुंबीय आणि स्कीन सिटीच्या वतीने होणाऱ्या 'प्रिय जीए' महोत्सवात यंदा लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. रा. चिं. ढेरे यांना 'जीए सन्मान' प्रदान करण्यात आला. तर कथालेखिका नीरजा यांना 'जीए कथाकार' पुरस्काराने गौरविण्यात आले.

बालशिक्षण मंदिर सभागृहात हा महोत्सव पार पडला. महोत्सवाचे उद्घाटन साहित्यिक मधू मंगेश कर्णिक यांच्या हस्ते झाले. या वेळी जीए सन्मानाचेही वितरण झाले. त्यानंतर 'कैरी' या गाजलेल्या कथेवर नाट्यविष्कार सादर करण्यात आला.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी लेखक विजय पाडळकर यांच्या हस्ते नीरज यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यानंतर अशोक याळगी यांनी 'जीए स्मृती दालन' हा विशेष दृकश्राव्य कार्यक्रम सादर केला. महोत्सवाचा समारोप 'अग्निस्त्रोत', 'कांचनमृग' या कथांच्या अभिवाचनाने झाला.

∗ संगीत नाटक अकादमीचे पुरस्कार

संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. रा.चिं.ढेरे, ज्येष्ठ नाटककार पं. सत्यदेव दुबे, ज्येष्ठ दिग्दर्शिका विजया मेहता, प्रसिद्ध रंगकर्मी विक्रम गोखले, ज्येष्ठ गायिका डॉ.

प्रभा अत्रे, ज्येष्ठ गायिका-अभिनेत्री जयमाला शिलेदार यांच्यासह संगीत, नाटक आणि नृत्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना संगीत नाटक अकादमीचे पुरस्कार जाहीर झाले आहेत.

पं. रवींद्रनाथ टागोर यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती वर्षाचे औचित्य साधून यंदा विशेष सन्मान जाहीर करण्यात आले आहेत. पं. सत्यदेव दुबे, विजया मेहता, डॉ. प्रभा अत्रे, यमुनाबाई वाईकर आणि वैजयंतीमाला यांची त्यासाठी निवड करण्यात आली आहे. याशिवाय विविध क्षेत्रात कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या जयमाला शिलेदार, प्रसाद सावकार, मधुकर तोरडमल, बबनराव हळदणकर, राधाकृष्ण कदम यांचाही सन्मान केला जाणार आहे. आयुष्यभर संतसाहित्याच्या प्रचारासाठी केलेल्या कार्याची दखल घेत ज्येष्ठ अभ्यासक, संशोधक डॉ. रा.चिं.ढेरे यांनाही टागोर ॲकॅडमी अवॉर्डने गौरविण्यात आले.

प्रसिद्ध अभिनेते विक्रम गोखले आणि ज्येष्ठ गायिका श्रुती सडोलीकर-काटकर यांची यंदाच्या 'ॲकॅडमी अवॉर्ड'साठी निवड करण्यात आली आहे. एक लाख रूपये आणि ताम्रपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप असेल.

दरम्यान, अकादमीतर्फे 'बिस्मिलाँ खाँ युवा पुरस्कारां'ची घोषणाही करण्यात आली आहे. यामध्ये मंजुषा पाटील, सुयोग कुंडलकर आणि आरती काळे-नगरकर यांची निवड करण्यात आल्याचे अकादमीतर्फे जाहीर करण्यात आले आहे.

*** अ.भा.मराठी नाट्य परिषद नाशिक शाखेचे पुरस्कार**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नाशिक शाखेच्या वतीने दर दोन वर्षांनी देण्यात येणारा वि.वा.शिरवाडकर लेखन पुरस्कार व वसंत कानेटकर रंगकर्मी पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे.

वसंत कानेटकर रंगकर्मी पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांना तर वि.वा.शिरवाडकर लेखन पुरस्कार चित्रपट लेखक, दिग्दर्शक अशोक पाटोळे यांना जाहीर झाला आहे. २५ हजार रूपये रोख, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. मराठी रंगभूमीसाठी आयुष्यभर कार्य करणाऱ्यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने नामवंत लेखक, कलाकार व तंत्रज्ञान यांना हा पुरस्कार दिला जातो. पुरस्काराचे हे १० वे वर्ष आहे.

अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीकांत मोघे यांच्या हस्ते फेब्रुवारीत नाशिक येथे या पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेच्या नाशिक शाखेचे अध्यक्ष नेताजी भोईर, प्रमुख कार्यवाह सुनील ढगे, कार्यकारिणी सदस्य किशोर पाठक, जयप्रकाश जातेगावकर, अरुण राहाणे, प्रदीप पाटील यांनी या पुरस्कारांची घोषणा केली.

यापूर्वी या पुरस्काराने गौरविलेले मान्यवर

वि.वा.शिरवाडकर लेखन पुरस्कार : पु.ल.देशपांडे, वसंत कानेटकर, विजय तेंडुलकर, रत्नाकर मतकरी, प्र.ल.मयेकर, शं.ना.नवरे, सतीश आळेकर, प्रेमानंद गज्वी. वसंत कानेटकर रंगकमी पुरस्कार : मोहन वाघ, डॉ. श्रीराम लागू, विजया मेहता, पुरूषोत्तम बेर्डे, सुलभा देशपांडे, चित्तरंजन कोल्हटकर, रोहिणी हट्टगंडी, उपेंद्र दाते.

*** टिळक पत्रकारिता पुरस्कार**

केसरी मराठा ट्रस्टच्या वतीने देण्यात येणारा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार श्रवण गर्ग यांना जाहीर झाला आहे. एक लाख रूपये, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. ४ जानेवारी रोजी या पुरस्काराचे वितरण झाले.

गर्ग यांना पत्रकारितेचा चार दशकांहून अधिक काळ पत्रकारितेचा अनुभव आहे. त्यांनी इंग्रजी, हिंदी व गुजराती वृत्तपत्रांमध्ये काम केले आहे. ते सध्या भास्कर वृत्तपत्र समूहाचे समूह संपादक आहेत. पुरस्काराचे हे चौथे वर्ष असून, यापूर्वी एन.राम, वीर संघवी, एच.के.दुवा यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. या पुरस्कारवितरणाच्या वेळी मुरली लाहोटी व व्ही.एस.कुलकर्णी यांना कै. जयंतराव टिळक स्मृतिपुरस्कार, तर गीता काटवाल यांना कै. इंदुताई टिळक स्मृतिपुरस्कार देण्यात येणार आहे. तसेच, अनाथ हिंदू महिलाश्रम, रोज सोसायटी व नेस्पा या संस्थांना कै. गौरी टिळक स्मृतिपुरस्कार, तर देवगंधर्व बखले प्रतिष्ठान, वेदशास्त्रोत्तेजक सभा व वसंत व्याख्यानमाला यांना सारंग साठे स्मृतिपुरस्कार देण्यात आले.

*** निसर्गचित्र पुरस्कार**

''निसर्गाचे निरीक्षण करताना त्यास अभ्यासाची जोड देणे गरजेचे आहे,'' असे मत वनस्पती आणि फुलांचे अभ्यासक श्रीकांत इंगळहळीकर यांनी व्यक्त केले.

ॲड-व्हेंचर फाउंडेशनतर्फे देण्यात येणारा 'श्री. मारूती चितमपल्ली निसर्गमित्र पुरस्कार' यावर्षी इंगळहळीकर यांना मुख्य वनसंरक्षक नितीन काकोडकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

'सकाळ'चे कार्यकारी संपादक नवनीत देशपांडे, वनस्पती तज्ज्ञ श्री. द. महाजन, फाउंडेशनचे अध्यक्ष विवेक देशपांडे, सदस्य अनिल गोहाड या वेळी उपस्थित होते. महाजन यांच्या 'विदेशी वृक्ष' या पुस्तकाचे प्रकाशन इंगळहळीकर यांच्या हस्ते करण्यात आले.

इंगळहळीकर म्हणाले, ''निसर्गाचे अभ्यासपूर्ण निरीक्षण करण्यास चितमपल्लींनी शिकविले. तंत्रज्ञान; तसेच अभ्यासक्रमातील बदलामुळे शहरात होणारी वृक्ष व पक्षी

संमेलने बंद झाली आहेत. पूर्वी ब्रिटिश लोक निसर्गाचे अभ्यासपूर्ण निरीक्षण करून उपयोगी, सुंदर झाडांचे संग्रह करीत असत. त्यामुळे त्यांचे अनुकरण करत निसर्ग अभ्यासणे गरजेचे आहे.''

महाजन म्हणाले, ''परदेशातून भारतात आलेले परकीय वृक्ष कोणते, भारतात कोणते वृक्ष लावावे यासठी 'विदेशी वृक्ष' हे पुस्तक लिहिले आहे. परदेशी वृक्षांपेक्षा भारतीय वृक्ष हे पर्यावरणपूरक आहेत.''

अरूणाचलमधील धनेश पक्ष्यावर केलेल्या विशेष संशोधनाबद्दल अमृता राणे यांचा व २०१२ मध्ये एवरेस्ट मोहीम आयोजित करणाऱ्या उमेश झिरपे यांचा सत्कार फाउंडेशनतर्फे करण्यात आला.

❐

आगामी (नवीन आवृत्ती)

मातीखालची माती

आनंद यादव

१४०रु. पोस्टेज २५रु.



पर्ल हार्बरच्या हल्ल्यात यशस्वी झालेल्या जपानी राष्ट्राची आगेकूच.... दुसऱ्या महायुद्धात दोस्त राष्ट्राकडून मार खाणारे जपानी राष्ट्र पार खिळखिळे झाले होते. राष्ट्रप्रेमाने प्रेरित होऊन सतरा-अठरा वर्षांची पोरंही युद्धात
सैनिक म्हणून भरती होतात. मुली नर्स आणि इतर कामे करतात.

सायुरी मियामोटो अशीच एक तरुणी. टोकियोला नर्स म्हणून काम करत असताना ती आपली मैत्रिण रैकोच्या वाग्दत वराचा मृत्यू पाहते. युद्धात तिचा भाऊ बोटीवर आणि मैत्रीण रैको बॉम्बहल्ल्यात मरण पावते.
ह्या सर्वांचा सूड घ्यायचा म्हणून ती 'कामिकाझी' पायलट बनते,
तेही पुरूष वेषांतर करून. पुरुषांच्या बरोबर राहणे, जगणे,
प्रशिक्षण घेणे ह्यात हे वेषांतर उघड होते,
तेही तिचा प्रशिक्षक आणि प्रियकर असणाऱ्या ताकुशीकडे.

ह्यात पुरुषांचे वेषांतर करून लष्करात घुसलेली ही स्त्री.
ह्या गुन्ह्यांची तिला काय शिक्षा मिळते?....
ही कहाणी तशी अद्‌भूत, विलक्षणच....

नवे कोरे

नीलकंठ

स्नेहल जोशी

२४०रु. पोस्टेज ३०रु.

जीवनप्रवासाच्या नानाविध वाटांवर कित्येक माणसं भेटतात. निव्वळ चेहऱ्यावरून तळातला खळाळ हाती लागणं तसं कठीणच! व्यक्ती-व्यक्तींमधले परस्परसंबंध, त्यांच्या वागण्याच्या विलक्षण तऱ्हा, भावनांचे कंगोरे आणि कळत-नकळत उफाळणारे तरंग
या साऱ्याचा मनोज्ञ वेध नीलकंठ कथासंग्रहातून प्रतीत होत राहतो.
कायमचं अगम्य असं स्त्री-पुरुष नातं!
प्रेम हा एकच शब्द, पण त्याच्याही अनंत छटा!
नियतीच्या भोवऱ्यात गटांगळ्या खाणारं आयुष्य आणि
त्यात अडकलेलं अवघं मनुष्यजीवन!
अशी सगळी घट्ट वीण अलवार उसवून दाखवण्याची लेखिकेची देखणी धडपड चैती, बळीचं तळं, वादळ, मेड फॉर इच अदर यांसारख्या कथांमधून जाणवत राहते.
उत्कंठा जागवणाऱ्या, आतला तळ ढवळून टाकणाऱ्या, भ्रम आणि वास्तव यांच्या सीमारेषेवर रेंगाळायला लावणाऱ्य या कथा म्हणजे एक तरल अनुभूती!

वेदना आणि व्याधींसह चांगलं जीवन

भय, चिंता, वेदनाव्यथा यांचे ओझे कुठवर वाहत राहणार?



मूळ लेखिका **विद्यमाला बर्च** /अनुवाद **डॉ. सुभाष दांडेकर**

२४०रु. - सभासदांना सवलतीत

अपघातांचे प्रमाण आजच्या वेगवान वाहनांच्या जमान्यात खूप वाढत चालले आहे. अपघातात अनेक जणांना मृत्यू येतो, तर अनेक जणांवर अपंग होण्याची पाळी येते. कधी कधी वयोमानाने शरीराचा एखादा अवयव जायबंदी होतो; आणि त्यामुळे पदोपदी वेदना होतात. पण अपघातात तर अनेक अवयवांची मोडतोड होऊन सर्वसामान्य दैनंदिन जीवनही अशक्यप्राय होते. साध्या हालचाली करणेही क्लेशदायक वाटते. असह्य वेदनांमुळे जगणे नकोसे होते. यापेक्षा मरण बरे असेही वाटते. विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे अनेक व्याधीवेदनांवर प्रभावशाली औषधे आणि साधने उपलब्ध होत आहेत. परंतु बऱ्याच व्यक्तींना वेदनाव्यथांचा सामना करीतच जीवन व्यतीत करावे लागते ही वस्तुस्थिती नजरेआड करता येत नाही. कुठल्याना कुठल्या वेदनेसह जगणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण यूरोप-अमेरिकेसारख्या प्रगत देशातही दर सात-आठ व्यक्तींमध्ये एक आहे, असे अद्ययावत आकडेवारीवरून लक्षात येते. वेदनाशामक औषधे घेऊन किंवा झोपेच्या गोळ्या घेऊन वेदनांची तीव्रता तेवढ्यापुरती कमी करणे एवढेच आपल्याला शक्य असते.

लिव्हिंग वेल वुइथ पेन अँड इलनेस या पुस्तकात वेदना आणि व्याधी यांच्याशी सामना करीत दु:ख करीत जगण्याऐवजी वेदना आणि व्याधी यांचा मनोमन स्वीकार करून चांगले जीवन जगणे शक्य होते असा पर्याय दिला आहे. या पुस्तकाच्या लेखिका विद्यमाला बर्च यांना लहान वयातच पोहताना झालेल्या मणक्याच्या दुखापतीमुळे शस्त्रक्रियांना सामोरे जावे लागले होते. तशातच रूग्णवाहिकेतून जाताना झालेल्या अपघातात त्यांच्या एका कॉलर बोनचा चुराडा झाला. मनगटाच्या शिरा दुखावल्या गेल्या. पाठीचा कणा मध्यावर मोडला गेल्याने प्रचंड वेदनांना तोंड द्यावे लागले. पुढे फिल्म अँड साउंड एडिटर म्हणून काम करण्याची संधी मिळाली. परंतु तेविसाव्या वर्षी पुन्हा एका अपघातात त्यांची कार फोनच्या खांबावर आदळल्याने त्यांच्या खांद्याला, मानेला, पाठीला आणि मानेला मार लागला. अनेक महिने रूग्णालयात काढावे लागले. मणक्याच्या सांध्यामध्ये दिलेले स्टेरॉइडचे इंजेक्शन मूत्रमार्गात अडथळा आणणारे ठरले आणि न्यूरोसर्जिकल विभागात आयसीयूमध्ये दाखल व्हावे लागले. कॅथेटर घालून मूत्रमार्ग सुरू करण्यात आला. या काळात असह्य वेदनांनी वेड लागायची पाळी आली. रात्रीच्या रात्री तळमळत काढाव्या लागल्या. तशात डॉक्टरांनी चोवीस तास ताठ बसून राहण्याचा सल्ला दिला. ''दुखणे वाढू नये म्हणून'' हे पथ्य असे बजावले. दुखणे तर चोवीस तास चालूच होते. त्यामुळे त्यांच्या मनात द्वंद्व चालू राही. ''या वेदनांमुळे वेड लागेल. उजाडेपर्यंत कसा वेळ काढायचा, कसे सहन करायचे कळतच नाही'' असे एक मन म्हणे तर ''हे सर्व सहन करण्यावाचून गत्यंतर नाही. तुला हे दुखणे सहन करावेच लागेल''

असे दुसरे मन म्हणे.

दोन मनांच्या या रणधुमाळीतून विद्यामाला बर्च यांना एक नवीनच जाणीव झाली. वेदनेकडे पाहण्याचा एक नवा मार्ग दिसला. जणू त्यांना साक्षात्कारच झाला. त्यांचे तिसरे मन जागे झाले आणि म्हणाले, ''या वेदनेचा तू उगाच बाऊ करते आहेस. तुला रात्रभर या वेदना सहन करायची काहीच गरज नाही. सकाळ कधी होते यासाठी तळमळत राहण्याची गरज नाही. या क्षणापुरता विचार कर आणि या क्षणापुरती वेदना विसर. या क्षणापुरती या वेदनेच्या जाणिवेतून बाहेर पड. या क्षणी या वेदनेचा तुला विसर पडला तर पुढच्या क्षणीही तुला वेदनेचा त्रास जाणवणार नाही. जीवन हे एकेका क्षणाने उलगडत जाते. सध्याचा क्षण हा नेहमीच सुसह्य असतो.''

या विचाराबरोबर आपल्या मनावरचे सगळे दडपण दूर झाल्याचा भास त्यांना झाला. मनाला तरतरी आली. एका क्षणाचा तर प्रश्‍न आहे. पुढच्या क्षणाला आताच बागुलबुवा कशाला हवा? या कल्पनेने बौद्धिक पातळीवरही मुक्तीचा, सुटकेचा अनुभव आला. भय नाहीसे झाले. मन शांत झाले. संबंध आयुष्यभर वेदना सहन करीत जगावे लागणार या विचाराने अवघे भविष्य काळवंडून जात असे. आता या क्षणाचा तर प्रश्‍न आहे; तेवढी कळ काढली की झाले, असे मोकळे मोकळे वाटू लागले. आपले मन, आपले शरीर, आपले विचार या सर्वात काहीतरी असामान्य, अपूर्व परिवर्तन झाले आहे, असे त्यांना जाणवले; आणि जगण्याची नवी दिशा मिळाली. वेदना असणे आणि वेदना नसणे या दोन अवस्थांबद्दलच आजवर सर्व शक्तीबुद्धी केंद्रीत झालेली होती; ती आता वेदनांसह जगणे या वास्तवाचा स्वीकार करून आयुष्य सुंदर करणे, सर्वांशी प्रेमाने वागणे, दुसऱ्यांच्या भावना जपणे, अधिक दयाळू, साहिष्णू, आनंदमय तरल आणि करुणामय, कोमल आहे या भावनेने समृद्ध, सौख्यपूर्ण जगत राहणे शक्य होते असा या परिवर्तनाचा अर्थ होता.

वेदनेकडे या दृष्टीने पाहता आले तर तिची तीव्रता दु:सह वाटत नाही.

आपले शरीर आजारी असले तरी आपले मन अभंग आहे, त्यामुळे मन:शांती मिळवता येते हे लक्षात आले.

वेदनेकडे अशा वेगळ्या नजरेने बघता आल्याने वेदनेसह जीवन चांगल्या प्रकारे जगता येते अशी स्वत:ची खात्री पटल्यावर विद्यामाला बर्च यांनी याबद्दल सर्वंकष अभ्यास सुरू केला.

वेदना आणि व्यथा यांच्या संदर्भातील संशोधन आणि पूर्वअभ्यास शोधताना मॅसॅच्युसेट्स युनिव्हर्सिटीच्या वैद्यकीय केंद्रात डॉ. जॉन कबाट-झिन यांनी मन:शांतीने तणावमुक्ती ही पद्धत विकसित केली. तिचा फायदा हजारो जुनाट व्याधी असणाऱ्या व्यक्तींनी शिबिरांमध्ये भाग घेऊन मिळवला. जॉन यांची भेट घेऊन त्यांची शिकवण्याची हातोटी आणि कार्यपद्धती बघितल्यावर त्या प्रभावित झाल्या. ऑकलंड बुद्धिस्ट सेंटर (ऑस्ट्रेलिया) आणि तारालोक वुमन्स रिट्रीट सेंटर्स (श्रॉपसायर इंग्लंड) येथे पाच वर्षे ध्यानधारणा केली. बौद्ध धर्म स्वीकारून विद्यमाला हे नाव धारण केले. ब्रेथवर्क्स-माइंडफुलनेस बेस्ड पेन मॅनेजमेंट प्रोग्रॅमची स्थापना करून रत्नयुग आणि सोना फ्रिकर या सहकाऱ्यांसमवेत वेदनांसह जीवन जगणाऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग सुरू केले. बौद्ध धर्मातील सजग मनाचा सराव ही संकल्पना त्यांना या दृष्टीने खूपच क्रांतिकारक वाटली. चालू क्षणाची जाणीव तरलतेने आणि करूणेने करून घेतली तर सजग मन वेदनेशी सहजतेने जुळवून घेऊ शकते. यासाठी बौद्धधर्मात सांगितलेली आचारपद्धती आणि तत्त्वे जाणून घेतली तर आपल्याला एकटं, एकाकी पाडणारी वेदना ही आपल्याला इतरांशी जोडण्याचे कारण ठरते. ''इतक्या वेदना मलाच का सोसाव्या लागतात या प्रश्नाऐवजी मानवी आयुष्याचा भाग असलेला वेदनानुभव मला मिळत आहे, त्यामुळे इतरांच्या दृष्टिकोनातून पाहणे मला शक्य होत आहे. या अडचणी सर्वव्यापी आहेत याचे भान एरव्ही आले असते का? हा प्रश्न विचारावासा वाटेल.

- असे बरेच चिंतन झाल्यावर ब्रेथवर्क्सच्या प्रशिक्षणाला वेगवेगळे पैलू लाभले आणि त्याचा फायदा अनेक व्यक्तींना मिळू लागला. वेदनांकडे नव्या दृष्टीने बघता आले तर त्यांची तीव्रता क्षीण होत जाते आणि जीवनाचा आनंद मुक्त मनाने घेता येतो हे सूत्र सर्वदूर पोचावे यासाठी पुस्तक रूपाने या संकल्पनेची मांडणी करण्यात आली. दृक्-श्राव्य साधनांची निर्मिती करण्यात आली.

या प्रशिक्षणात श्वासोच्छ्वास, ध्यानधारणा, ध्यानाच्या तीन पद्धती आणि सजग मन यांचे विस्तृत विवेचन करण्यात आले आहे.

शरीराला सजगता आणण्याची गरज असते.

वेदना आणि व्याधी यांच्यासह जगताना शरीराकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न प्रत्येक व्यक्तीकडून होत असतो.

वेदनामय शरीराबरोबर जगणाऱ्यांचा हा प्रतिसाद स्वाभाविक असतो. परंतु

त्यामुळे दुय्यम वेदना निर्माण होतात. सजगतेमुळे शरीराची जाणीव पुनश्च प्रबल होते. शरीर आणि मन यांचे नाते जुळल्यानंतरच्या परिस्थितीला पुनर्वसन असे नाव देता येईल.

वेदनामय शरीराशी संघर्ष करण्याऐवजी त्याच्याबरोबर वास्तव्य करण्यास शिकणं म्हणजेच शरीराचं पुनर्वसन. शरीराची जाणीव निर्माण करण्याचा मार्ग म्हणजे आपल्या श्वासोच्छ्वासाची जाणीव वाढविणे.

श्वासोच्छवास ही प्रक्रिया आपण नकळतपणे करीत असतो. श्वास आत घेणे आणि सोडणे ही क्रिया रोज ११ हजार वेळा म्हणजे वर्षाला ४० लाख वेळा होत असते. आपल्या जीवनाच्या अस्तित्वाची ही मूलक्रिया आहे.

या पुस्तकात सजगतेच्या कार्यक्रमाची सहा मूलतत्वे विशद केली आहेत.

१. श्वासाची जाणीव

२. सजग हालचाली

३. शरीराची तपासणी

४. श्वासाची सजगता

५. दयाळू जाणीव

६. दैनंदिन जीवनात सजगता

श्वास सराव, शरीरतपासणी, श्वासाची सजगता आणि दयाळू जाणीव यासाठी दोन-दोन आठवड्यांचा कार्यक्रम दिलेला असून ध्यानधारणेच्या विविध मार्गाचा परिचय करून दिला आहे. शरीराची जाणीव म्हणजेच पुनर्वसन हे स्पष्ट झाले तर वेदनेचे अवडंबर वाटणार नाही. गंभीरपणे या विषयाचा मागोवा घेतला तर श्वासाची जाणीव, सजग हालचाली आणि ध्यानधारणा यांची आयुष्यातील प्रत्येक क्षण आंतरिक शांततेचा अनुभव देणारा ठरेल.

डॉ. सुभाष दांडेकर यांनी एका अवघड पुस्तकाचा सुबोध अनुवाद दक्षतेने करून मोलाची कामगिरी बजावली आहे.

❒

नवे कोरे

असामान्य यशप्राप्तीसाठी दहा सामान्य सूत्रे

ए.जी. कृष्णमूर्ती

अनुवाद

सुप्रिया वकील

१००रु. पोस्टेज २०रु.

सूत्र १ : स्वप्न पाहा. भव्य स्वप्न पाहा...

सूत्र २ : तुमच्या उद्योगात प्रवीण बना

सूत्र ३ : सकारात्मक बना

सूत्र ४ : मी हे करू शकतो / शकते

सूत्र ५ : पैसा हे जोडउत्पादन आहे

सूत्र ६ : तुमच्या स्वप्नावर पकड मिळवा

सूत्र ७ : तुमच्या 'टीम'च्या भरवशावर धोके पत्करा

सूत्र ८ : आव्हानांचं स्वागत करा

सूत्र ९ : प्रत्येकाची भरभराट झाली पाहिजे

सूत्र १० : आयुष्य फक्त एकदाच मिळते

पुस्तक परिचय

अ-मृत पंथाचा यात्री

प्रतिभाशाली रवीन्द्रनाथांच्या व्यक्तिमत्त्वाचे विलोभनीय पैलू



मूळ गुजराती लेखक **दिनकर जोषी** /अनुवाद **डॉ. सुषमा करोगल**

१८०रु. - सभासदांना सवलतीत

गुजराती लेखक दिनकर जोषी यांच्या दीडशेवर पुस्तकांपैकी दहाबारा पुस्तकांचे अनुवाद मराठीत प्रसिद्ध झाले आहेत, त्यामुळे त्यांचा एक चाहता वर्गही महाराष्ट्रात तयार झाला आहे. महात्मा गांधी आणि त्यांचा थोरला मुलगा हरिलाल या दोघांच्या संबंधातले नाट्यपूर्ण चढउतार नेमकेपणाने उलगडून दाखवणारी प्रकाशनी पडछाया ही कादंबरी मराठी वाचकांना खूपच प्रिय झाली आणि तिच्यावर आधारलेल्या 'गांधी विरुद्ध गांधी' या नाटकाचेही बरेच प्रयोग झाले. कर्तृत्ववान कीर्तिमान पित्याच्या सावलीत वाढणाऱ्या अपत्याच्या मानसिक कुचंबणेचे आणि न्यूनगंडाचे एक विदारक दर्शन दिनकर जोषींनी घडवले; नियती एकेकाच्या नातेसंबंधात जे गूढ रहस्यमय वैचित्र्याचे रंग भरत असते ते आपल्याला दिङ्मूढ करतात. हे असे का घडावे याबद्दल कुतूहल निर्माण करतात. दिनकर जोषी यांनी गांधीजींप्रमाणेच इतरही काही नामवंत व्यक्तींच्या जीवनावर चरित्रात्मक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. पै. महंमद अली जीना यांच्यावरील 'प्रतिनायक' या नावाची तर कवी मर्नद यांच्या जीवनावरील 'एक टुकडो आकाशनो' या कादंबऱ्याही मानवी स्वभावातील वैचित्र्य आणि विसंवाद अधोरेखित करणाऱ्या आहेत. रामायण-महाभारत यातील व्यक्तिरेखांची त्यांची पुस्तकेही अशीच अंतर्वेधक अंतर्मुख करणारी आहेत. चरित्रात्मक कादंबऱ्यांचे लेखन हे अवघड असते. चरित्रनायकाची लोकमानसातील प्रतिमा, तिच्याबद्दल समकालीनांनी व्यक्त केलेली मते, तिच्या कार्यकर्तृत्वातील आणि वैचारिक तात्त्विक भूमिकेतील संवाद-विसंवाद, आदर्श आणि व्यवहार यातील अंतर याबद्दल बरेच उलटसुलट तपशील उपलब्ध असतात. त्यातून एक सुविहित वस्तुनिष्ठ, सत्यान्वेषी, संपूर्ण व्यक्तिमत्व उभे करणे हे प्रतिभेचे आव्हान असते. दिनकर जोषी यांनी हे आव्हान चांगल्या रीतीने पेलले आहे. त्यामुळे महात्मा गांधी आणि हरिलाल गांधी या पिता-पुत्रांमधले ताणतणाव आणि विसंवाद प्रकट करताना या दोघांपैकी चूक कोण हे ठरवणे सोपे ठरत नाही. दोघेही आपापल्या भूमिकेतून आणि अनुभवातून जे काही करतात ते अपरिहार्यच असे वाटते.

दिनकर जोषी यांनी रवींद्रनाथ टागोर यांच्या जीवनावर आधारित कादंबरी रवींद्रनाथ दीडशेव्या जन्मवर्षाच्या निमित्ताने लिहिली. मुंबईच्या समकालीन या दैनिकाच्या रविवार आवृत्तीत ती क्रमशः प्रसिद्ध झाली. दर आठवड्याला एकेक प्रकरण लिहिले गेल्याने तिच्यात थोडाफार विस्कळीतपणा वा पुनरावृत्ती जाणवते. परंतु रवींद्रांच्या जीवनातील नाट्य मात्र थक्क करते.

रवींद्रनाथ ठाकूर यांची देश-परदेशात काही लॉबी किंवा प्रसिद्धी नसताना त्यांना नोबेल पुरस्कारासारखा जागतिक पुरस्कार मिळावा या घटनेचे आजही अप्रूप वाटते. या पुस्तकात त्यांच्या या पुरस्काराच्या संदर्भात काही तपशील आले आहेत.

त्यावरून एखादी चांगली गोष्ट घडायची असली म्हणजे कुठल्या तरी गूढ शक्तीद्वारे अनेक घटक आश्चर्यकारकरीतीने एकत्र येतात. याची प्रचीती येते.

शिक्षणाची फारशीआवड नसलेल्या रवीन्द्रांना लेखनाची मात्र कुमारवयापासूनच आवड होती. त्यांच्या कविता त्यांच्याच घरातून निघणाऱ्या मासिकात प्रसिद्ध होत. आजोबा प्रिन्स द्वारकानाथ यांना ईस्ट इंडिया कंपनीने बंगाल-ओरिसामधील काही गावे जहागीर म्हणून दिली होती. वडील देवेंद्रनाथ या जहागिरीचा कारभार पाहत. कलकत्त्यात जोडासांळा भागात ठाकुरांची प्रशस्त हवेली होती. घरात पाश्चात्य वातावरण होते. बंगालच्या नबाबी काळात मुसलमान अंमलदाराबरोबर सहभोजन केल्यामुळे देवेंद्रनाथांच्या पूर्वजांना जातिबहिष्कृत करण्यात आले होते. जेसोरच्या उच्च ब्राह्मणांनी त्यांना पीरअली असे मुस्लीम नाव देता पीराली ब्राह्मण म्हणून त्यांना पुन्हा स्वीकारले होते. त्यामुळे प्रतिष्ठित ब्राह्मण आपल्या घरातील मुली ठाकुरांना देण्याचे टाळत असत. रवींद्रनाथांना तेरा मोठी भावंडे होती. रवींद्रनाथ हे शारदादेवींचे चौंदावे अपत्य. त्यांचा जन्म झाला तेव्हा त्यांची सर्वात मोठी बहीण सुवणाकुमारी पंधरा वर्षाची होती. तिचे लग्नही झाले होते आणि ती पतीसह ठाकुरांच्या हवेलीतच राहायची. रवींद्राचा सांभाळ तीच करायची. आई शारदादेवी वारली तेव्हा रवींद्रांचे वय तेरा-चौदा होते. हेमेंद्रनाथ, सत्येंद्रनाथ, द्विजेंद्रनाथ वगैरे भावांच्या तुलनेने रवींद्रनाथ सावळे होते. त्यांना सर्वजण काळोबा म्हणत.

रवींद्रांचे शिक्षण नॉर्मल स्कूल, बेंगाल ॲकॅडमी आणि सेंट झेव्हियर्स स्कूल या संस्थांत झाले. परंतु या शालेय शिक्षणात त्यांचे मन रमले नाही. बंगाली भाषेवर मात्र त्यांचे प्रभुत्व होते. कुमार वयातच कविता लेखनाची गोडी लागली. त्या कवितांचे कौतुकही झाले. अमृत बझार पत्रिका, ज्ञानांकुर वगैरे मासिकात त्या कविता प्रसिद्ध होत राहिल्या. कवी म्हणून लहान वयातच त्यांना मान्यता मिळाली. वडीलभाऊ सत्येंद्रनाथ इंग्लंडला जाऊन आयसीएस होऊन आले आणि न्यायाधीश म्हणून अहमदाबादला काम करू लागले. त्यांच्या आग्रहामुळे रवींद्रनाथांनाही इंग्लंडला शिक्षणासाठी पाठवण्याचे ठरले. थोडीशी पाश्चात्य जीवनाची कल्पना यावी म्हणून सत्येंद्रनाथांनी आपले इंग्लंडमधले सहाध्यायी आणि आता मुंबईत डॉक्टरकी करणारे आत्माराम तर्खडकर यांच्याकडे पाठवले. तर्खडकरांची मुलगी उंच, गोरी, सुडौल बांध्याची, मडमेसारखी दिसणारी समवयस्क. तिला वडील म्हणाले, ''हा रवींद्र इंग्लंडला शिकायला जाणार आहे. त्याला तू त्या दृष्टीने पाश्चात्य रीतिरिवाज शिकव.'' अनूला रवींद्रच्या कविता आवडतात. रवींद्रलाही अनू आवडते. डॉ. आत्माराम या दोघांची जोडी चांगली जुळते म्हणून कलकत्त्याला जातात; पण ठाकुर मंडळी आधी रवींद्रला इंग्लंडला पाठवायची घाई करतात.

इंग्लंडमध्ये बंधू सत्येंद्रनाथांची पत्नी आणि मुले ब्रायटन येथे शिक्षणासाठी राहात होती. तेथील शाळेत रवींद्रनाथांचा जीव रमला नाही. तेव्हा लंडन विद्यापीठात त्यांना पाठवण्यात आले. बार्कर कुटुंबात पेइंग गेस्ट म्हणून राहण्याची व्यवस्था झाली. नंतर डॉ. स्कॉट यांच्याकडे मुक्काम. त्यांची ल्युसी ही मुलगी आणि रवींद्रनाथ यांचे मैत्र जमते. मात्र अभ्यासाऐवजी काव्यलेखनातच रवींद्रनाथांचा वेळ जाई. ल्युसी त्यांना इंग्लिशचे धडे देई. तर ते तिला बंगाली शिकवत. या दोघांच्या मैत्रीची कल्पना आल्यावर वडील देवेंद्रनाथ रवींद्रांना भारतात बोलावतात. 'बस्स झाले शिक्षण' असे सांगतात.

भारतात परतल्यावर जेसोरच्या वेणीप्रसाद माधव यांच्या कन्येशी रवींद्रांचा विवाह होतो. दहा वर्षे वयाची मृणालिनी पेटीभर बाहुल्या घेऊन रवींद्रांच्या हवेलीत येते. तेराव्या वर्षी आई बनते. माधुरीलता असे नामकरण केले जाते. तिच्यापाठोपाठ रथीन्द्रचा जन्म होतो. त्यानंतर रवींद्रनाथ आपल्या पत्नीला बंगाली शिकवतात... रवींद्रनाथांवर शियालदाच्या जहागिरीची व्यवस्था पाहण्याची जबाबदारी सोपवण्यात येते. ग्रामीण जीवनाची ओळख त्यांना होते. खूप माणसे भेटतात. त्यांच्या कहाण्या ऐकायला मिळतात. त्यातून काबुलीवाला, पोस्टमास्तर, क्षुधित पाषाण वगैरे कथांचा जन्म होतो. काँग्रेसच्या अधिवेशनालाही ते हजर राहतात. 'शांतिनिकेतन'ची स्थापना करतात. त्यासाठी त्यांची पत्नी त्यांना आपले दागिने देते. पत्नीचे अल्प आजाराने निधन होते. हितवादी प्रकाशन संस्थेतर्फे पुस्तके प्रकाशित होतात. रॉयल्टी मिळते पण अगदी नाममात्र. तशात मुलगी रेणुका हिला क्षय होतो. तिची देखभाल करता करता चोखेरबोली आणि नौकाडुबी या कादंबऱ्यांचे क्रमश: प्रकाशन होत होते.

रवींद्रनाथ ठाकूर यांना १९१३ साली साहित्याचा नोबेल पुरस्कार मिळाला. या घटनेला पुढील वर्षी शंभर वर्षे होतील. एका भारतीयाला हा पुरस्कार मिळाला, भारतीय भाषेत लेखन करणाऱ्या लेखकाला हा पुरस्कार मिळाला, पौर्वात्य भक्तिभाव आणि निखळ मानवतावाद प्रकट करणाऱ्या कवितासंग्रहाला हा पुरस्कार मिळाला या घटनेला फार मोठे महत्त्व होते. भारताला आणि भारतीय साहित्याला एक जागतिक मान्यता आणि ओळख या पुरस्काराने मिळाली. रवींद्रनाथ हे काही इंग्रजीत लेखन करणारे भारतीय लेखक नव्हते. किंवा त्यांना कोणी पाश्चात्य गॉडफादर नव्हता. त्यांची लॉबी नव्हती. परदेशात त्यांचे काहीही साहित्य प्रसिद्ध झालेले नव्हते.

ते ज्या बंगाली भाषेत लेखन करीत होते. त्या बंगाली भाषेतील अनेक मान्यवर लेखकांनी (उदा. द्विजेंद्र लाल रॉय) 'सर्जनशील कलावंताच्या समाजाप्रती असणाऱ्या

उत्तरदायित्वाकडे पाठ फिरवणारे, समाजावर नैतिकदृष्ट्या विपरीत परिणाम करणारे, अश्लील प्रेमकविता लिहिणारे लेखक अशी घणाघाती टीका करून त्यांना नामोहरम करण्याचा प्रयत्न केला होता. कलकत्ता विद्यापीठाच्या मॅट्रिकच्या परीक्षेचे मुख्य परीक्षक म्हणून त्यांची नेमणूक करण्याच्या किंवा त्यांना मानद डॉक्टरेट देण्याच्या ठरावांना नकार देण्यात आला होता. रवींद्रांना बंगाली भाषा लिहिता येत नाही, बंगाली भाषेचे विद्वान असे त्यांना म्हणता येणार नाही; असे प्रतिपादन करणारा एक मोठा वर्ग त्यावेळी होता. 'गोरा' आणि 'अचलायन' या कलाकृतींवर सतावनी आणि सुधारकथा दोन्ही वर्गांचा रोष झाला. बॅ. चित्तरंजन दास यांनी आपल्या नारायण या मासिकातून रवींद्रांच्या लेखनावर झोड उठवली. त्याला सवंग, वास्तवशून्य आणि जादुई दिखाऊपणाची चमक आहे, असे म्हटले. बंगालच्या शिक्षण खात्याने रवींद्रांचे साहित्य कुठल्याही पाठ्यपुस्तकात घेऊ नये असे फर्मान काढले. रवींद्रांनी मॅट्रिकसाठी तयार केलेल्या पाठ्यपुस्तकाला कलकत्ता विद्यापीठाने मंजुरी देण्याचे टाळले. नोबेल पुरस्कारानंतर मात्र ब्रिटिश व्हॉइसरॉय लॉर्ड हार्डिंग्ज यांच्या सूचनेप्रमाणे या विद्यापीठाने रवींद्रनाथ ठाकूर यांना मानद डॉक्टरेट दिली. पण त्याच वर्षीच्या मॅट्रिकच्या प्रश्नपत्रिकेत रवींद्रांचा एक बंगाली भाषेतील परिच्छेद देऊन 'हा परिच्छेद शुद्ध बंगाली भाषेत परत लिहा' असे सांगण्यात आले. 'गीतांजली'तील इंग्रजी कविता आयरिश कवी डब्ल्यू. येट्स या कवीने लिहिल्या आणि रवींद्रनाथांनी त्या आपल्या नावाने छापल्या, असेही अनेक बंगाली विद्वान खात्रीपूर्वक प्रतिपादन करीत.

रवींद्रनाथांना या सुमारास लंडनमध्ये स्थायिक झालेले शास्त्रज्ञ मित्र जगदीशचंद्र बोस यांनी पत्र लिहून कळवले की तुमच्या कथांची भाषांतरे इंग्लंडमध्ये प्रसिद्ध होणे गरजेचे आहे. ती त्या दृष्टीने प्रयत्न करीत आहे. परंतु येथील संपादकांना पौर्वात्य जीवनावरील कथांचे वेगळेपण वाचकांना वाचावेसे वाटेल की नाही याबद्दल साशंकता वाटते.

कलागुरू अवनींद्रनाथ यांच्या स्टुडिओत ब्रिटिश चित्रकार रोथेन स्टाइन यांची गाठ पडली. ते हिंदुस्थानभर भ्रमंती करीत येथील जनजीवन रेखाटत होते. अवनींद्रनाथांनी रोथेनस्टाइनना जोडाकांक्षामध्ये निमंत्रित करून त्यांचे आदरतिथ्य केले. रवींद्रनाथांची ओळख करून दिली. इंग्लंडला परतल्यावर रवींद्रनाथांची 'काबुलीवाला' ही कथा त्यांना आवडली आणि हा कथाकार उत्तम प्रतिभावंत असणार अशी खात्री पटली. त्यांनी अवनींद्रनाथांना पत्र लिहिले, रवींद्रांच्या आणखी काही कक्षांचे अनुवाद करून ते मला पाठवा. अवनींद्रनाथांनी रवींद्रांच्या कथांच्या अनुवादाला वेळ लागेल, तोपर्यंत त्यांच्या काही कवितांचे तयार असलेले इंग्रजी अनुवाद वाचून बघा

म्हणून पाठवले. रोथेनस्टाइनना त्यांच्या कवितांनीही प्रभावित केले. लंडनच्या एका साहित्य संस्थेच्या कार्यक्रमात काव्य वाचनासाठी येण्याचे आमंत्रण त्यांनी रवीन्द्रनाथांना पाठवले. रवींद्रांनी ते स्वीकारले. मुलगा रथीन्द्र आणि सून प्रतिमा यांना बरोबर घेऊन त्यांनी इंग्लंडबरोबर अमेरिकेलाही भेट देण्याचा कार्यक्रम ठरवला. इंग्लिशमध्ये अनुवादित झालेल्या आपल्या १५४ कवितांचे हस्तलिखितही बरोबर घेतले. लंडनला बोटीने पोचल्यावर लंडनच्या भुयारी रेल्वेने चेरिंग क्रॉस स्टेशनवरून हॉटेल प्लुम्सबरीला जायचे होते. भुयारी रेल्वेचा पहिलाच प्रवास. चेरिंग क्रॉसला उतरताना एक बॅग गाडीतच राहिली. तिच्यात कवितांचे हस्तलिखित होते. दुसऱ्या दिवशी रोथेनस्टाइन भेटणार होते. त्या आधी काही कविता निवडण्यासाठी रवींद्रनाथ हस्तलिखित असलेली बॅग बघू लागले तर ती गायब! ती बॅग चेरिंग क्रॉस स्टेशनवर प्लॅटफॉर्मवर राहिली असणार असे लक्षात आल्यावर रथीन्द्रने तेथे जाऊन चौकशी केली. ऑफिसमध्ये सुदैवाने ती बॅग मिळाली. स्टेशनमास्तरने म्हटलं, नुसते कागद असलेली ही बॅग घ्यायला कोणी येणार नाही, असे आम्हाला वाटले होते.

रोथेनस्टाइन यांनी त्या कविता वाचल्या. या कविता कोणा एका काळाच्या वा प्रदेशाच्या नाहीत, विश्वात्मक भावना प्रकट करणाऱ्या, आशयसंपन्न, गूढ अनुभूती देणाऱ्या आहेत. या कविता येथील साहित्यकारांच्या अवलोकनात यायला हव्या असे त्यांना वाटले. १० जुलै १९१२ रोजी लंडनच्या ट्रोकाडेरो हॉटेलमध्ये काव्यवाचनाचा कार्यक्रम झाला. आयरिश कवी डब्ल्यू.बी.येट्स एझरा पाऊंड, एच.जी.वेल्स, दीनबंधू चार्लस अँड्र्यूज, विल्यम बटलर वगैरे अग्रगण्य साहित्यिक आणि सत्तरावर भारतप्रेमी रसिकजन उपस्थित होते. काव्यवाचनानंतर भोजनाचीही व्यवस्था होती. यीट्स आणि रोथेनस्टाइननीही काही कविता सादर केल्या. ''अशा कविता याआधी ऐकायला, वाचायला मिळाल्या नव्हत्या... अप्रतिम... पौर्वात्य संस्कृतीच्या वेगळेपणाचे दर्शन येशू ख्रिस्ताच्या संदेशाचेच पौर्वात्य आकलन वगैरे मते उपस्थितांनी व्यक्त केली. इंडिया सोसायटीने या कवितांची एक मर्यादित आवृत्ती काढण्याचे ठरवले. कवी यीट्स यांनी १५४ पैकी १०३ कवितांची निवड केली. गीतांजली या नावाने ७५० प्रतींची आवृत्ती खासगी वितरणासाठी प्रसिद्ध करण्यात आली. दूसरा पाऊंड यांनी काही कविता शिकागोच्या पोएट्री मासिकाकडे पाठवल्या. रवींद्रनाथ अमेरिकेला पोचल्यावर त्या त्यांना बघायला मिळाल्या. अनेक वृत्तपत्रात अभिप्राय आले. मॅकमिलन प्रकाशन संस्थेने 'गीतांजली' प्रसिद्ध करण्याचे ठरवले. बघता बघता दहा आवृत्त्या निघाल्या. ''या कविता वाचताना आपण बुद्धाच्या सान्निध्यात आहोत असे वाटते,'' ''इंग्रजांच्या राजवटीमुळे भारतीय

प्रजेची प्रगती झाल्याचा पुरावा म्हणजे हा काव्यसंग्रह'', ''हिंदू धर्मावर पडलेल्या ख्रिस्ती धर्माचा प्रभाव दाखवणाऱ्या कविता'' वगैरे मतांमुळे पुस्तकाचा प्रचार होत राहिला. यूरोपियन भाषांमध्येही गीतांजलीचे अनुवाद होत राहिले.

अमेरिकेत अनेक व्याख्याने देऊन रवींद्रनाथ कलकत्त्याला परतले. 'शांतीनिकेतन'साठी फारसा निधी काही या दौऱ्यात मिळाला नाही.

१५ नोव्हेंबर १९१३ रोजी रवींद्रनाथ ठाकूर यांनी साहित्यक्षेत्रातील नोबेल पुरस्कार जाहीर झाला आणि त्यांचे नाव जगभर पोचले. त्यावेळी हा पुरस्कार आठ हजार पौंडांचा होता.

रवींद्रनाथांना कुठलेही लॉबी-गट-कंपूतर्फे प्रयत्न करावे लागले नाहीत.

दोन दिवसांनी शांतिनिकेतनमध्ये भव्य अभिनंदन सोहळा झाला. आजवर रवींद्रांना नावे ठेवणारे अनेक मान्यवर, त्यावेळी रवींद्रांवर स्तुतिसुमने उधळत राहिले. ''या सन्मानाचा स्वीकार मी कसा करावा असा मला पेच पडला आहे. कारण हा सन्मान विशुद्धपणे माझा नाही हे मी जाणतो. हा सन्मान पश्चिमेकडून मिळालेल्या सन्मानाचा आहे. या कवितेला बकवास मानणारे अनेक चेहरे मला समोर दिसत आहेत. सद्भावनेने माझे साहित्य यापूर्वीच स्वीकारणारे रसिकही दिसत आहेत...'' रवींद्रांनी अशा सौम्य भाषेत आपल्या विरोधकांचा समाचार घेतला.

त्यावेळचे व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिग्ज यांनी कलकत्ता विद्यापीठाने रवींद्रांचा मानद डॉक्टरेट देण्याची सूचना केली. गव्हर्नरांनी गृहखात्याकडून त्यांची माहिती मागवली. १९०५ च्या बंगाल फाळणीच्या वेळी रवींद्रांची फाइल तयार करण्यात आली होती. त्यातील नोंदीनुसार रवींद्रनाथ ब्रिटिश सरकारचे विरोधक होते. गव्हर्नरनी डॉक्टरेटला नकार दिला तेव्हा व्हाइसरॉयनी गव्हर्नरला फैलावर घेऊन स्वत:च डी.लिट्. पदवी देण्याचा आदेश काढला. ऑक्सफर्ड विद्यापीठानेही त्यांना मानद डॉक्टरेट देण्याचा प्रस्ताव ठेवला. पण तो योग सत्तावीस वर्षांनी आला.

रवींद्रांचे पुढचे आयुष्य एक वंदनीय व्यक्तिमत्व, सेलिब्रिटी म्हणून गेले. तरीही त्यात पुष्कळ चढउतार होते. त्यांच्या साहित्याचे अनुवाद वेगवेगळ्या भाषांत झाले. परदेशी दौरे झाले. शांतिनिकेतन हे एक तीर्थक्षेत्र बनले. संगीत, नृत्य, लोककला, चित्रकला यात रवींद्रांनी मोलाची भर घातली. बंगालच्या सांस्कृतिक जडणघडणीत रवींद्रांचे योगदान मोलाचे ठरले. गांधींना 'महात्मा' असे प्रथम रवींद्रांनीच म्हटले. देश-परदेशातून अनेक चाहते, भक्त, शिष्य शांतिनिकेतनला येत राहिले. सुझान, एंट्री, एमहर्स्ट, व्हिक्टोरिया ओकंपो, चित्रकर्ती एलिझाबेथ वगैरे तरूणी त्यांच्या प्रेमात पडल्या. त्यांच्या भावजीवनात त्यांनी वादळे उठवली

तसेच त्यांच्या आंतरिक प्रतिभेला उन्नत परिणाम केले. त्यांच्या चिंतनाला दिशा दिली. ऐंशीचा टप्पा गाठला. प्रकृतीच्या तक्रारी सुरू झाल्या. प्रिय व्यक्ती एकेक करून अंतर्धान पावत गेल्या. तेव्हा त्यांनी प्रभूच्या चरणी प्रार्थना केली.

''आता खूप झालं, हे प्रभू,

आता हे सगळं आवरून घ्या.''

शांतिनिकेतनातील उत्तरायण बंगल्यात शेवटचा श्वास घेण्याची त्यांची इच्छा होती. पण उपचारांसाठी त्यांना कलकत्त्याला आणण्यात आले. शस्त्रक्रिया झाली. पण ७ ऑगस्ट १९४१ रोजी त्यांचे देहावसान झाले. लाखोंच्या उपस्थितीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. कादंबरीकार दिनकर जोषींना रवींद्रांचे उत्तरायणच्या रहित चिरनिद्रा घेण्याचे स्वप्न अपूर्ण राहिले याची खंत वाटते. रवींद्रांची अनेक स्वप्ने अपूर्ण राहिली, त्याचीच परमावधी अंतिम क्षणीही झाली याची हळहळ ते व्यक्त करतात. एकाकीपणा त्यांच्या जीवनाला आरंभपासून अखेरपर्यंत व्यापून राहिला, प्रिय व्यक्तींचा चिरवियोग त्या एकाकीपणाचे रंग गडद करीत राहिला, परंतु त्यांनी आपले 'एकला चलो रे'चे व्रत निष्ठापूर्वक जारी ठेवले आणि आपल्या वाटेला अमर केले. चरित्रात्मक कादंबरीकार म्हणून दिनकर जोषींचे लेखन कर्तृत्व अधिकाधिक व्यापक होत राहावे.

❐

ललित गद्य / पद्य

मालनगाथा : भाग २	इंदिरा संत	२००
मृद्‌गंध	इंदिरा संत	१६०
पासंग	दया पवार	१२०
जागल्या	दया पवार	५०
लाइफ स्टाइल	सुधीर गाडगीळ	१२०
कांचनकण	शिवाजी सावंत	८०
या सुखांनो	सुरेश नाईक	१७०
पॉपकॉर्न (लेखसंग्रह)	सुप्रिया वकील	८०
जन्मठेप (लेखसंग्रह)	गिरीजा कीर	१५०
एक दिवस	शोभा चित्रे	१४०
स्पर्श	विनिता परांजपे	९०
रामायणातील पात्रवंदना : दिनकर जोषी	अंजनी नरवणे	१८०

आगामी

जॅपनीज रोझ



रेई किमुरा

अनुवाद

स्नेहल जोशी

२००रु. पोस्टेज २५रु.

पर्ल हार्बरच्या हल्ल्यात यशस्वी झालेल्या जपानी राष्ट्राची आगेकूच....
दुसऱ्या महायुद्धात दोस्त राष्ट्राकडून मार खाणारे जपानी राष्ट्र पार खिळखिळे झाले होते. राष्ट्रप्रेमाने प्रेरित होऊन सतरा-अठरा वर्षांची पोरंही युद्धात
सैनिक म्हणून भरती होतात. मुली नर्स आणि इतर कामे करतात.

सायुरी मियामोटो अशीच एक तरुणी. टोकियोला नर्स म्हणून काम करत असताना ती आपली मैत्रिण रैकोच्या वाग्दत वराचा मृत्यू पाहते. युद्धात तिचा भाऊ बोटीवर आणि मैत्रीण रैको बॉम्बहल्ल्यात मरण पावते.
ह्या सर्वांचा सूड घ्यायचा म्हणून ती 'कामिकाझी' पायलट बनते,
तेही पुरूष वेषांतर करून. पुरुषांच्या बरोबर राहणे, जगणे,
प्रशिक्षण घेणे ह्यात हे वेषांतर उघड होते,
तेही तिचा प्रशिक्षक आणि प्रियकर असणाऱ्या ताकुशीकडे.

ह्यात पुरुषांचे वेषांतर करून लष्करात घुसलेली ही स्त्री.
ह्या गुन्ह्यांची तिला काय शिक्षा मिळते?....
ही कहाणी तशी अद्भूत, विलक्षणच....

Introduction

We, at MPH, now have a vast volume of English titles that we would like Readers to get familiar with. We have covered selective authors, bringing to our readers the best they deserve. There is a sea of information they can get access to through our titles that cover biographies, fiction and non-fiction. We always try and provide quality literature for our valuable readers.

From this year onwards we are starting a new section, for information on English books, in our in-house magazine. We hope our readers will appreciate our efforts and avail of the new opportunity we bring them. Our aim is to provide them with quality literature and to make accessible all those delightful, varied English titles in South Asia. In this English section of our in-house magazine, we shall cover reviews, write-ups, advertisements, forthcoming books, author information etc., of our different books, from which they can choose according to their liking.

We always keep a finger on the pulse of our readership and endeavor to furnish them with the widest range of books. Readers' suggestions and feedback regarding the books, authors they read or would like to read, can be conveyed to us through this section. This feedback from our readers will be invaluable to us and will be invited and considered seriously.

New Books



Travelling to Infinity



The Kiss of Saddam

Shattered Silence



Like A Willow Tree

Joanie de Rijke is a freelance journalist and works for P magazine and Revu, among others. In her book "IN THE HANDS OF TALIBAN" she makes remarkable revelations for first time. About the first contacts with the Taliban group, the tense six days, the release, the role of Belgian and Dutch governments in this, and the question of whether or not ransom money was paid.

Book review

What happens when a journalistic adventure turns into the worst nightmare imaginable? When your trust in someone is splintered without a blink and tossed away laughingly? When you're seen not as a human-being but as a pot of gold, or worse still, a rag-doll to be mangled with as pleased?! Joanie de Rijke knows best; as is reflected in her book 'In the Hands of Taliban'.

A Dutch-Belgian journalist, out to get some good stories about the Taliban and life in Afghanistan in their regime, Joanie was in for a rude shock when she was abducted by a small Taliban gang out to make a quick buck. Joanie was writing for a Dutch magazine as a freelance journalist, when in 2008, she travelled to Afghanistan.

The expedition began fruitfully, with Joanie interacting with a few Taliban chiefs at Prince Abdul Ali Seraj's residence. Soon after, one of her Afghan sources presented Joanie the opportunity of an 'exclusive interview' with the Taliban commander who had killed ten French paratroopers in Uzbin province. Sensing a great story opportunity, the journalist in Joanie couldn't resist. Despite several warnings from her friend Dave (a safety advisor in Kabul who specialised in sniffing out ploys), Joanie traipsed off to Surobi to meet Commander Ghazi Gul, accompanied by a mediator and an interpreter. To begin with, Ghazi and his comrades played along; posing for pictures and expounding their political and religious beliefs. Then, on the pretext of showing Joanie more of 'their region', Ghazi made her trek high up the Surobi Mountains, and on reaching the topmost peak, calmly announced that she had been kidnapped!



From thereon began Joanie's 6-day ordeal! She was stripped off all her personal belongings, was made to 'entertain' the gang with her songs, and had to constantly endure their insistence that she become a Muslim in order to gain a

place in paradise! As if the physical and mental torture was not enough, the abductors demanded USD 2 million in exchange for Joanie's release, but the question was, who would pay this amount?! Being a freelance journalist, Joanie did not have any media organisation to back her. Add to that, neither the Dutch nor the Belgian governments were ready Joanie gives a no-holds-barred account of her or deal – right from describing the geographical terrain of Afghanistan to describing the personalities of the gang-members in detail to lucidly expressing her anguish and fear in that situation. What sets her novel apart is that she also elucidates on the 'human side' of the terrorists who're otherwise seen only as monsters. She talks about their fascination for her toothbrush; the joy they derive from hearing her sing an English song; and Ghazi Gul's interaction with his wives and kids, that Joanie gets to witness at the end of her abduction. She also describes Ghazi's split-personality as he first rapes her and then tries to befriend her via jokes and chats!

A gut-wrenchingly written narrative, the book keeps the reader glued all-through. Joanie's writing is fast-paced but yet not racy enough to miss out on pertinent details. Her journalistic ability to present two sides of the coin in every situation, lends a unique human touch to the book which would otherwise have looked quite biased. Details of the negotiations and rescue operations given by Dave; and a reflection on the issue of paying for a captive journalist's life as expressed by Joanie's editor Michael Lescroart, add a major fillip to the credibility and experience of this book.

The only downside is that the writing style comes across as very 'newspaper reportage type'. Also, the book lags a little bit in the middle - making it a bit boring, but thankfully, that doesn't last too long.

All in all, an interesting book to understand the nuances of horrifying realities that are still abound, but ones that we feel happen in some faraway world. 'In the Hands of Taliban' makes you realize (with a shudder), that this grim reality is actually too close for comfort.

- RESHMA S. KULKARNI

Backlist

Untouchable



Parenting The Office



Master Your Mind



Speeches of War & Piece



Travelling to Infinity
My Life with Stephen
by Jane Hawking

Type -Paperback
Category - Biography
Pages - 512
Price - Rs. 550.00

Praise

"Stephen Hawking may think in 11 dimensions, but his first wife has learnt to love in several." - *The Times*

"Jane Hawking has written a book about what it was like to be pivotal to her husband's celebrated existence… but it is much more a shout from the outer darkness." - *The Daily Telegraph*

"What becomes of time when a marriage unravels? And what becomes of the woman who has located her whole self within its sphere? For Jane Hawking, the physics of love and loss are set in a private universe." - *The Guardian*

"Jane describes the final, painful years of her marriage in candid detail." - *The Independent*

"Jane Hawking's harrowing and compelling account… rings very true." - *Irish Times*

"This is not a vindictive book, although the agony she went through is palpable; if Stephen's struggle to keep his mind clear is heroic, so is her determination to balance his escalating needs and those of their three children." - *Independent on Sunday*

Forthcoming



The Gift



Gayatri's Maths Mantra

Mexican Cooking

नवे कोरे



लेनिनग्राडचा वेढा

मूळ लेखक

मायकेल जोन्स

अनुवाद

डॉ. प्रमोद जोगळेकर

३२०रु. पोस्टेज ३०रु.

८ सप्टेंबर १९४१. राक्षसी महत्त्वाकांक्षा असणाऱ्या हिटलरच्या फौजांनी सोव्हिएत महासंघाचा मानबिंदू असणाऱ्या लेनिनग्राड शहराभोवती पक्का फास आवळला. यामागे होती, एक थंड डोक्यानं आखलेली क्रूर योजना आणि लोकांची उपासमार करून शहर नष्ट करण्याची निर्दयी नाझी विचारसरणी. सलग ८७२ दिवस चाललेला हा वेढा हे मानवी इतिहासातलं एक भीषण पर्व आहे. विनाशासाठी टपलेलं शत्रूसैन्य आणि अत्यंत भ्रष्टाचारी नेत्यांची गलथान हुकूमशाही, यांच्यात भरडले जाऊन दहा लाखांपेक्षा जास्त नागरिक भुकेनं तडफडून मेले. नैतिक अध:पतनाचं टोक गाठलं गेल्यानं नरमांसभक्षणासारखे अघोरी प्रकार घडले. पण लेनिनग्राडच्या काही नागरिकांनी आपल्यातलं माणूसपण मरू दिलं नाही आणि अखेर त्यांनी विजय मिळविला. लेनिनग्राडचा वेढा ही त्या विलक्षण झुंजीची, मन सुन्न करणारी कहाणी आहे.

मानवी भावनांचं मनोज्ञ दर्शन

विज्ञानकथा वाचणारा आणि आवडणारा वाचकवर्ग जगभरात सर्व भाषकांमध्ये मोठ्या संख्येनं आहे. या वर्गाची ही भूक या प्रकारातलं दर्जेदार साहित्य लिहून भागवण्याचा प्रयत्न जगभरातले या विषयातले तज्ज्ञ लेखक करत असतात. मराठीलाही जयंत नारळीकर, निरंजन घाटे, बाळ फोंडके व अन्य लेखकांनी अतिशय चांगल्या विज्ञानकथांची देणगी दिली आहे. 'अश्मजीव' वाचल्यानंतर या मान्यवरांच्या रांगेत या पुस्तकाचे लेखक डॉ. संजय ढोले यांचाही समावेश करायला सुजाण वाचकांनी हरकत नसावी.

वेगवेगळ्या अंकांतून पूर्वप्रसिद्धी मिळालेल्या एकूण बारा कथांचा समावेश असलेलं हे पुस्तक पहिल्या कथेपसूनच लेखकांचं वेगळंपण अधोरेखित करतं आणि त्यांच्या बद्दलच्या अपेक्षाही वाढवतं. या कथांमधलं विज्ञान खरोखरच सामान्य माणसाला समजेल अशा साध्या भाषेत तर मांडलेलं आहेच, पण ते त्याच्या रोजच्या आयुष्यात घडत असणाऱ्या विषयांशी, प्रश्नांशी, त्याच्या उत्सुकतेशी आणि जिव्हाळ्याशी पण बांधलेलं गेलं आहे. म्हणूनच या कथांमधलं विज्ञान सामान्य माणसाच्या अनुभवाच्या पलिकडे असलेल्या गूढ,

क्लिष्ट आणि चमत्कृतिपूर्ण वाटेल अशा अंतराळ, परग्रह, तारे, दुसऱ्या ग्रहावरील जीव-जंतू यातल्या करामतीत आणि कसरतीत वाचकाला गुरफटवत नाही, तर साध्या सुध्या माणसांच्या तितिक्याच साध्यासुध्या अपेक्षांच्या, न्याय-अन्यायाच्या संघर्षामध्ये आणि त्यांच्या पूर्तीमध्ये रमवून ठेवते.

'निरपराध', 'शापित', 'प्रेषित पेशी', 'कबुलीजबाब', 'न्याय', यासारख्या कथा यादृष्टीने उल्लेखनीय आहेत. विदर्भातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या सारख्या अतिशय संवेदनशील विषयाशी जोडलं गेलेलं 'शापीत' मधलं संशोधन कोणत्याही सजग माणसाला अंतर्मुख करून विचार करायला प्रवृत्त करणारंच आहे, तर अनेकदा माणसाचं विज्ञानप्रेम व त्याची संशोधनाची दृष्टी ही विश्वकल्याणाचं व्यापक रूप न घेता फक्त मानवजातीच्या आत्मकेंद्रित प्रगती आणि विकासापुरतीच सीमित राहते आणि तसं झालं तर सृष्टीतल्या ज्या मानवेतर जीवांना तो निर्ममपणे आपल्या प्रयोगाच्या संशोधनासाठी वापरतो ते जीव फलितातून मिळालेल्या ताकदीच्या जोरावर काय करू इच्छितील हे आपल्याला 'मूषक' वा 'वटवाघूळ' सारख्या कथांमधून भेदकपणे समजतं.

एकूणचं, साध्या सोप्या भाषेत लिहिलं गेलेलं हे पुस्तक विज्ञानाच्या अलीकडे आणि पलीकडे असलेल्या मानवी भावनांच्या जगाचं दर्शन घडवतं.

अमिता नायडू

अनुभव मासिक - जानेवारी २०१२

❒

विज्ञान विषयक पुस्तके

वाचनातून विज्ञान	डी. एस. इटोकर	१२०
A to Z विज्ञान	डी. एस. इटोकर	८०
अंतरिक्षाचा वेध	सुधा रिसबूड	१५०
कथारूपी खगोलशास्त्र	लीना दामले	१००
अंतरिक्षाच्या अंतरंगात	लीना दामले	१५०
तंत्रज्ञानाची मुळाक्षरे	कविता भालेराव	२३०
मेंदू आणि वर्तन	अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर	७०
वायुप्रदूषण	डॉ. किशोर/डॉ. नलिनी पवार	१५०

पलीकडच्या जगात डोकावणाऱ्या कथा

विद्युल्लेखा अकलूजकरांच्या बारा कथांचा हा संग्रह. बहुतेक कथा गेल्या दोन दशकात लिहिल्या. सहस्त्रक संपता संपता आणि संपल्यानंतरच्या अशा संक्रमणाच्या दशकातल्या कथा. 'माय' ही एकच कथा जरा अधिक पूर्वीची आहे. सर्वच कथांना परदेशाचा, मुख्यत: कॅनडाच्या पश्चिम तीरावरचा संदर्भ आहे. लेखिकेला कादंबरीच्या विस्तृत आवाक्याइतकाच कथेचा मर्यादित आकार आवडतो. एखादी खिडकी उघडून काही क्षण पलीकडच्या जगात डोकावण्याचा प्रकार कथेत घडतो. एखादी कथा कवितेसारखी तरल बनते, तर एखादीमध्ये नाटकाची नांदी ऐकू येते. कथेला कोणीही कसंही वळवावं. ती वळते.

'दर्पणी पाहता रूप' ही शीर्षक कथा. कथेची नायिका कॅथलीन. कॅथलीनचा तो एक छंदच आहे. स्वत:ला सगळीकडून न्याहाळण्याचा. गंमत म्हणजे प्रत्येकवेळी त्या आरशात तिला आपलं रूप वेगळंच दिसतं... स्वत:चं म्हणजे प्रत्येक रूप बघता बघता ती अनेकदा भूतकाळात हरवून जाते. लहानपणाच्या आशा-आकांक्षा, आपली जुनी स्वप्नं, यातलं काय आपण पुरं केलं, काय राहून गेलं, याचा शोध घेत राहते. अलीकडे आरसे तिचे मित्र बनलेत आणि आपल्या मनोरंजनासाठी आरशाचे हवे तसे खेळ करायलादेखील ती शिकली आहे. आरसा निर्लेप असतो, आपणच त्यात आपल्याला हवं तसं प्रतिबिंब पाहू शकतो, हे आता तिला उमजलेलं आहे.

'उशिराचा पाऊस' कथेतील नायिका व्हियोला. जन्मभर एकाच प्रश्नासाठी आसुसलेली, 'तू माझ्याशी लग्न करशील?' बरेचसे आयुष्य एकटीने व्यतीत केल्यानंतर कधीकाळी हा प्रश्न आपल्या वाट्याला येईल, आपल्या कानात ते अमृताचे शब्द पडतील. याची तिने आशाच सोडून दिलेली होती. आणि वयाच्या सांजवेळी मात्र तिचा आवडता अँडी तिच्या पुढ्यात येऊन तिला विचारत होता. 'व्हियोला, तू माझ्याशी लग्न करशील?' तिला वाटले, 'असा उशिरा आलेला पाऊस तळहातांवर झेलून घ्यावा. टिपून ल्यावा पापण्यांवरती कपाळीच्या घामामध्ये मिळवावा डोईत पेरावा त्याचा ओलावा पाठीवरतून निथळू द्यावा कोरडे पडलेले ओठ उघडून वरच्यावरती चुंबून प्यावा.'

'काय चुकलं माझं?' कथेतील अविनीता, भारतीबेन, असीम, कोकिलाबेन, सलीमा-सर्वजण आपापल्या जागी अगदी बरोबरच आहेत. कुणाचे काहीच चुकलेले नाही. परंतु प्रत्येकाच्या जीवनाची घडी मात्र विस्कटून गेली आहे. 'हा माझा मार्ग एकला!' ही कथा आजच्या वैवाहिक जीवनावर प्रकाश टाकणारी आहे. 'बाटल्या' ही कथा परदेशात मुलीकडे एकाकी जीवन कंठणाऱ्या शारदाबाईंच्या जीवनाचे मार्मिक चित्रण करणार आहे. एकुलती एक मुलगी सुनंदा नवऱ्यापाठोपाठ वीस वर्षांपूर्वी कॅनडात आली, ती इथेच राहिली. यजमान वारल्यावरदेखील शारदाबाई पंधरा वर्षे हिमतीनं एकट्या जिमखान्यावरच्या आपल्या घरात राहिल्या. नंतर त्यांना एक झटका आला मात्र, सुनंदानं घर आवरुन आईला कॅनडात राहायला आणलं. आपला एकटेपणा दूर करण्याचा मार्ग त्यांनी वेगवेगळ्या आकाराच्या रिकाम्या बाटल्यात शोधला.

घरात काहीही काचेचं तुटलं. फुटलं, तर आईला ते फेकू न देता, दोन आण्याच्या बशीला जोडण्यासाठी अडीच रूपयांची ट्यूब विकत आणणारे आणि मोठ्या कौतुकाने जोडून दुरुस्त केलेल्या वस्तू वापरणारे बाबा, आणि तोच वारसा नकळत आपला मुलगा सुहासच्या त्या हसणाऱ्या डोळ्यात लख्ख बघताना पाहून इतके दिवस मनात जमणारी अभ्रं एकाएकी पडलेल्या उन्हानं पळवून लावल्यासारखं प्रसन्न वाटलं तनुजाला. (वारसा)

'माय' कथेतील संतोष ही सुद्धा एक विलक्षण स्त्री. तिचं सगळं वागणंच अचंबित करणारं. छोट्या बहिणीला दोन मुलीच. नवऱ्याला मुलगा हवा होता. तिसऱ्या वेळी बहीण जेव्हा हॉस्पिटलमध्ये गेली तेव्हा संतोषने बहिणीला सांगितले. 'जर मुलगा झाला तर तुझा, आणि मुलगी झाली तर माझी. आणि गुड्डीला घरी घेऊन आली. स्वत:ची मुलगीच जणू त्याचप्रमाणे मुलानं मुलगी शोधली. मुलीचे घरचे लोक लग्नाला तयार नव्हते. मुलगी कायद्याच्या दृष्टीने सज्ञान नव्हती. संतोषने मुलीच्या वाढदिवशी तिला सरळ स्वत:च्या घरी आणलं. अशी उदार मनाची संतोष म्हणते, 'बाईचे दु:ख बाईच जाणू शकते.''असेन मी, नसेन मी, तरी असेल..! ही कथा हृदयद्रावक अशीच आहे. पबचा मालक पबचे नाव बदलण्याचा निर्णय घेतो. सर्वात जुने गिऱ्हाईक म्हणून मि. हॅरॉल्ड टेलरच्या हस्ते अनावरण करतो. अनावरण झाल्यानंतर हॅरॉल्ड पाहतो तो पबचे नाव 'हॅरॉल्ड' हे असते. हे बराच वेळ त्याला खरेच वाटत नाही. या अनपेक्षित आपुलकीमुळे त्याचे डोळे ओले होतात. तो कसाबसा घरी पोहचला आणि ढगांनी जोराजोराने टाळ्यांचा कडकडाट केला. नव्या पाटीच्या अक्षरांसारख्या विजा चमकल्या आणि रखरखीत उन्हाळ्याला शह देणाऱ्या शहाण्या जोरदार पावसाने आकाशाला ताब्यात घेऊन पृथ्वीलाही सुखवायला सुरुवात केली. अशा या सुंदर कथा. लेखिका म्हणते, मला जेव्हा जेव्हा काही उत्कटतेने

जाणवलं, तेव्हाच कथा लिहिल्या होत्या. त्यांनीच आपापले आकार निवडले. मी केवळ ते वाचकांपर्यंत पोहचवण्याची हमाली केली. यांची पूर्वप्रकाशित पुतके १. मेरा जूता है जपानी, २. यथा काष्ठं च काष्ठं च, ३. मेपलची पाने ४. कहाणी शब्दवेध. शिवाय जागतिक कथानुवाद संपादित १. आजीच्या सुपातील मोती, २. विदेशिनी. लेखिकेचे 'दर्पणी पाहता रूप' हे छोटेखानी पुस्तक निश्चितच आगळे वेगळे म्हणून वाचनीय बनले आहे.

डॉ. शैलजा यादवाड

तरुण भारत - १ जानेवीरी २०१२

❐

कथासंग्रह

रिवणावायली मुंगी	राजन गवस	१३०
आपण माणसात जमा नाही	राजन गवस	१७०
मत्तीर	महादेव मोरे	२००
चिताक	महादेव मोरे	१५०
निसटलेले	आशा बगे	१२०
ऋतूवेगळे	आशा बगे	७०
पाऊलवाटेवरले गाव	आशा बगे	११०
प्रतिद्वंद्वी	आशा बगे	१२०
सेलिब्रेशन	स्वाती चांदोरकर	१३०
काळाकभिन्न	स्वाती चांदोरकर	१३०
विमुक्त	दादासाहेब मोरे	१३०
प्रकाशाची झाडे	वसु भगत	२००
आकाशवेध	गिरिजा कीर	१३०
केवळ मैत्रीसाठी	उमेश कदम	१३०
उधाण	पांडुरंग कुंभार	१३०
ती दोघं	डॉ. रमा मराठे	१३०
एका परिसाची कथा	मिलिंद जोशी	२००
दिवा	प्रमोदिनी वडके-कवळे	२७०

छळछावणीतील सुन्न करणारे अनुभव

श्लोमो व्हेनित्सिया हे सालोनिका येथील इटालियन ज्यू समाजातील. वयाच्या २१ व्या वर्षी त्यांची ऑश्विट्झ-बिर्केनो या छळछावणीत रवानगी झाली आणि तेथील झाँडरकमांडो या नावाने ओळखल्या जाणाऱ्या गटात त्यांना घालण्यात आले. तेथून ज्या काही मोजक्या लोकांनी आपली सुटका करून घेतली त्यापैकी ते एक आहेत. एस.एस. या जर्मन पोलीस दलाने गॅस चेंबर्स साफ करण्यासाठी व त्या चेंबर्समध्ये मारल्या जाणाऱ्या माणसांचे मृतदेह जाळण्याकरता या खास गटाची स्थापना केली होती.

दुसऱ्या महायुद्धात नाझींनी ज्यूंचा निर्दयपणे पद्धतशीर संहार केला. त्याला 'शोआ' किंवा 'होलोकॉस्ट' म्हणतात. मानवतेला अत्यंत लांच्छनास्पद असा हा काळ! त्याचा 'आँखो देखा हाल' श्लोमो व्हेनेत्सिया जगापुढे मांडत आहेत. श्लोमो आपल्या कुटुंबीयासमवेत एप्रिल १९४४ मध्ये ग्रीसमधील सालोनिकात कैद झाले. त्या साऱ्यांची रवानगी ऑश्विट्झ-बिर्केनो येथील कॉन्सन्ट्रेशन कॅम्पमध्ये झाली. डॉक्टरांनी केलेल्या छाननीत श्लोमो व त्यांचा भाऊ धडधाकट असल्यामुळे सुटले आणि 'झाँडरकमांडो' या तुकडीत त्यांना काम करावे लागले. गॅस चेंबरमध्ये मारलेल्या प्रेतांची विल्हेवाट लावायचे काम झाँडरकमांडोंना करावे लागत असे. श्लोमोंच्या आईला आणि दोन लहान बहिणींना गॅस चेंबरमध्ये ठार केले गेले होते.

गॅस चेंबरमधील भीषण हत्याकांडाची बातमी जगाला कळू नये म्हणून जर्मन लोक झॉडरकमांडोत काम करणाऱ्यांची ठरावीक काळाने कत्तल करत असत. त्यातून बचावून मूठभरच लोक बाहेर पडले. श्लोमो त्यापैकी एक आहेत. गॅस चेंबरमधील निर्दय कत्तलींचा डोळ्यांनी पाहिलेला इतिहास श्लोमोंनी या पुस्तकाद्वारे जगापुढे ठेवला आहे. अत्यंत संयतपणे, सत्याला धरून, फक्त स्वत: डोळ्यांनी पाहिलेलेच सांगून त्यांनी मानव जातीच्या सद्सद्विवेकबुद्धीला आवाहनच केले आहे. त्यांचे कथन ही केवळ थरारक स्मरणयात्रा नव्हे, आपल्या इतिहासाच्या काळ्याकुट्ट क्षणांवर

प्रकाश पाडणारा तो एक ऐतिहासिक दस्तऐवज आहे. श्लोमांचे कथन ही त्यांनी पुढील पिढ्यांच्या विचारांना आणि सतर्कतेला घातलेली सादच आहे. हे पुस्तक त्यांनी आपल्या दोन कुटुंबाना अर्पण केले आहे. युद्धापूर्वीचं आणि युद्धानंतरचं कुटुंब. सर्वप्रथम त्यांना आठवण होते ती आपल्या परमप्रिय आईची. अगदी तरुण वयात, पदरी पाच मुलं असताना वैधव्य येऊन खडतर आयुष्य जगावं लागलेल्या आईची आठवण त्यांना व्याकूळ करते. तिने केलेला त्याग आणि भोगलेल्या यातना मातीमोल ठरल्या. गॅस चेंबरमध्ये आई व बहिणी नष्ट झाल्या. या प्रचंड शोकांतिकेनंतर दुसरं कुटुंब अस्तित्वात आलं. पत्नी मारिका आणि तीन मुलगे.

लेखन सहा भागामध्ये विभाजित आहे. १. हद्दपारीचं ग्रीसमधलं आयुष्य, २. ऑश्विटस-बिर्केनो येथील पहिला महिना, ३. झाँडरकमांडो : प्रारंभ, ४. झाँडरकमांडो : काम चालू राहिलं, ५. झाँडरकमांडोचं बंड आणि क्रिमेटोरियमचं निकामीकरण, ६. माउट हाउझन, मेल्क व एबेन्झे. शिवाय ऐतिहासिक टिपण्या. ग्रीसमधील इटली : मोठ्या अपयशाचा छोटासा इतिहास, डेव्हिड ओलेरेबद्दल असे याचे स्वरूप आहे. सिमोन वाइल, ज्या हॉलोकास्ट स्मृति संस्थेच्या अध्यक्षा आहेत त्यांनी श्लोमो यांच्या अनेक मुलाखती घेतल्या. त्यातून हा अहवाल एकत्र केला गेला आहे. संभाषणं इटालियन भाषेत घेतली गेली. नंतर अनुवादित केली गेली.

श्लेमो व्हेनोत्सियानं सांगितलेली कहाणी अतिशय हेलावून टाकते. सर्वात वाईट काम मृत्यूसाठी मुक्रर केल्या गेलेल्या हद्दपारांना कपडे काढण्यासाठी आणि गॅस चेंबरमध्ये शिरण्यासाठी मदत करणं आणि त्यानंतर ही सारी प्रेतं तेथून हलवणं आणि विद्युतदाहिनीत टाकणं, मृत्यूपूर्वीच्या धडपडीत एकमेकांत गुंतलेल्या शरीरांची प्रेतं! देहान्त घडवणाऱ्यांचे ते नाखूष साथीदार असल्यामुळे झोंडर कमांडोचे जवळजवळ सर्व रहिवासी, त्यांनी ज्यांना गॅस चेंबरमध्ये नेलं, त्यांच्याप्रमाणेच ठार केलं होतं. डोळ्यांनी पाहिलेला हा वृत्तांत लेखकाच्या निर्दोष सच्चाईमुळे प्रभावशाली बनला आहे. जे पाहिलं ते काहीही न वगळता तो सांगतो. अधिकाऱ्याच्या रानटीपणाची गोष्टसुद्धा. परिस्थितीचा भेसूरपणा ज्यामुळे कमी तीव्र होईल अशा गोष्टीही तो सांगतो.

सुकलेल्या चेहऱ्याचे आणि थकलेल्या उमेद हारलेल्या आणि घाबरलेल्या डोळ्यांचे जे पुरुष, स्त्रिया आणि मुले श्लोमोने अखेरच्या वेळेस पाहिली, त्यांना तो त्याच्या शब्दांनी पुन्हा जिवंत करतो. काही लोकांना त्यांच्या पुढल्या प्राक्तनाची अजिबात कल्पना नव्हती. असं सारं असतानाही जी भीती वागवत श्लोमो बचावून निघण्याची धडपड करतो आहे, त्या परिस्थितीची भीषणता, मानवतेच्या अल्पशा स्पर्शाने कधीकधी सुसह्य होते. गॅस चेंबरच्या उंबरठ्यावर त्याला त्याचे काका भेटतात. त्यांना शेवटला अन्नाचा घास देऊ बघतो. त्यांच्यासाठी शौकप्रार्थना म्हणतो.

बाजा वाजवतो आणि सरतेशेवटी एकजूट दर्शवणारे आविर्भाव माणूस म्हणून जिवंत राहायला त्याला मदत करतात.

कुणी टीका करू धजला, तर ज्या घटनांबद्दल टीका होऊ शकेल, अशा घटना श्लोमो लपवू बघत नाही. नाझीच्या दुष्कर्मात सहभागी असल्याची भावना बचावून निघण्यासाठी कधीकधी करावा लागलेला स्वार्थीपणा याबद्दल बोलायचं धाडस तो दाखवतो. कॅम्पसमधून सुटका झाल्यानंतर त्याला झालेली सूडाची इच्छाही तो बोलून दाखवतो.

आपण केव्हा मारले जाणार या क्षणाच्या प्रतीक्षेखेरीज जिथे आणखी काही नाही अशा नरकातून कसं बचावून निघायचं या प्रश्नाला प्रत्येक हद्दपाराचं स्वत:चं असं उत्तर असतं. लेखक म्हणतो, 'पहिले दोन-तीन आठवडे या गुन्ह्याच्या प्रचंड व्याप्तीमुळे मी सतत हादरून गेलेला असायचो.' प्रत्येक दिवशी त्यानं मरण पसंत केलं असतं आणि तरीही तो प्रत्येक दिवशी बचावण्याची धडपड करत राहिला.

दीर्घकाळाच्या मौनानंतर श्लोमो व्हेनेत्सियान बचावून निघून आपली कहाणी सांगितली आहे. ते म्हणतात, ज्या जगात ते आम्हाला मानवजातीतून हद्दपार करू पाहत होते, अशा जगातून आम्ही परत आलो होतो. आम्हाला हे सारं सांगायचं होतं, पण आम्ही इतरांकडून विस्मय, उदासीनता आणि शत्रुत्वदेखील अनुभवलं. हद्दपारीनंतरच्या काळातच आम्ही बोलण्याचं धैर्य गोळा करू शकलो. कारण सरतेशेवटी लोक आमचं म्हणणं ऐकून घेऊ लागले.

हा अहवाल प्रत्येकानं विचार आणि सतर्कतेला घातलेली साद या दृष्टीनं समजून घ्यायला हवा. श्लोमोचा आवाजही एक दिवस मूक होईल. पण त्याच्या आणि बिआट्रिस प्रासक्वॉयर यांच्यामधला हा संवाद टिकून राहील. श्लोमो व्हेनेत्सियाचा आवाज चिरंतन ऐकला जाईल. ही काळजी घेणं आणि न विसरणं ही तरुण पिढीची जबाबदारी आहे. या पुस्तकामध्ये तत्कालीन घटनांचे फोटोही आहेत.

डॉ. शैलजा यादवाड

तरुण भारत २/१०/२०११

❒

नवे कोरे

असे शास्त्रज्ञ, असे संशोधन

निरंजन घाटे

१९०रु.

पोस्टेज २५रु.

विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यक्तींबद्दल सामान्य माणसांच्या मनात नेहमीच कुतूहल असतं. शास्त्रज्ञांचा विक्षिप्तपणा, त्यांची एककल्ली वृत्ती संशोधकांची धडपड, पेटंट मिळाल्यानंतर एकाच पेटंटवर अमाप श्रीमंत बनलेल्या संशोधकांची कहाणी, ह्या गोष्टी सत्य हे कल्पनेपेक्षा अद्भुत असतं, हे पटवून देतात. त्यामुळं अशा व्यक्ती घडल्या कशा हे जाणून घ्यायचीही आपल्या मनात इच्छा असते.

ह्या पुस्तकामध्ये अशा मान्यवर शास्त्रज्ञ आणि संशोधकांच्या बाबतीतलं कुतूहल शमविण्याची क्षमता आहे. त्याच बरोबर ह्यामुळं तरुण वाचकांना आपणही असं काहीतरी करायला काय हरकत आहे, असं वाटावं, ही अपेक्षाही लेखकाला वाटते. त्याच दृष्टीनं हे पुस्तक वाचावं, असं मात्र नाही. ह्या शास्त्रज्ञांची धडपड वाचून वाचकाची करमणूकही होईल. त्यामुळंही वाचकानं हे पुस्तक वाचायला हरकत नाही.

नवे कोरे

साहित्यिक जडण-घडण

डॉ. आनंद यादव

१५०रु.

पोस्टेज २५रु.

जीवन जगताना माणसाने गतानुगतिक पद्धतीने, सांकेतिक रीतीने जगू नये. जीवनात येणाऱ्या अनुभवांना संवेदनशील वृत्तीने सामोरे जावे. जीवनात अनेक घडामोडी घडत असतात; त्यांचा अनुभव स्वतंत्र वृत्तीने, आपल्या आवडी-निवडीनुसार घ्यावा. असे केले तर जीवनातील एरवी साधे, सरळ, सांकेतिक वाटणारे अनुभवसुद्धा नवनव्या संवेदना, नवनवे जीवनार्थ, नवनवे चिंतन देऊन जातात. परिणामी आपण नेहमीच्या सांकेतिक, सरळ, सोप्या, साध्या जीवनातसुद्धा 'अनुभव-समृद्ध' होऊन जातो. याची एकदाची सवय झाली की, आपण तथाकथित चाकोरीतील जीवनातही अनुभवसमृद्ध बनतो...

या साठीच ललित आणि चिंतनशील साहित्याचे वाचन आणि मनन केले पाहिजे. तरच आपले जीवन विविध सौंदर्याने संपन्न होऊ शकेल.

ओळख लेखकांची

वि.स. खांडेकर

जन्म : ११ जानेवारी १८९८
मृत्यू : ०२ सप्टेंबर १९७६

मराठी साहित्यक्षेत्रात वि.स. खांडेकर हे नाव आदराने उच्चारले जाते. विनोदी साहित्याने लेखनप्रारंभ करणाऱ्या खांडेकरांना कालांतराने थोर विचारवंत आणि समीक्षक म्हणून लोकप्रियता मिळाली. कथा, कादंबरी, काव्य, नाटक, निबंध, पटकथा, समीक्षा, विनोद, व्यक्तिचित्रे, अनुवाद अशा अनेक साहित्यप्रकारात त्यांनी विपुल लेखन केले. साहित्यक्षेत्रातील काही मोजक्या अजरामर कलाकृतींमध्ये त्यांच्या 'ययाती' आणि 'अमृतवेल' या कादंबऱ्यांची गणना होते.

अनेक ग्रंथांचे त्यांनी संपादन केले. पत्रकारितेच्या क्षेत्रातही त्यांचे योगदान मोलाचे आहे.

त्यांच्या साहित्यकृती भारतातील अनेक भाषांत अनुवादित झाल्या आहेत.

त्यांच्या या साहित्यसेवेची नोंद घेऊन भारत सरकारने त्यांना १९६८ साली 'पद्मभूषण' पुरस्काराने गौरविले. १९७० मध्ये त्यांना साहित्य अकादमीने 'महत्तर सदस्यत्व' (फेलोशिप) बहाल केले. सन १९७६ साली सर्वोत्कृष्ट भारतीय साहित्यासाठी दिला जाणारा 'ज्ञानपीठ' पुरस्कार वि. स. खांडेकरांना लाभला. कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाने त्यांना डी.लिट. पदवी बहाल केली.

पद्मभूषण वि. स. खांडेकर यांची साहित्यसंपदा

कादंबरी	**किंमत**
ययाति	२००
(ज्ञानपीठ पुरस्कार १९७६)	
अमृतवेल	१२०
नवी स्त्री	१००
सोनेरी स्वप्नं-भंगलेली	१००
सुखाचा शोध	१२०
पहिले प्रेम	१२०
रिकामा देव्हारा	१२०
जळलेला मोहर	१२०
पांढरे ढग	१७०
हिरवा चाफा	१७०
उल्का	१७०
दोन मने	१८०
दोन ध्रुव	२००
क्रौंचवध	२००
अश्रू	२२०

कथासंग्रह	**किंमत**
सरत्या सरी	आ. सं.
सांजवात	६०
ढगाआडचे चांदणे	६०
जीवनकला	६०
फुले आणि काटे	७०
समाधीवरली फुले	७०
कालची स्वप्ने	आ. सं.
चंदेरी स्वप्ने	आ. सं.
उ:शाप	७०
स्वप्न आणि सत्य	आ. सं.
हस्ताचा पाऊस	७०
अबोली	८०
सूर्यकमळे (अनु.)	८०
दवबिंदू	८०
स्त्री आणि पुरुष	आ. सं.
विद्युत प्रकाश	९०
पाकळ्या	९०
आजची स्वप्ने	९०
अश्रू आणि हास्य	९०
फुले आणि दगड	९०
घरट्याबाहेर	९०
पहिली लाट	९०
विकसन	१००
भाऊबीज	१२०
प्रीतीचा शोध	१५०
प्रसाद	आ. सं.
मुरली	१८०

कुमारवाङ्मय (कथासंग्रह)	**किंमत**
सूर्यास्त	४०
यज्ञकुंड	४०
अस्थी	४०
घरटे	४०
मध्यरात्र	५०

रूपककथा संग्रह	**किंमत**
सोनेरी सावल्या (अनु.)	४०
वेचलेली फुले (अनु.)	५०
मृगजळातील कळ्या	५०
कलिका	५०

क्षितिजस्पर्श	८०
सुवर्णकण	८०
(खलिल जिब्रान)(अनु.)	
वनदेवता	१००

लघुनिबंध संग्रह	**किंमत**
मंदाकिनी	आ.सं.
वायुलहरी	आ.सं.
अविनाश	आ.सं.
तिसरा प्रहर	६०
हिरवळ	६०
अजून येतो वास फुलांना	६०
चांदण्यात	७०
रानफुले	७०
मुखवटे	७०
कल्पलता	७०
धुके	७०
पहिले पान	आ.सं.
सांजसावल्या	८०
सायंकाल	८०
झिमझिम	आ.सं.
मंजिऱ्या	आ.सं.
मंझधार	आ.सं.
वासंतिका	९०

लेख/समीक्षा संग्रह	**किंमत**
अज्ञाताच्या महाद्वारात	८०
दुसरे प्रॉमिथिअस : महात्मा गांधी	७०
वन्हि तो चेतवावा !	९०
गोकर्णीची फुले	८०
रंग आणि गंध	आ.सं.
रेषा आणि रंग	आ.सं.

पत्रे	**किंमत**
तुरुंगातील पत्रे : अर्न्स्ट टोलर (अनुवाद)	आ. सं.

व्यक्ती आणि वाङ्मय	**किंमत**
वामन मल्हार जोशी : व्यक्ती–विचार	आ. सं.
आगरकर : व्यक्ती आणि विचार	आ. सं.
केशवसुत : काव्य आणि कला	१००
गडकरी : व्यक्ती आणि वाङ्मय	आ. सं.

आत्मचरित्र/आत्मकथन	**किंमत**
सशाचे सिंहावलोकन	८०
पहिली पावलं	आ. सं.
एका पानाची कहाणी	२५०

मुलाखत संग्रह	**किंमत**
ऋतू न्याहाळणारं पान	१३०

नाटक	**किंमत**
संगीत रंकाचे राज्य	आ. सं.

कविता	**किंमत**
वि.स.खांडेकरांची कविता संपादन : अविनाश अवलगावकर	आ. सं.

भाषणे	**किंमत**
तीन संमेलने	आ. सं.
सहा भाषणे	आ. सं.
अभिषेक	आ. सं.

व्यक्तिचित्रे	**किंमत**
ते दिवस, ती माणसे	८०

संपादित साहित्य	**किंमत**
आस्तिक	९०
सुशीलेचा देव	१००
रागिणी	आ. सं.

निवडक कथा	**किंमत**
मुक्या कळ्या	आ. सं.
गुदगुल्या	५०
इंद्रधनुष्य	आ. सं.

निवडक निबंध	**किंमत**
नवे किरण	आ. सं.
अग्निनृत्य	आ. सं.

निवडक काव्य	**किंमत**
तारका	आ. सं.
काव्यज्योती	५०

निवडक नाट्यांक	**किंमत**
रंगदेवता	आ. सं.

सभासद वर्गणी भरण्यासाठी, व पुस्तके मागविण्यासाठी खालील पत्त्यावरही संपर्क साधू शकता

मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८
(शनिवारी बंद)
फोन : (०२३१)२५४२९०१.
टेलिफॅक्स : (०२३१)२५४१८८१.
Email : mehtabooks@eth.net

सभासदांना सूचना

आमच्या प्रिय वाचकांनी, तसेच सभासदांनी वर्गणीचे नूतनीकरण करावे.
कृपया वर्गणीत वाढ झालेली आहे,
हे लक्षात ठेवून वर्गणीची पूर्ण रक्कम पाठवावी.
पुस्तक खरेदीस येताना मेंबरकार्ड जरुर आणावे
ही नम्र विनंती.

वि. स. खांडेकर यांच्या 'ययाति' या पुस्तकातील काही भाग

१

माझी कहाणी मी का सांगत आहे? माझे मलाच नीट कळत नाही.

मी राजा आहे, म्हणून का मी हे सारे सांगत आहे? मी राजा आहे? छे! होतो.

राजे-राण्यांच्या गोष्टी लोक मोठ्या आवडीने ऐकतात. त्यांच्या प्रेमकथांत तर जगाला फार-फार गोडी वाटते. मोठेमोठे कवी त्या कथांवर काव्ये रचतात.

माझी कहाणी हीसुद्धा एक प्रेमकथा– छे! ती कसली कथा आहे, कुणाला ठाऊक! एखाद्या कवीचे मन वेधून घेण्यासारखे तिच्यात काही नाही, हे मला कळते, पण केवळ एखाद्या राजाची कथा म्हणून काही ती सांगायला मी सिद्ध झालेलो नाही. या कहाणीच्या मुळाशी कोणत्याही प्रकारचा अभिमान नाही, अहंकार नाही, प्रदर्शन नाही. शेल्याची लक्तरे आहेत ही; त्यांत प्रदर्शन करण्यासारखे काय आहे?

राजाच्या पोटी मी जन्माला आलो, म्हणून राजा झालो, राजा म्हणून जगलो. यात माझा गुणदोष नाही. हस्तिनापूरच्या नहुषमहाराजांच्या पोटी परमेश्वराने मला जन्म दिला. पित्याच्या मागून सरळ सिंहासनावर बसलो मी. त्यात कसले आहे मोठेपण? राजवाड्याच्या शिखरावर बसलेल्या कावळ्याकडेसुद्धा लोक कौतुकाने पाहतात!

राजपुत्र न होता मी ऋषिकुमार झालो असतो, तर माझे जीवन कसे झाले असते? शरद ऋतूतल्या नृत्यमग्न चांदण्या रात्रीसारखे, की शिशिरातल्या अंधाऱ्या रात्रीसारखे? कुणी सांगावे? आश्रमात जन्माला येऊन मी अधिक सुखी झालो असतो? छे! या प्रश्नाचे उत्तर शोधशोधूनही मला मिळत नाही. एक गोष्ट मात्र राहून-राहून मनात येते. कदाचित माझी जीवनकहाणी अगदी साधी झाली असती– एखाद्या वल्कलासारखी. अनेक रंगांनी आणि विविध धाग्यांनी नटलेल्या राजवस्त्रांचे रूप तिला कधीच आले नसते; पण त्या वस्त्राचे सारेच रंग काही मला सुखद वाटत नाहीत.

२

असे असूनही माझी जीवनकथा सांगायला मी प्रवृत्त झालो आहे, ते का? या प्रवृत्तीच्या मागे कोणती प्रेरणा आहे? जखम उघडी करून दाखविली, म्हणजे माणसाचे दुःख हलके होते. कुणी जवळ बसून विचारपूस केली, की आजाऱ्याला बरे वाटते. आपुलकीच्या अश्रूंनी दुर्दैवी माणसाच्या मनातला वणवा विझतो. मलासुद्धा ते अश्रूच हवे आहेत का?

ते काही असो. एक गोष्ट सत्य आहे. या कहाणीने माझे मन भरून गेले आहे! आषाढातल्या ढगाळ आभाळासारखे! रात्रंदिवस मी विचारच विचार करीत आहे. ही कहाणी ऐकून एखाद्याला आयुष्याच्या मार्गातले खाचखळगे दिसतील, त्याला मी

वेळेवर सावध केल्यासारखे होईल, अशी कल्पना मनाला सुखवून जाते; पण ती क्षणभरच! लगेच माझे मलाच वाटते, ही शुद्ध आत्मवंचना आहे. गुरुपत्नीच्या मोहाने कायमचा कलंक लावून घेणाऱ्या चंद्राची कथा कुणाला ठाऊक नाही? अहल्येच्या सौंदर्याने वेडावून गेलेल्या इंद्राला सहस्र भगांचा प्रसाद मिळाला, हे काय जगाला माहीत नाही? जग चुकते, त्या चुकीविषयी ऐकते, पण शिकत मात्र नाही! प्रत्येक मनुष्य आयुष्याच्या शेवटी थोडासा शहाणा होतो; पण तो दुसऱ्याला लागलेल्या ठेचांनी नाही, तर स्वतःला झालेल्या जखमांनी. हे मनात आले, म्हणजे वाटते, कशाला सांगायची ही आपली विचित्र कहाणी? वेलीवर पुष्कळ फुले फुलतात, त्यांतली काही देवदेवतांच्या मूर्तींवर विराजमान होतात. त्यांना भक्तीने नमस्कार मिळतात. काही फुले राणीच्या केशकलापांचे सौंदर्य वृद्धिंगत करतात. महालातल्या मंचकांवरचे विविध विलास ती आपल्या चिमुकल्या डोळ्यांनी पाहतात. काही फुले एखाद्या वेड्या माणसाच्या हाती पडतात. तो क्षणार्धात त्यांचा चोळामोळा करून टाकतो. या जगात जन्माला येणारी माणसेही अशीच असतात. कुणी दीर्घायुषी होतात, कुणी अकाली मरण पावतात; कुणी वैभवाच्या शिखरावर चढतात; कुणी दारिद्र्याच्या दरीत कोसळून पडतात. कुणी दुष्ट, कुणी सुष्ट! कुणी कुरूप, कुणी सुरूप! पण अंती ही सारी फुले मातीत मिसळून जातात. त्यांच्यामध्ये एवढे साम्य असते. ही सारी फुले कधी आपल्या कहाण्या सांगतात का? मग माणसाने आपल्या जीवनाला इतके महत्त्व का द्यावे?

३

मागे किर्र रान, पुढे गर्द अरण्य, असे आहे हे जीवन! अज्ञाताच्या अंधकारात तर ते अधिकच भयाण भासते. कुठल्या तरी चांदण्याचा मिणमिणणारा प्रकाश अधूनमधून या अरण्यातल्या पाउलवाटेपर्यंत येऊन पोचतो. या पायवाटेवरून होणाऱ्या माणसाच्या प्रवासाला आपण जीवन म्हणतो.

माझ्या या प्रवासात वर्णन करून सांगण्यासारखे काही थोडेसे घडले आहे. कदाचित हा माझा भ्रम असेल! पण मला तसे वाटते खरे. बालपणीचा ययाति, कुमारवयातील ययाति, यौवनात पदार्पण करणारा ययाति आणि प्रौढ झालेला ययाति हे सारे एक होते; पण आजचा ययाति त्यांच्यापेक्षा थोडा निराळा झाला आहे. त्यांच्याच शरीरात तो राहत आहे; पण त्यांना जे दिसत नव्हते, ते त्याला दिसू लागले आहे. सर्वांनाच अगदी अंधूक का होईना– दिसावे, म्हणून स्वतःची कहाणी सांगायचा मोह त्याला अनावर होत आहे.

४

लहानपणाच्या आठवणी किती नाजूक, किती मोहक; पण किती बहुरंगी असतात! जणू काही मोरपिसेच! माझ्या पहिल्यावहिल्या आठवणींत अग्नी आणि

फुले ही परस्परांना बिलगून बसली आहेत. अगदी जुळ्या भावंडांसारखी!

पहिल्यापासून मला फुले फार फार आवडायची. अगदी लहान होतो, तेव्हापासून घटका-घटका राजवाड्यातून दिसणाऱ्या प्रफुल्ल उद्यानाकडे मी टक लावून पाहत बसत असे, म्हणे! रात्र झाली, की मी ओक्साबोक्शी रडू लागे. मला थोपटून झोपविणाऱ्या दासीला मी खूप त्रास देत असे. कधी चिमटे काढ, कधी लाथा झाड, कधी चावा घे, असा माझा क्रम चाले. 'बागेतली सारी फुलं माझ्या मंचकावर आणून ठेव, मग मी झोपतो', असे मी एका दासीला म्हटले होते. तिने हसत-हसत दुसरीला ते सांगितले. दुसरीने कौतुक करीत ते उद्‌गार तिसरीच्या कानांवर घातले. साऱ्या दासींच्या आणि सेवकांच्या तोंडी तोच विषय झाला.

आईलाही माझ्या बोलण्याचे कौतुक वाटले. बाबांच्यापुढे मला उभा करीत ती म्हणाली,

'आमचा बाळ मोठा कवी होणार हं!'

बाबा तुच्छतेने हसले आणि उद्‌गारले,

'कवी? कवी होऊन काय मिळणार आहे ययूला? कवींनी जगातल्या सौंदर्याचं वर्णन तेवढं करावं! पण त्या सर्व सुंदर गोष्टींचा मनसोक्त उपभोग केवळ वीरपुरुषच घेऊ शकतात. आपला ययु श्रेष्ठ वीर झाला पाहिजे. त्यानं एक नि दोन नाहीत, शंभर अश्वमेध करायला हवेत! आपल्या पूर्वजांपैकी पुरूरवामहाराजांनी उर्वशीसारख्या अप्सरेला आपल्या भजनी लावलं होतं. मी स्वतः देवांचा पराभव केला आहे. इंद्रपदावर आरूढ होण्याचा आनंद उपभोगला आहे. ही परंपरा ययूनं चालवायला हवी.'

बाबांचे हे सर्व संभाषण मी ऐकले; पण तेव्हा त्यातले मला काय कळले असेल, देव जाणे! पुढे मोठेपणी माझ्या पराक्रमाचे कौतुक करताना आई बाबांच्या या बोलण्याचा उल्लेख करी, त्यामुळे त्यातला शब्द न् शब्द मला पाठ झाला.

अग्नीची आठवण अशीच आहे. आई ती वारंवार सांगे. माझे धनुर्विद्येचे शिक्षण संपल्यावर बाबांनी वर्षभर मला एका आश्रमात ठेवण्याचे ठरविले. मी आश्रमात जायला निघालो, तेव्हा काही अगदी कुक्कुबाळ नव्हतो; पण आईची माया अंधळी असते, हेच खरे. सोळा वर्षांचा ययु वर्षभर आपल्यापासून दूर राहणार, म्हणून आई एखाद्या लहान मुलासारखी डोळ्यांत उभे राहणारे पाणी पुनःपुन्हा पुशीत होती. तिने आपला कंप पावणारा हात माझ्या तोंडावरून किती वेळा फिरविला असेल, याची गणतीच करता येणार नाही. टिपे गाळीत तिने माझ्या मस्तकाचे अवघ्राण केले. मग सद्‌गदित स्वराने ती म्हणाली,

'ययु, मला तुझी फार काळजी वाटते, बाबा! तू अगदी वेडा आहेस. लहानपणी अग्निशाळेत या ज्वाळा पाहून तू नाचायला लागायचास. एकदा त्या ज्वाळांतून ठिणग्या उडत होत्या. त्या पाहून तू टाळ्या पिटीत ओरडलास, 'फुलं, फुलं!' त्या वेळी मी तुला आवरलं, म्हणून बरं; नाही तर ती फुलं तोडायला तू धावला असतास.' आवंढा गिळून ती पुढे म्हणाली, 'मूल किती मोठं झालं, तरी आईच्या दृष्टीनं ते लहानच असतं. आश्रमात जिवाला जपून राहा हं! तिथल्या नदीत सुसरी असतील, अरण्यात श्वापदं दिसतील; कुठंही जीव धोक्यात घालू नकोस उगीच!'

५

ही फार पुढची आठवण झाली, पण तिच्या आधीच्या अर्धवटपणे आठवणाऱ्या आणि अर्धवट ऐकलेल्या अशा कितीतरी आठवणी माझ्या मनाच्या तळाशी पडून आहेत. मात्र त्यांचा आस्वाद घेण्यात आता रस वाटत नाही मला. काळ्याकुट्ट ढगांनी झाकळून गेलेल्या आभाळातून मंद चांदणे झिरपावे, तशा वाटतात त्या. तथापि, त्या वेळची एक आठवण माझ्या मनात अगदी घर करून राहिली आहे. जखमेचा व्रण राहतो ना? तशी ती आहे. त्या आठवणीचा अर्थ परवा-परवापर्यंत मला कळला नव्हता; पण आता–

आयुष्याच्या आरंभी ज्यात काही अर्थ नाही, असे वाटते, त्यातच खोल अर्थ भरलेला आहे, असे आयुष्याच्या शेवटी आढळून येते.

माझ्या आईची एक आवडती दासी होती. कलिका तिचे नाव. मलासुद्धा ती फार आवडे– अधूनमधून स्वप्नातसुद्धा दिसे. का, ते मात्र काही कळत नसे. मी जी आठवण सांगतोय्, त्या वेळी फार तर सहा वर्षांचा असेन मी. खेळता-खेळता कलिकेने मला धरले. अगदी घट्ट पोटाशी धरले. मी तिच्या मिठीतून सुटण्याची धडपड करू लागलो. तिने आपल्या बाहूंचा विळखा अधिकच दृढ केला. तिला कडकडून चावावे नि 'कशी झाली!' असे म्हणून टाळ्या पिटीत निसटून जावे, असे माझ्या मनात आले. इतक्यात आपल्या छातीशी माझे मस्तक दाबून धरीत ती म्हणाली,

'अलीकडं फार अवखळ झालात हं, युवराज! तान्हेपणी दूध पिताना कलिका हवी होती तुम्हांला! तेव्हा कसे देवासारखे पडून राहत होता माझ्या खांद्यावर! आणि आता–'

मी चकित होऊन प्रश्न केला,

'मी तुझं दूध पीत होतो?'

कलिकेने हसत मान हलवली. पलीकडेच तिची मुलगी अलका उभी होती.

माझ्याच वयाची. तिच्याकडे बोट दाखवीत कलिका म्हणाली,

'या पोटच्या पोरीला वरचं दूध घातलं मी. नि तुम्हांला– ते सारं विसरला, वाटतं?'

मी अधिकच अस्वस्थ झालो. मी तिला विचारले,

'लहान मुलं आईचं दूध पितात ना?'

'हो.'

'तू माझी आई आहेस?'

इकडेतिकडे भयभीत दृष्टीने पाहत ती हळूच म्हणाली,

'असं भलतं-सलतं बोलू नये, युवराज!'

धुमसणाऱ्या यज्ञकुंडातून नुसता धूर निघत राहावा, तशी माझ्या बालमनाची स्थिती झाली. मी हस्तिनापूरचा राजपुत्र होतो, युवराज होतो; मग तान्हेपणी मी एका क्षुद्र दासीचे दूध का प्यालो? आईने आपले दूध मला का पाजले नाही? कलिकेचे दूध मी प्यालो आहे; मग तिला मी आई म्हणून का हाक मारू नये?

ही कल्पना सुचताच माझ्या बालमनावरले दडपण दूर झाले. मी कलिकेला मिठी मारून म्हणालो,

'आजपासून मी तुला आई म्हणणार!'

माझ्या तोंडावर हात ठेवीत ती म्हणाली,

'युवराज, महाराणी आपल्या आई आहेत. त्यांची सर मला कशी येईल? मी त्यांच्या पायाची धूळ आहे!'

मी चिडून प्रश्न केला,

'मग आईनं मला, आपलं दूध का पाजलं नाही?'

कलिका स्तब्ध राहिली.

मी रागारागाने ओरडलो,

'तिनं मला आपलं दूध का पाजलं नाही?'

सशाच्या डोळ्यांनी आजूबाजूला पाहत कलिका माझ्या कानात कुजबुजली,

'मूल अंगावर पाजलं, की बायकांचं रूप कोमेजून जातं, म्हणे!'

कलिकेच्या त्या उद्गारांचा त्या वेळी मला नीटसा अर्थ कळला नाही; पण एक गोष्ट मात्र माझ्या अगदी जिव्हारी लागून राहिली! माझ्या हक्काचे काही तरी माझ्यापासून हिरावून घेतले गेले होते. मला एका मोठ्या सुखाला वंचित केले होते, आणि ते कुणी? तर प्रत्यक्ष जन्मदात्या आईने! नि ते कशासाठी? तर आपले रूप टिकावे, म्हणून! आईसुद्धा इतकी स्वार्थी असते? छे! आईचे माझ्यावर प्रेम नाही.

तिचे प्रेम आहे स्वतःच्या सौंदर्यावर!

६

जाणूनबुजून मी आईवर पहिल्यांदा रागावलो, तो त्या दिवशी. दिवसभर मी तिच्याशी अबोला धरला. रात्री माझ्या मंचकापाशी येऊन तिने 'बाळराजा, ययु–' अशा किती तरी हाका मारल्या. मग माझ्या मस्तकावरून तिने हळुवारपणे हात फिरवला. त्या स्पर्शात प्राजक्ताच्या फुलांचा नाजुकपणा होता. मी थोडासा विरघळलो; पण मुकाच राहिलो. मी डोळे उघडले नाहीत. माझे चिडलेले मन म्हणत होते, मोठमोठ्या ऋषींसारखी शाप द्यायची शक्ती माझ्या अंगी हवी होती, म्हणजे आईची तत्काळ शिळा करून टाकली असती मी!

शब्दापेक्षा स्पर्श अधिक बोलका असतो. पण त्याला काही माणसाच्या काळजाला हात घालता येत नाही. ते काम अश्रूंनाच साधते. माझ्या गालांवर ऊन आसवे पडताच मी डोळे उघडले. आईला रडताना कधीच पाहिले नव्हते मी. माझे बालमन गडबडून गेले. तिच्या गळ्याला मिठी मारून गालाला गाल घाशीत मी विचारले,

'आई, काय झालं तुला?'

ती काहीच बोलेना. मला पोटाशी घट्ट धरून माझे केस कुरवाळीत आणि आसवे गाळीत ती मंचकावर तशीच बसून राहिली.

'माझ्या गळ्याची शपथ आहे तुला!' असे शेवटी मी म्हटले.

थरथर कापणाऱ्या हातांनी माझे मुख तिने वर उचलले. पाणावलेल्या डोळ्यांनी माझ्याकडे पाहत ती सद्‌गदित स्वराने म्हणाली,

'माझं दुःख... कसं सांगू तुला ते, बाळ?'

'बाबा तुझ्यावर रागावले?'

'अं हं.'

'बाबांना बरं वाटत नाही?'

'छे!'

'तुझा आवडता मोर महालातून कुठं उडून गेला?'

'त्या मोराची नाही मला काळजी.'

'मग?'

'माझा दुसरा मोर केव्हा कुठं उडून जाईल–'

'दुसरा मोर? कुठं आहे तो?'

'हा–' असा उद्‌गार काढून तिने मला घट्ट– अगदी घट्ट– पोटाशी धरले.

फुलांचा वास घेताना मी असेच करीत असे. कितीही वास घेतला, तरी माझे समाधान होत नसे. त्या फुलांचा चोळामोळा करून त्यांतला सारा सारा सुगंध एका

क्षणात आपल्याकडे ओढून घ्यावा, असे माझ्या मनात येई.

आई आता तेच करीत होती. मी तिचे फूल झालो होतो.

तिच्या त्या मिठीत माझे अंग दुखू लागले. पण मन मात्र सुखावले. तिच्या डोळ्यांतले पाणी बोटाने निपटीत मी म्हटले,

'नाही, मी तुला सोडून कुठंही जाणार नाही, आई.'

'कध्धी कध्धी?'

बाळपण एकच काळ जाणते– वर्तमानकाळ. मी मोठ्या उत्साहाने उद्गारलो,

'कध्धी कध्धी मी तुला सोडून जाणार नाही.'

ही भीती तिला का वाटावी, हे मला कळेना! मी पुन्हा पुन्हा खोदून तिला विचारू लागलो. शेवटी ती म्हणाली,

'आज दिवसभर तू माझ्यावर रुसला आहेस. एक शब्दसुद्धा बोलला नाहीस तू माझ्याशी. बागेत फिरायला चल, म्हणून संध्याकाळी मी तुझा हात धरला. तो झिडकारून दिलास तू. माझ्याकडं असे डोळे वटारून पाहिलंस! आत्ता तू जागा होतास; पण माझ्या हाकांना ओ दिली नाहीस. माझ्यावर का रागावला आहेस तू? ययु, आईबापांची दुःखं मुलांना कधीच कळत नाहीत! पण तू मला एक भिक्षा घाल. तू तरी त्याच्यासारखं करू नकोस.'

'त्याच्यासारखं? तो कोण?'

लहानपणी राक्षसांच्या कथा ऐकताना 'पुढं काय झालं?' असे मी मोठ्या अधीरपणाने विचारीत असे. त्याच उत्सुकतेने मी आईला प्रश्न केला,

'तो कोण?'

महालात आई आणि मी यांच्याविषयी दुसरे कुणीही नव्हते. दाराबाहेर दासी झोपली असावी. कोपऱ्यातल्या सोन्याच्या समईतील ज्योतसुद्धा पेंगुळली होती.

असे असून आई चोहींकडे कातर दृष्टीने का पाहत होती, ते मला कळेना. ती हळूच उठली. दरवाजा लोटून परत आली. मग माझे मस्तक मांडीवर घेऊन ते थोपटीत मृदू, कंपित स्वरात ती म्हणाली,

'ययु, तू खूप मोठा झाल्यावर हे सांगणार होते मी तुला. पण– आज तू माझ्यावर रुसलास. उद्या रागावशील, परवा डोक्यात राख घालून निघून जाशील. तो गेला, तसा! म्हणून–'

'तो? तो कोण?'

'तुझा थोरला भाऊ.'

'मला भाऊ आहे?'

'आहे, बाळ!'

'थोरला भाऊ आहे?'

'होय.'

'कुठं आहे तो?'

'देव जाणे! जिथं असेल, तिथं देवानं त्याला सुखी ठेवावं, एवढीच प्रत्येक दिवशी मी प्रार्थना करते.'

अगदी लहानपणी अलकेसारखी अनेक मुले राजवाड्यात माझ्याबरोबर खेळत असत. किंचित मोठा झाल्यावर अमात्य, सेनापती, राजकवी, कोशपाल, अश्वपाल, इत्यादिकांच्या मुलांशी मी खेळू लागलो; पण राजवाड्यात माझ्या बरोबरीचे असे कुणी नाही, याचे राहून-राहून मला दुःख वाटे. बागेतली फुलझाडे तुडवीत फुलपाखरांचा पाठलाग करायचा धीरही त्यांना होत नसे. आपला थोरला भाऊ इथे असता, तर असल्या साऱ्या खेळांचे सुख कसे द्विगुणित झाले असते, हा विचार करण्यात मी दंग होऊन गेलो.

७

बाळपण किती सरळ, किती निर्मळ, किती एकमार्गी असते! तो भाऊ केवढा होता, हे काही आईला विचारायचे मला सुचले नाही. तो इथे असता, तर बाबांच्या मागून राज्यावर तोच बसला असता, आपल्याला साधा राजपुत्र म्हणूनच सारा जन्म कंठावा लागला असता, असा मत्सराचा विचारही त्या वेळी माझ्या मनाला शिवला नाही. मला माझा तो थोरला भाऊ हवा होता. खेळायला आणि भांडायलासुद्धा मला हवा होता तो! तो कुठे आहे? काय करतो? आईला भेटायला तो का येत नाही?

मधमाश्यांचे मोहोळ उठावे, तसा असल्या अनेक प्रश्नांनी माझ्या मनाला दंश करायला सुरुवात केली. मी भीत-भीत आईला विचारले,

'त्याचं नाव काय?'

'यति.'

'किती दिवस झाले त्याला जाऊन?'

'तू व्हायच्या आधी वर्ष, दीड वर्ष तो निघून गेला. अगदी एकटा निघून गेला!'

हे शब्द उच्चारताना आईचा स्वर अतिशय व्याकूळ झाला असावा! पण ते काही माझ्या लक्षात आले नाही. 'अगदी एकटा निघून गेला तो!' या तिच्या शब्दांनी यति अतिशय धीट असला पाहिजे, हा एकच भाव माझ्या मनात निर्माण झाला.

मी आईला विचारले,

'तुला न सांगता गेला तो?'

तिने नुसती मान हलविली. तो गेला, त्या दिवसाच्या आठवणीने तिच्या काळजातले शल्य हलविले होते. पण माझे मन आईला न सांगता राजवाड्यातून

निघून जाणाऱ्या साहसी यतीभोवती पिंगा घालीत होते. मी पुन्हा आईला प्रश्न केला,

'तो कोणत्या वेळी गेला?'

'ऐन मध्यरात्री. घनदाट अरण्यात! चांगली दीड प्रहर रात्र होईपर्यंत जागी होते मी. त्याची सारखी समजूत घालीत होते. मग माझा डोळा लागला. पहाटे जागी होऊन पाहते, तो यति आपल्या अंथरुणावर नाही! काळोखात सगळीकडं शोधलं त्याला सेवकांनी; पण तो कुठंच सापडला नाही.'

मी स्वतःशी म्हणालो,

'भाऊ असावा, तर असा!'

लगेच कथेतल्या चमत्कृतीविषयी वाटणारे आकर्षण माझ्या मनात जागे झाले. मी आईला म्हटले,

'यतीला घेऊन कुठं गेली होतीस तू?'

'एका महर्षींच्या दर्शनाला. लग्न होऊन अनेक वर्षं झाली, तरी मला मूल होईना. म्हणून आम्ही दोघं त्या ऋषींच्या आश्रमात जाऊन राहिलो होतो. त्यांच्या आशीर्वादानंच यति झाला मला. प्रत्येक वर्षी त्याच्या वाढदिवशी मी त्याला त्या ऋषींच्या दर्शनाला घेऊन जात असे. तो निघून गेला, तेव्हा मी अशीच परत येत होते. यतीचं मन स्थिर नाही, हे मला ठाऊक होतं. तिथंच राहायचा हट्ट धरून बसला होता तो. त्यामुळं मी त्याच्यावर संतापले. त्याला नाही नाही ते बोलले. वांड खोंडाला गाडीच्या मागं बांधून नेतात ना? तसंच जवळजवळ आश्रमातून ओढून आणलं मी त्याला. त्याच्या रुसव्याफुगव्यांकडं मी लक्ष दिलं नाही. त्याला काय हवं होतं?'

'काय हवं होतं यतीला?' मी उत्सुकतेने मध्येच प्रश्न केला.

टपटप टिपे गाळीत ती म्हणाली,

'अजूनही मला नीट कळलं नाही ते. त्याला देवाधर्माचा नाद फार होता. दासी ताजी, टपोरी फुलं प्रत्येक दिवशी सकाळी पुढं आणून ठेवीत. पण यतीनं झटून त्यांतली काही उचलली नि त्यांचा पोटभर वास घेतला, असं कधी घडलं नाही. केव्हा तरी चार-दोन फुलं तो हळू घ्यायचा आणि कुठल्या तरी दगडाचा देव करून त्याला ती वाहायचा! तो खेळ खेळायचा, तेसुद्धा किती विचित्र होते! समाधी लावून डोळे मिटून बसण्यात, किंवा कसली तरी दाढी लावून लुटूपुटीचा ऋषी होण्यात त्याला आनंद वाटे. दोन्ही कुळांतलं राजेपण त्याच्या रक्तात उतरलं नव्हतं. राजसभेत सशासारखा तो चोहींकडं भीत-भीत पाहत राही. पण कुणी योगी, तपस्वी, संन्यासी राजवाड्यात आला, की त्याच्याशी मात्र त्याची गट्टी होई. खूप खूप शोध केला आम्ही त्याचा; पण आभाळातून गळून पडलेली चांदणी कधी कुणाला दिसते का? माझा यतीही तसाच–'

माझ्या जन्मापूर्वीचे आपले हे दुःख आई शक्य तितक्या शांतपणाने मला सांगत होती. पण शेवटच्या क्षणी तिच्या मनाचा बांध फुटला. 'माझा यतीही तसाच–' हे शब्द तोंडातून बाहेर पडताच घनदाट अरण्यातली ती क्रूर पहाट तिच्या डोळ्यांसमोर मूर्तिमंत उभी राहिली असावी. बोलता-बोलता ती अडखळली, थांबली, कापू लागली. करुण स्वर आळविणाऱ्या सतारीची तार एकदम तुटावी, तसा भास झाला मला! क्षणभर तिने माझ्याकडे शून्य दृष्टीने पाहिले. त्या दृष्टीचे भय वाटले मला. लगेच तिने एका मोठा सुस्कारा सोडला आणि मला पोटाशी धरून ती स्फुंदून-स्फुंदून रडू लागली. तिचे सांत्वन कसे करायचे, ते मला कळेना.

'आई, आई' असे मी तोंडाने म्हणत होतो आणि तिला बिलगून स्पर्शाने माझे हद्‌गत व्यक्त करीत होतो. मनाचा कढ थोडासा ओसरल्यावर ती मला म्हणाली,

'ययु, यति तुझ्याएवढा होता, तेव्हा पहिल्यांदा माझ्यावर रुसला. त्या रुसव्याकडं मी लक्ष दिलं नाही, पण आज तुझा रुसवा पाहताच माझ्या काळजाच्या जखमेची खपली उडून गेली. तिच्यातून भळभळ रक्त वाहू लागलं. जे कुठंही बोलायचं नाही, असं आम्ही दोघांनी ठरविलं होतं, जे लहानपणी तुझ्या कानांवर पडू नये, म्हणून आम्ही धडपड करीत होतो, ते तुझ्यापाशी मी बोलून गेले; भीतीमुळं बोलून गेले. तू यतीसारखाच एखाद्या दिवशी निघून गेलास, तर? ययु, मूल हे आईच्या डोळ्यांतली बाहुली असतं, रे!'

मी स्फुंदत म्हणालो,

'नाही, आई, यतीसारखा मी तुला सोडून जाणार नाही. तुला दुःख होईल, असं मी काही करणार नाही!'

'मला वचन दे.'

मी माझा हात तिच्या हातावर ठेवून म्हणालो,

'आई, मी कध्धी-कध्धी संन्यासी होणार नाही!'

८

अजून ती रात्र माझ्या डोळ्यांपुढे उभी आहे. पाषाणातून कोरून काढलेल्या मूर्तीसारखी! इतके उन्हाळे गेले. इतके पावसाळे गेले, पण तिची स्मृती अद्यापि कोमेजली नाही. त्या मूर्तीची एक रेषासुद्धा पुसट झालेली नाही.

त्या रात्री आईचे आणि माझे जे बोलणे झाले, त्यात माझ्या मनाचे रंग किती आहेत आणि ते कुठेकुठे मिसळले आहेत, हे काही मला आज सांगता येणार नाही; पण एक गोष्ट मात्र निश्चित आहे. त्या एका रात्रीत मी मोठा झालो. स्वप्नाच्या जगातून सत्याच्या जगात आलो. दुःखाशी माझी त्या रात्री पहिली ओळख झाली. ज्या आईच्या साध्या स्पर्शात स्वर्गसुख आहे, असे मी मानीत होतो, तिला टपटप टिपे

गाळताना मी पाहिले. तिला दुःख देणाऱ्या गोष्टींचा नकळत मी द्वेष करू लागलो.

त्या रात्री शांत अशी झोप मला लागलीच नाही. मी मधूनमधून दचकून जागा होत होतो. मधूनच मला स्वप्ने पडत होती. त्या स्वप्नांतले एक आजही मला आठवते. ते आठवले, म्हणजे हसू येते. त्या स्वप्नात मी साऱ्या जगाचा राजा झालो होतो. चाबूक हातात घेऊन मी प्रत्येक नगरातून हिंडत होतो. तापसी, संन्यासी, बुवा, बैरागी कुणीही दिसला, की त्याच्या पाठीवर सपासप फटके मारीत होतो. एखाद्याच्या पाठीतून रक्ताची चिळकांडी उडली, म्हणजे टाळ्या पिटीत होता

९

होय, त्या रात्री मी मोठा झालो, जीवनाचे खरे स्वरूप अंधाराने भरलेल्या त्या रात्रीच्या दोन प्रहरांत मला स्पष्ट दिसले. मला थोरला भाऊ होता, तो संन्यासी होण्याकरिता पळून गेला होता, ही गोष्ट सर्वांनी माझ्यापासून लपवून ठेवली होती, ती का? या लपवालपवीचे कारण काय? की सारीच माणसे एकमेकांशी अशी लपंडाव खेळत असतात?ही जाणीव होईपर्यंत माझे जग फुलांच्या, वाऱ्याच्या किंवा पाण्याच्या जगाहून निराळे नव्हते. सकाळी फुले फुलतात, तसा मी झोपेतून जागा होत असे. एखाद्या वेळी वादळ झाले, तरी त्याचे मला कधीच भय वाटत नसे. पाण्याप्रमाणे वाऱ्यालाही अधूनमधून अकांडतांडव करण्याची लहर येत असावी, असे मला वाटे. झुळूझुळू वाहणारे पाणी पाहिले, म्हणजे माझ्याप्रमाणे तेही कुठले तरी गाणे स्वतःशीच गुणगुणत आहे, असे माझ्या मनात येई.

प्रिय वाचकमित्रहो........

आपल्या सोयीसाठी

'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे ग्रंथदालन आठवड्याचे

सातही

दिवस नियमित सुरू राहील.

वेळ -सोम. ते शनि. ९.३० ते ६.३०

रविवारी सकाळी १० ते ४

सभासदांनी पुस्तकखरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे.

नवे कोरे

बिट्रेयल

पॉल कार्सन

अनुवाद

मुकुंद कुर्लेकर

२२०रु. पोस्टेज ३०रु.

डब्लीनमधील हार्मन सुधारणागृह हा युरोपमधील सर्वात भयानक तुरुंग...
डॉ. फ्रँक रयान यांच्याकडं बंदिजनांच्या आरोग्याची जबाबदारी आहे. फार जोखमीचे काम. ह्याआधीच्या डॉक्टरचा खून झाला होता.
डॉ. रयान याने मात्र ही जबाबदारी आव्हान म्हणून स्वीकारली आहे. एका पहाटे रयानला फोन करून तुरुंगात बोलविण्यात येते. सुखशय्येतील प्रेयसीचा निरोप घेऊन डॉ. रयान तडक निघतो पण तो सापडतो एका सापळ्यात.
शुद्धीवर आल्यावर त्याला वाटतं की तो हॉस्पिटलमध्ये आहे पण काहीतरी चुकतंय. परिचारिका खोलीचे दार कुलूप लावून का बंद करतेय? लिसा का भेटायला येत नाही? रयान तुरुंगात तर नाही?
परस्परविरोधी आणि गोंधळात टाकणाऱ्या पुराव्यामुळे डॉ. रयान चक्रावून जातो. त्याचा माग काढताना डॉ. रयान तुरुंगातील संवेदनाशील 'जे' कक्षापर्यंत पोहोचतो. तिथे एका गूढव्यक्तीचे वास्तव्य आहे...

*** व्यंगचित्रकार मारिओ मिरांडा**

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व्यंगचित्रकार मारिओ मिरांडा (वय ८५) यांचे त्यांच्या लोटली (गोवा) येथील निवासस्थानी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी हबीबा, पुत्र ऋषद व राहुल असा परिवार आहे. चित्रकलेचे कोणतेही विद्यापीठीय शिक्षण त्यांनी घेतलेले नव्हते. पण रेषांच्या दुनियेतील त्यांचा प्रवास अद्‌भुत आहे. १९५० मध्ये त्यांनी आपल्या गावातील पहिले चित्र काढल्याची नोंद आहे. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. कला शाखेतील पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर 'करंट', 'ब्लिट्झ'सारख्या मासिकांतून व्यंगचित्रे काढण्यास त्यांनी सुरवात केली. त्यांनी मुंबई आणि लंडन शहरांवर आधारित तौलनिक रेखाचित्रांची निर्मिती करून त्याचे प्रदर्शन इंग्लंडमध्ये भरविले. मिरांडा यांनी गोव्यातील खेडी व शहरे यांचे प्रभावी चित्रण केले आहे.

मिरांडा यांचे न्यूयॉर्क शहरावरील व्यंगचित्रांचे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. त्याचबरोबर 'गोवा विथ लव्ह', 'इनसाइड गोवा' ही त्यांची पुस्तके गाजली आहेत. त्यांना सरकारकडून पद्मश्री (१९८८) व पद्मभूषण (२००२) देऊन गौरविण्यात आले होते.

*** साहित्यिक, जैन धर्माचे अभ्यासक शांतिलाल भंडारी**

सुप्रसिद्ध साहित्यिक व जैन धर्माचे गाढे अभ्यासक शांतिलाल राजाराम भंडारी (वय९०) यांचे आज अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, ३ मुली, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या इच्छेनुसार मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले.

भंडारी यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील खटाव येथे ३१ जुलै १९२२ रोजी झाला. त्यांचे शालेय शिक्षण खटाव, कोरेगाव, सातारा येथे तर महाविद्यालयीन

शिक्षण कोल्हापूर, पुणे येथे झाले. त्यांनी मुंबई विद्यापीठाची बी.एस्सी पदवी संपादन केली. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात त्यांचा सक्रीय सहभाग होता. लग्नपत्रिका छपाई व्यवसायाचे ते मूळ प्रवर्तक होते. त्यांच्या विविध विषयांवरील पुस्तकांना राज्य शासनाचे पुरस्कार मिळाले आहेत. जैन धर्माशी संबंधित त्यांचे अनेक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. २००२ च्या १४ व्या अखिल भारतीय जैन साहित्य संमेलनाचे त्यांनी अध्यक्षपद भूषविले होते. २००३ मध्ये त्यांना पुणे विद्यापीठाची फेलोशिपही मिळाली होती. आनंद साहित्यरत्न पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले होते. काही पुस्तकांचे हिंदीतही भाषांतरही करण्यात आले. 'दिवस सळसळणाऱ्या रक्ताचे' हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिद्ध आहे.

१५ व्या वर्षापासून भंडारी यांनी लेखनास प्रारंभ केला. कोरेगाव येथे असताना १९७८ पर्यंत त्यांची ३१ पुस्तके प्रकाशित झाली होती. बालकुमार साहित्यात फुलपाखरे, मालवते दीप, टिल्लू, गोष्टी घ्या गोष्टी, अशा वेळी आई हवी होती आदी पुस्तकांचा समावेश आहे.

भंडारी हे १९७८ मध्ये पुण्यात आले येथे त्यांनी विपुल लेखन केले. त्यांचे ६० ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. याशिवाय वृत्तपत्रांतही ते लेखन करीत.

त्यांची काही पुस्तके

* कादंबरी : आज आणि पाणी, पूर्व आणि पश्चिम, संघर्ष, निर्णय, जमीन-अस्मान, शिशिर, भव्यदिव्य * राजकीय कादंबरी : आम्ही खुर्चीचे गोंधळी, कालचा गोंधळ बरा होता * कथासंग्रह : पिंजरा, पाखरं, यशवंत हो यशवंत, बहर, बरात, सांगावा, कुजबुज. * प्रवासवर्णन : रूप पाहता लोचनी, साबरमती ते साबरमती, * जैनदर्शन : अमृतसमयी, भगवान महावीर, महन्मंगल, सर्वोदयतीर्थ.

*** कन्नड कादंबरीकार नरसिंहय्या**

कन्नडमधील प्रसिद्ध कादंबरीकार एन. नरसिंहय्या (वय ८६) यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. आपल्या गुप्तहेरी कथानकांनी नरसिंहय्या यांनी वाचकांच्या अख्ख्या पिढीवर गारूड केले. त्यांच्या कादंबऱ्या एवढ्या लोकप्रिय होत्या की, ते गुप्तहेर नरसिंहय्या म्हणून ओळखले जात असत.

त्यांनी ५५० हून अधिक पुस्तके लिहिली असून एकदा तर त्यांनी एका दिवसात एक कादंबरी लिहिली होती. 'पुरुषोत्तम' हे त्यांच्या कादंबऱ्यांमधील नायकाचे पात्र प्रचंड गाजले. पाच रूपयांपेक्षाही कमी किंमतीत मिळणाऱ्या त्यांच्या कादंबऱ्या लोकप्रिय ठरल्या.

नरसिंहय्या यांच्या वैद्यकीय उपचारांचा खर्च करणेही त्यांच्या कुटुंबीयांना अखेरच्या काळात अवघड गेले; सरकारकडून मिळणाऱ्या एक हजार रूपयांच्या निवृत्तीवेतनावर ते गुजराण करत होते.

*** साहित्यिक द. पं. जोशी**

ज्येष्ठ साहित्यिक प्रा. दत्तात्रय पंढरीनाथ जोशी (वय७९) यांचे हैदराबाद (आंध्र प्रदेश) येथे अल्पशा आजाराने निधन झाले. द. पं. आंध्रातील मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष होते. तसेच मराठी साहित्य महामंडळाचे ते माजी उपाध्यक्षही होते. 'पंचधारा' या त्रैमासिकाचे चार दशकांहून अधिक काळ त्यांनी संपादन केले.

*** कवयित्री वंदना विटणकर**

ज्येष्ठ गीतकार आणि कवयित्री वंदना विटणकर यांचे नेरूळमधील डॉ. डी.वाय.पाटील रूग्णालयात हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्या ७० वर्षांच्या होत्या. त्यांच्या इच्छेनुसार नेत्रदान आणि देहदान करण्यात आले.

वंदनाबाई दोन वर्षांपासून नेरूळच्या सेक्टर-५ मधील ब्राह्मण सेवा मंडळाच्या आश्रमात राहत होत्या. शनिवारी पहाटे ३ वाजल्यापासूनच त्यांना अस्वस्थपणा जाणवत होता. म्हणून त्यांना शेजारील डॉ. डी. वाय. पाटील रूग्णालयात सकाळी दाखल करण्यात आले होते; परंतु हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. त्या वेळी त्यांच्यासमवेत पती किशोर पनवेलकर, तसेच ज्येष्ठ अभिनेते विजय गोखले उपस्थित होते.

वंदनाताईंनी नेत्रदान व देहदान करण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार नेत्रदान व देहदान करण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती ठीक नव्हती. किशोर पनवेलकर हे 'रंगशारदा' संस्थेशी जोडले गेले होते. ३० ते ३५ वर्षांपासून या संस्थेचे ते कार्यकर्ते राहिले आहेत. वंदनाच्या निधनाने पोरका झालो, अशी भावना त्यांनी 'सकाळ'कडे व्यक्त केली.

❒

नवे कोरे



२५०रु. पोस्टेज ३०रु.

चिकन सूप फॉर द सोल इंडियन टीचर्स

जॅक कॅनफिल्ड
मार्क व्हिक्टर हॅन्सन
वेंडी एम. डिक्सन

अनुवाद
सुषमा जोशी

शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. यात देणारा आणि घेणारा दोघंही शिकत, शिकवत असतात.

कित्येक शिक्षक विद्यार्थ्यांना तळमळीनं शिकवत असतात. शिक्षकांच्या आचारविचारांमुळे, त्यांच्या शिकवण्यामुळे विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळत असते. शिक्षक ज्याप्रमाणं विद्यार्थ्यांना शिकवतात, त्याप्रमाणेच विद्यार्थीही काही वेळा आपल्या वागण्यातून शिकवतात, प्रेरणा देतात.

शिक्षकांचा विद्यार्थ्यांवर नकळत पडणारा प्रभाव, कळत-नकळत होणारे संस्कार यामुळे विद्यार्थ्यांचं आयुष्य समृद्ध होत असतं. याबद्दलची कृतज्ञता यातील अनुभवांतून व्यक्त होताना दिसते. ही समृद्धी आणि कृतज्ञता हेच शिक्षकाचं वैभव असतं.

शिक्षकी पेशातील अशाच विविध अनुभवांचं अनोखं मिश्रण या पुस्तकात आहे.

आजच्या परिस्थितीत शिक्षकाला आपलं कार्य करत असताना कित्येक वेळा निराशा येते. ही निराशा दूर करण्यासाठी हे 'चिकन सूप' अत्यंत गुणकारी आहे.

To,
Mr. Atul Kahate

It is regarding your book on perfectionist Steve Jobs "Steve Jobs - Ek zapatlela tantradnya".

I have read the book and it is really a good book.

Every page of the book kept me interested and curious too......

Various aspects of Jobs life are woven in structured manner.

Key takeaways given in conclusion are also well described....

Thank you for bringing a good book for readers...

Regards,
Prashant Kulakrni

नवे कोरे



अंतरिक्षाच्या अंतरंगात

लीना दामले

१५०रु. पोस्टेज २५रु.

खगोलशास्त्राचा अभ्यास करायचा झाल्यास किचकट गणित व भौतिकशास्त्र अशा गंभीर विषयांना तोंड द्यावे लागते. मात्र खगोलशास्त्रातील गणित व भौतिकशास्त्र वगळून जर एखाद्याला त्यातील फक्त मनोरंजक माहिती मिळवायची इच्छा असेल, तर प्रस्तुत पुस्तक जरूर वाचावे.

हलक्या फुलक्या भाषेत खगोलशास्त्राशी तोंडओळख करून देता देता लेखिका आपल्या सूर्यमालेतील सभासदांविषयी माहिती देते. तसेच सूर्यमालेबाहेरील विविध परग्रह, ते शोधण्याच्या पद्धती, तारे व ताऱ्यांचे रंग यासंबंधी माहिती येते. विविध प्रकारच्या दुर्बिणी, त्यातून होणारे ब्रह्मांडाचे दर्शन, गुरुत्वीय भिंगासारखे चमत्कार, तर विश्वनिर्मितीसंबंधी अजूनही समाधानकारक विवेचन न मिळाल्याने शास्त्रज्ञांनी मांडलेले 'बिग बँग', 'स्टेडी स्टेट युनिव्हर्स' इ. सिद्धान्त विविध लेखांद्वारे लेखिकेने मांडले आहेत.

बालनगरी

अनुक्रमणिका

विद्याधरांचे दुकान	१०५
चित्र रंगवा	११३

भारतीय साबरी विद्येच्या पार्श्वभूमीवरील अफलातून फँटसी
विद्याधरांचे दुकान

(मागील अंकावरून)

वाघ्याकाका परतले. आपल्या एका हवालदार मित्राच्या ताब्यात त्या पिसाटलेल्या दारूड्याला सोपवून ते आले होते. ''चोर म्हणतो कसा, म्हाताऱ्या माणसावर आपण हात उचलत नाही म्हणून, थेरड्या वाचलास''.

मी, मी म्हातारा? थरथर कापत ते ओरडले. त्यांचे पुस्तकात दंग झालेल्या नलीकडे लक्ष गेले, ''चल ग पोरी. तुला तुझ्या घरी पोहाचवून येतो. तो भामटा तर आत गेला पण पांडू हवालदार म्हणत होता, आज गटारीच्या दिवशी असली गटारातली डुकरे कुत्र्याच्या छत्रींप्रमाणे सगळीकडे उगवलेली असतात.''

नलीची काही ताबडतोब निघण्याची इच्छा दिसेना. तेजाने अनिता सुदवाले आपल्या खात्यावर द्यायला सांगून तीची सोय केली. तरीही नलीला तिथून पाय काढवत नव्हता. इतक्या विषयांवरची इतकी सचित्र पुस्तके तीने पाहिली नव्हती कधी. वेगवेगळे पशु पक्षी त्यांच्या फोटोसकट आणि त्यांचे आवाज काढणाऱ्या बटणांसहीत असणारी संगीतमय पुस्तके तिथे होती. पान उलगडता, उलगडता त्यात वर्णिलेली दृश्यवर्णने, प्रसंग त्रिमितीत साकार करणारी कारागिरीमय पुस्तके होती. फार काय आज तीचा जो धडा चुकला होता त्याची भुमितीमधली प्रमेये सहज, सोप्पी समजावून देणारे पुस्तक तीला सापडले होते.

''मी परत इथे आले तर चालेल?'' नलीने भीत भीत विचारले.

अरेरे! ''गरिब बिच्चारी छळ सोसणारी पोर.'' परांजपे बाईंनी क्षणाचाही विलंब न लावता तीला परवानगी देऊन टाकली. वाघ्याकाका नलीला घेऊन निघेपर्यंत बाईंना ओमची आठवण झाली.

''जरा पहा या मुलाचे काय करायचे ते वाघ्याकाका. याचे रंगवलय नाही आहे. तुम्हीच सांगा नियमांबाहेर जाऊन मी तरी कशी त्याला पुस्तके देऊ?''

ओहोहो! ओशाळवाणेपणे हसत वाघ्याकाका बोलले, ''आजकाल अधीमधी कधी ही स्मरणशक्ति अशी दगा देऊन जाते बघा. आर्या

पशुमित्रांनी त्याचे रंगवलय मणी माझ्याकडे आधी देऊन ठेवले होते. त्याला द्यायचे विसरूनच गेलो साफ. वयाचा परिणाम!'' आणि त्यांनी पटकन जीभ चावली. स्वतःच्याच तोंडाने स्वतःचीच कबुली. त्यांनी स्वतःचे खिसे चाचपायला सुरूवात केली. असे करता त्यांनी स्वतःच्या अख्ख्या शरीराची तपासणी सुरू केली.

''मला वाटतं माझ्या निळ्या डगल्याच्या खिशात राहिले.'' ''अरेरे! ओम बुवा नाराज नका होऊ माझ्यावर. उद्या सकाळी नक्की तुला तुझ्या घरी आणून देतो बघ.''

ओमने गुमान मान डोलवली. वाघ्याकाका, नली गेले. परांजपे बाईंनी ओमकडे सहानुभूतीपुर्वक पाहिले.

''ओम तुझ्या मित्रांचे आटोपेपर्यंत तू इथे बसू शकतोस. पुढच्या खेपेला तुझे रंगवलय आणलेस ना की मी किनई अगदी स्वतः जातीने तुला सर्वोत्तम पुस्तके काढून देईन''. ओमला त्यांच्या मानभावीपणाचा राग आला. नली अमुदित दाखलही झाली नाहीय. तीला खुशाल पुस्तक घरी नेऊ दिले आणि त्याला पुस्तके बघायलाही देत नाहीयत. तो आशाळभूतपणे त्या पुस्तकांकडे पाहत राहीला. तेजाने चार, पाच पुस्तके इकडची तिकडे केली. ती श्यामळली आणि उठली. रानडुकरे निरक्षर असतात.

''बाई माझे आटोपले. मी ओमला घेऊन जाते.'' तीने पटकन परांजपे बाईंचा निरोप घेतला. एक नजर पंडीकडे टाकली. पुस्तके जिच्यासाठी प्राणवायू आहेत, ती हाकलल्याशिवाय तिथून बाहेर पडेल हे शक्य नव्हते. ओमच्या खांद्याभोवती हात टाकून तेजा म्हणाली, चल दोस्त. तीच्या असल्या पुरूषी वागण्याकडे परांजपे बाईंनी नापसंतीचा एक तीव्र कटाक्ष टाकला. त्यांची पर्वा न करता दोस्तांची जोडगोळी बसबाहेर पडली. रस्त्यावर आली.

''तेजा, हे रंगवलय कशाला हवे असते?'' ओमला तेजाकडून फारशा व्यवस्थित उत्तराची अपेक्षा नव्हती. ज्ञानसाधनासाठी ती एक फारसे चांगले साधन नव्हती. पंडीने त्याच्या सगळ्या शंका व्यवस्थित फेडल्या असत्या.

“काय माहित?” नेहमीचे बेपर्वा उत्तर आले. ते लोक सांगतात म्हणून आम्ही ते घालतो.” पंडी म्हणते “त्याच्यामुळे आपल्याला आपल्यासारखे लोक, शत्रू आणि मित्र ओळखता येतात. ज्याचा रंगमण्यांचा क्रम आपल्या सारखा असतो ते मित्र आणि नसतो ते शत्रू.”

“मग तुझा आणि पंडीचा कुठे सारखा आहे. तुझा पहिला मणी लाल आहे आणि पंडीचा निळा. उलट शेराचा पहिला मणी लाल आहे. त्याच्याशी तू नेहमी भांडत असतेस. ओमने रंगवलय प्रकाराचे बरेच निरीक्षण केलेले दिसत होते.” ते एकूण सात रंगाचे मणी होते. म्हणजे त्यांचे वेगवेगळे क्रम करून पाच हजारच्या वर क्रमवारी बनणार असती. परवलीचासाठी असली क्रमवारीची गणिते करण्यात ओम पटाईत झाला होता.

“ऊँ! मग तसे नसेल. तू कशाला एवढी फिकीर करतोस. तुला उद्या सकाळी वागडे आज्या आणून देणार आहे ना रंगवलयाचे मणी.”

“हो, पण मी क्रम काय ठरवू? तुझा ठेवू कि पंडीचा?”

तेजाने त्याच्याकडे ती नेहमीची अडाणी रे अडाणी वाली नजर टाकली. याचसाठी तीला कसली शंका, आगाऊ सावधगिरी, सूचना वगैरे काही विचारायचे ओमच्या मानी स्वभावाला अतिशय कठीण जात असे. मग त्याचा आज उडाला तसा फज्जा उडत असे.

“माझा आणि पंडीचा कशाला हवाय तुला? तुझा तू ठरव ना.” त्याची किव करत तेजाने म्हटले. त्याच्यावरून आपला स्वभाव, कल, आवड, निवड त्यांना कळते आणि तशा ते आपल्याला वस्तू वगैरे देतात. सरलकाका मला एकदा असं म्हणाला होता.

“ओम मनोमन तीच्यावर चांगला उखडला. हेच तर मगाशी तो विचारत होता ना?” सरलकाकाचा विषय निघाला त्यावरून त्याला आठवले.

सरलकाकाने त्याला पाच हारितीपतीच्या मोहरा खर्चाला दिल्या होत्या. त्या कशा खर्च कराव्यात त्याला ठरवता येत नव्हते. दाजी किराणावाला असल्या मोहोरा रोजच्या रूपयां, नाण्यांऐवजी चालवून

घेणार नाही. त्यात एक चॉकलेटची मोठी वडी येणार नाही. तर त्यांचा काय उपयोग? दिक्षित कुटुंबातल्या तेजा, पंडीला त्यांचा उपयोग चांगला माहीत असायला हवा. गेले काही दिवस हे गुपित कोणाला सांगावे त्याला ठरविता येत नव्हते. तेजाला नाहीच नाही. त्याने ठरवले.

''चल मी तुला आईस्क्रिम देते. त्या विद्याधरकडे सिताफळाची कुल्फि मस्त मिळते.'' तेजाने त्याला रस्त्याच्या कडेला असलेल्या

मोठया आईस्क्रिम केंद्राकडे वळवले.

नैसर्गिक शुद्ध आईस्क्रिम मिळण्याचे एकमेव दुकान अशी पाटी त्यांनी लावलेली. तीच्यावर कोपऱ्यात विदयाधर यांचे कडे ओमचे यापूर्वी कधी लक्ष गेले नव्हते. आईला सुट्टी असली कि तिकडे ती दोघे येत. ओमने आपली माहिती पुरवली, तिथे डाळींबाचा फालुदा पण मस्त मिळतो.

''चालेल. तुला आवडतो तर आपण फालुदा खावूया.'' तेजाचे डोळे येऊ घातलेल्या रसाळ मेजवानीसाठी चकाकले होते. फालुदा

बराच महाग होता. तेजाचा चेहरा जरा पडला. तीने खिशातुन एका बाजूला पैसे काढून मोजले. तीच्या गणितात कच्च्या डोक्याने काही हिशोब केला आणि ऑर्डर दिली, एक फालूदा डाळींबाचा आणि एक लिंबू सरबत.

''लिंबू सरबत कोणासाठी?'' ओमने खवचटपणे विचारले.

''माझ्यासाठी.''

का? आपण दोघेही फालुदा घेऊया. ओमने मुद्दाम तीला टोचले.

''अं. मला डाळींब आवडत नाही.'' ती मऊ आवाजात म्हणाली.

''मग तुला कुल्फि घे ना सिताफळाची.'' तीच्याकडे पैसे कमी आहेत याचा अंदाज ओमला आला होता. ती नेहमीच पैशाच्या चणचणीत असे. तीच्याकडे सहसा मोठ्या नोटा नसत. बव्हंशी नाणी असत. चिल्लर खुर्दा. खर्चाला मात्र तीचा हात आखडता नसे. तशी ती फार उदार होती. धुंडीने जर हलवायांच्या दुकानातल्या, रस्त्यावरल्या गाडीवाल्यांकडे, घसीटाराम कराचीवाल्याकडे काही वेगळ्या चवी व पदार्थ आयुष्यात पहिल्यांदा चाखले असतील तर तेजाच्या मेहेरबानीमुळे. याऊलट द्वाड चंटी. मिठेलाल प्यारेमोहनच्या दुकानात तीने एकटीने सर्वांसमोर बदामी हलवा घेऊन खाल्ला होता. तीचे बगलबच्चे राम, श्यामला सुद्धा हलवा फार चिकट आहे रे, तुकडा पडत नाहीये, असे सांगून अजिबात वाटणी न करता खाल्ला होता.

''नको, नको.'' तेजा अवघडत म्हणाली.

''लवकर सांगा जरा, नक्की काय ते.'' सरबराईदाराने आढ्यतेने मुलांना फर्मावले.

आपण दोन सीताफळाच्या कुल्फ्या घेऊ. तेवढे जमेल ना? ओमने तीची फार परीक्षा न घेता तोड काढली. याचा परिणाम उलटा झाला.

''तुमच्याकडे किती पैसे आहेत तेवढे आधी गल्ल्यावर जमा करा, बिल होणार तेवढे.'' सरबराईदाराने त्यांना तुच्छतेने दरडावले. तेजाचा असा अपमान व्हावा अशी ओमची इच्छा नव्हती.

''तेजा आपण जाऊ या.'' ओम उठत म्हणाला. फेकून मारायला त्याच्या खिशात देखिल पैसे नव्हते. होत्या फक्त मोहरा.

तेजाने त्रासिक मुद्रेने पाहिले. मग सरबराईदाराकडे रागाने. ती आता त्याला एखादा ठोसा मारून देते की काय, अशी भीती ओमला वाटली. एका लहान मुलीच्या मर्यादांची तीला पुरेशी जाणीव असावी. तसे काही न करता फक्त मुठी आवळून ती दुकानाबाहेर पडली. सरबराईदार अवाक होऊन दोघांकडे पाहत राहिला. दोन चिल्लर पिल्लर त्याला असा सणसणीत टोला हाणतील, त्याला अपेक्षा नव्हती. नकळत त्याने एक कटाक्ष गल्ल्यावरल्या मालकाकडे टाकला. दारापलीकडे गेलेल्या नाराज गिऱ्हाइकांवरून तिथे बसलेल्या मालकाने आपल्या उद्धट नोकराकडे एक तीव्र कटाक्ष फेकला. ''हुँ! आजकालची ही कार्टी आईबापांच्या लाडाने फारच शेफारून गेलीत. इवलासा जीव न त्याचा मानपान केवढा.'' मालकापासून चेहऱ्यावरल्या आठ्या लपवून सरबराईदार दुसऱ्या गिऱ्हाईकांकडे वळला.

ओम मनोमन चांगलाच खजिल झाला होता. एवढया मोठ्या मनाने ती आपल्याला फालुदा खिलावायला निघालेली, तर आपण तीच्यावर असला अपमान ओढवला. हां, वागते कधी कधी ती आडमुठेपणाने, पण मुद्दाम तर नाही ना. तीची भरपाई नेमकी कशी करावी त्याला कळेना, तेजा... त्याने साद घातली.

''ओम, ती विचारांतून भानावर आली, चल आपण गोळेवाल्याकडे कालाखट्टा खावूया.'' तीने झाले गेले विसरून जाऊया अशा पद्धतीने म्हटले.

मला एक गंमत दाखवायची होती. ओम कुजबुजला.

तेजाने प्रश्नार्थक नजरेने त्याच्याकडे बघितले. तिची उत्सुकता चाळवलेली दिसली. ओम खिशात हात घालून नाण्यांशी चाळा करत होता. त्यातले एक नाणे बाहेर काढून तीच्या हातात ठेवत, त्याने तीची मुठ बंद केली, ''गुपचुप बघ.''

तेजाने बंद मुठीत काय असेल स्पर्शावरून अंदाज घ्यायचा प्रयत्न केला. मग मुठ डोळयांपाशी आणून किलीकिली करून आत काय असेल पाहायचा प्रयत्न केला. हळूहळू मुठ एवढी उघडली कि ओमला मोहोर स्पष्ट दिसली. तोच तीने मुठ एकदम गच्च आवळली व दुसऱ्या मुठीने बंद करून घेतली.

''तुला ही कुठून मिळाली?'' ती कुजबुजली. तीच्या आवाजातला थरार लपत नव्हता. ओमला नेमके काय सांगावे कळेना. त्याचा गोंधळ उडाला.

''सरलकाकाने दिली.''

''त्याला कुठून मिळाली?''

''त्याच्याकडे असतात.'' एवढेच मोघम बोलून ओम गप्प बसला.

तेजाने थोडा विचार केला, ''तु याचे काय करणार?''

''मी काय करणार? तूच ठरव.''

''आपण ही खर्च करूया का?''

''हो. खर्च करायला तर दिल्यात.''

''दिल्यात म्हणजे अजून आहेत? किती?'' तेजाचे डोळे नुसते लखलखत होते. मोहोरांसारखे.

''पाच.''

तेजा ओमचा हात धरून तरातरा निघाली. ते पुन्हा विद्याधरांच्या आईस्क्रिम केंद्रावर आले होते. तेजाला त्या सरबराईदाराचा वचपा काढायचा असावा. असे ओमला वाटले. ती तडक त्याला घेऊन गल्लयावरल्या मालकाकडे गेली. म्हाताऱ्या मालकाने नम्रता धारण करत नाराज गिऱ्हाईक परत का आले, हे जाणून घ्यायचा प्रयत्न केला. अचानक तेजाचा परवलीचा कानात वाजला आणि ओम आश्चर्यात पडला. तोच आश्चर्यात पडलेल्या म्हाताऱ्या मालकाने देखिल उच्चारलेला तीन अक्षरी परवलीचा ओमच्या कानात खणखणला. आता तो म्हातारा अपेक्षेने ओमकडे पाहू लागला.

''तेजाने ओमला कोपराने ढोसले, त्याच्या कानात सांग.''

ओमच्या डोक्यात आधी प्रकाश पडला नाही. तसा पडल्यावर तो म्हाताऱ्याच्या कानाजवळ गेला आणि त्याने म्हाताऱ्याच्या कानात म्हाताऱ्याने ऐकवलेला परवलीचा त्याला ऐकवला. म्हाताऱ्याच्या कपाळावर शंकांचे जाळे उठले. तेजाने त्याला समजावले कि ओमला सध्या तात्पुरती परवलीचाचा वापर करण्यास शाळेत मनाई केलीय. म्हाताऱ्याच्या चेहऱ्यावर समजले, समजले असे भाव उमटले.

''तू फारच खोड्या करतोस तर शाळेमध्ये, आं!'' त्याने खेळकरपणे

ओमला म्हटले. ओमने त्याचा भाव समजून उगीचच लाजल्यासारखे करून दाखवले. म्हाताऱ्याने तीनदा हाताच्या टाळया वाजविल्या आणि पुकारले. ''चित्ररूप या दोघांना वरच्या कक्षांमध्ये घेऊन जा कसे.''

तोच मगासचा चढेल सरबराईदार, खोटा नम्रभाव धारण करून दोघांना सामोरा आला. मुले त्याच्या मागोमाग जिना चढून पोटमाळयावर, छोटे छोटे कक्ष गिऱ्हाईकांना खाजगीपणा पुरवण्यासाठी केलेले, त्यातल्या एकात जाऊन बसली. लाकडांची अर्धवट झुलती दारे त्या छोटयाशा खोल्यांना होती. तर टेबल टेकून होते ती भिंत पूर्ण आरशाची होती. खुर्च्यांना मऊशार काळी मखमल होती. टेबलावर ताज्या गुलाबांचा गुच्छ सजवलेला होता. कक्ष वातानुकूलीत होता. गुलाबाच्या गुच्छदाणीतून प्रकाश कक्ष उजळवून टाकत असल्यामुळे वातावरण अद्भभुत भासत होते.

ओम आरशातून तेजाच्या चेहऱ्यावर पसरलेल्या किरण सावल्यांचा खेळ पाहत असतानाच दारे गर्रकन फिरली आणि चित्ररूप परत आत आला. ''त्याने एवढ्या लवकर कपडे बदलले कसे?'' ओमला आश्चर्य वाटले. त्याने सर्वांगावर कमळाच्या माळा धारण केल्या होत्या. त्यांचा सुमधूर सुवास दरवळला. डोक्याला, गळयात, दंडात, हातात, कंबरेला, पायांत कमळे आणि कंबरेला तलम रेशमी धोतर. तो त्यात फार सुरेख दिसत होता. कमळांच्या त्या धुंद सुवासापुढे ओमचा, तेजाचा राग टिकण्यासारखा नव्हता. चित्ररूपाकडे प्रत्यक्ष पाहता यावे म्हणून ओमने आरशावरून विरूद्ध बाजूला लाकडी झुलत्या दाराकडे नजर वळविली आणि तो अवाक झाला. तिथे कोणी नव्हते. पुन्हा आरश्यात पाहिले. चित्ररूप तर तिथे होता. पण प्रत्यक्षात नव्हता. चित्ररूप फक्त आरशातच दिसत होता. तेजाला यात नवलाईचे काहीच वाटले नाही.

(क्रमशः)

समीर बागायतकर, वेंगुर्ला
९८६०४९८८६२
इ-मेल : ssbagayatkar@yahoo.co.in

चित्र रंगवा



ओळखा पाहू

४थ्या विश्वसाहित्यसंमेलनाचे अध्यक्ष

विजेत्यास रु. १०१ चे रोख पारितोषिक दिले जाईल.

आपली उत्तरे दिनांक १५ मार्च २०१२ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत.

बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल.

निकाल एप्रिल २०१२ च्या अंकात जाहीर होईल.

उत्तरे पाठविण्याचा पत्ता :

मेहता पब्लिशिंग हाऊस, मेहता मराठी ग्रंथजगत विभाग, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, पुणे टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३०.

'डिसेंबर' अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

नुकतेच दिवंगत झालेले चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध कलादिग्दर्शक - सुबल सरकार

स्पर्धेचे विजेते - **गणेश भोईर, ठाणे**

साक्षी देसाई, शारदा काळे, मीनल माने, समीर सातपुते,तेजत्री अरगडे - परभणी, सुरेश भाऊसाहेब केंडे, रघुवीर मगर, सीमा पवार, सुरेखा पांडे - नाशिक, देवीदास सातव,मंगल ढमढेरे, सुजाता पारसनीस, भाग्यश्री राऊत - सांगली, रत्ना सबनीस, सारिका माने, मनोहर शेवडे, अंजली जोशी , सुरेश पवार- अहमदनगर, प्रशांत गव्हाणे - सांगली, रामदास मोहिते, श्रीकांत देवरे, सुधीर पिरकर, सई शेंद्रे, सुमन शेळके, समीर चोपकर, सुहासिनी पाटील - कोल्हापूर नेहा काणे, प्रियांका जाधव, ऐश्वर्या शिंदे, समीर काकोडकर - पुणे, सतिष जोशी - नागपूर

प्रायोजक

श्री.राजू जगदीशचंद्र मेहता, मे. हिराचंद नानचंद अँड कंपनी,
साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी
टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**

सूचना - प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

मेहता मराठी ग्रंथजगत

वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत

एक वर्षाला २०% तीन वर्षांना २५% पाच वर्षांना ३०%

एक वर्षाची	तीन वर्षांची	पाच वर्षांची
वर्गणी १५०रु.	वर्गणी ३५०रु.	वर्गणी ५००रु.

तीन किंवा पाच
वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
'लोखंड खाणारे उंदीर' आणि **'नशीबवान शेखर'**
लेखिका - वृषाली पटवर्धन
प्रत्येकी ३०रु.ची
पुस्तके भेट
पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
'चला जाणून घेऊ या मंत्रसामर्थ्य'
आणि **'चला जाणून घेऊ या प्रार्थना'**
प्रत्येकी ४०रु.ची
पुस्तक भेट
पोस्टेज २०रु.

भेट पुस्तके प्रती शिल्लक असेपर्यंतच

मेहता मराठी ग्रंथजगत, द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PNCW / M-184 / 2012 - 2014 / Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 Feb. 2012

आगामी

आपली सृष्टी

लेखक
प्रा. डॉ. किशोर पवार
प्रा. सौ. नलिनी पवार





आपल्या सृष्टीतील विविध पक्षी, प्राणी, जलचर, उभयचर, सर्पसृष्टी अशा विविध प्राण्यांच्या जगाची सफर तसेच त्यांच्या शास्त्रीय व मनोरंजक माहितीचा एकत्र खजिना वाचकांना नक्कीच आवडेल.




BOOK POST
Printed Matter

मेहता पब्लिशिंग हाऊस
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.